



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार २० मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# आजपासून पेट्रोल-डिझेल 90 पैशांनी महाग

## पेट्रोल 107.59 आणि डिझेल 94.08 रुपये प्रति लिटर



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पेट्रोल-डिझेलच्या दरात मंगळवार दि. १९ मे रोजी पुन्हा वाढ झाली. चार दिवसांमध्ये कंपन्यांनी दुसऱ्यांदा तेल वाढ केली. त्यामुळे दर चार रुपयांनी वाढले आहेत. याचा थेट फटका सामन्यांच्या बजेटला बसला आहे. कच्चा तेलाचे दर वाढत असून त्याचा थेट भार तेल कंपन्यांना उचलावा लागू नये म्हणून आणखी इंधन दरवाढ होण्याची शक्यता आहे, ही दरवाढ ९० पैसे फार्म्युल्याने केली जाईल का, अशी चर्चा सुरू झाली आहे. दिल्लीत पेट्रोलची किंमत ८७ पैशांनी वाढून प्रति लिटर ९८.६४ रुपयांवर पोहोचली आहे, जी यापूर्वी ९७.७७ रुपये प्रति लिटर होती. तर, डिझेलच्या दरात ९१ पैशांनी वाढ झाली आहे, त्यामुळे आता ते ९०.६७ रुपयांऐवजी ९१.५८ रुपये प्रति लिटर दराने विकले जात आहे.

कोलकातामध्ये पेट्रोलच्या दरात सर्वाधिक वाढ नोंदवली गेली आहे. येथे पेट्रोल ९६ पैशांनी महाग होउन प्रति लिटर १०९.७० रु पयांवर पोहोचले आहे. तर, डिझेलच्या दरात प्रति लिटर ९४ पैशांनी वाढ झाली आहे, त्यानंतर आता कोलकातामध्ये डिझेल ९६.०७ रुपये प्रति लिटर मिळत आहे.

देशाची आर्थिक राजधानी मुंबईतही इंधनाच्या दरात मोठी वाढ दिसून आली आहे. मुंबईत पेट्रोल ९१ पैशांनी महाग होउन १०७.५९ रुपये प्रति लिटरवर आले आहे. यासोबतच डिझेलचे दर ९४ पैशांनी वाढून ९४.०८ रुपये प्रति लिटर झाले आहेत.

दक्षिण भारतातील प्रमुख महानगर

> **एकाच आठवड्यात दोनदा पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ**

चेन्नईमध्ये पेट्रोलच्या किमतीत ८२ पैशांनी प्रति लिटर वाढ झाली आहे, त्यानंतर नवीन दर १०४.४९ रुपये प्रति लिटर झाला आहे. चेन्नईमध्ये डिझेलच्या किमतीही ८६ पैशांनी प्रति लिटर वाढल्या आहेत, त्यामुळे आता ग्राहकांना एक लिटर डिझेलसाठी ९६.११ रुपये मोजावे लागत आहेत. २०२६ या वर्षात २०२२ सालाप्रमाणेच इंधन दरवाढ होण्याचे संकेत मिळत आहेत. २०२२ मध्ये सलग १५ दिवस ९० पैशांनी दरवाढ केली गेली होती आणि त्यामुळे इंधनाचे दर प्रचंड वर गेले. दररोज ९० पैशांनी दरवाढ केली गेल्याने कमी वाटत गेली, पण १५ दिवसांत अपेक्षित ती दरवाढ कंपन्यांनी केली होती. आताही इराण-अमेरिका युद्ध सुरु आहे. त्याचा परिणाम कच्च्या तेलाच्या किंमती वाढण्यावर झाला आहे. तेल कंपन्यांनी आधी ३ रुपयांनी दरवाढ केली. त्यानंतर आता ९० पैशांनी दरवाढ करण्यात आली आहे. पुढील काळातही तेलाचे दर आणखी वाढणार असल्याचे सूतोवाच दिले गेले आहेत.

**२०२२ मध्ये काय झाले होते?**

चार वर्षांपूर्वी म्हणजेच २०२२ साली युक्रेन-रशिया युद्ध सुरू झालं होतं. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाच्या दराचा भडका उडाला. भारताची तेल भूक ही आयात केलेल्या तेलावरच भागते. त्यामुळे याचा फटका भारताला बसला. तेल कंपन्यांना त्यावेळी नुकसान होउ लागले होते. मार्च-एप्रिल २०२२ या ➪(पान २ वर)

# पुढील 6 दिवस भीषण ऊष्णतेची लाट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**देशात भीषण ऊष्णता जाणवू लागली आहे. सोमवारी उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि महाराष्ट्रात पारा ४६ अंशाच्या वर नोंदवला गेला. देशात सर्वात ऊष्ण उत्तर प्रदेशातील बांदा होते. येथे पारा ४७.६ अंशावर नोंदवला गेला. प्रयागराजमध्ये ४६.८ अंश, पंजाबमधील भटिंडा येथे ४७, महाराष्ट्रातील वर्धा येथे ४६.५, अमरावती येथे ४६.४, अकोला येथे ४६.३, हरियाणातील सिरसा येथे ४६.२, राजस्थानमधील चित्तोडगड आणि पिलानी येथे ४६.२, श्रीगंगानगर येथे ४६.१, बिकानेर येथे ४६ पारा होता. खासगी हवामान संस्था स्कायमेटनुसार, आजपासून २४ मे पर्यंत देशाचा मोठा भाग भीषण ऊष्णतेने होरपळेल. या काळात ईशान्य आणि दक्षिण द्वीपकल्पातील काही भाग वगळता जवळपास अर्ध्या देशात ऊष्णतेची लाट राहील.

**देशात सरासरी ४५ अंश तापमान-** देशाचे सरासरी तापमान ४५ अंशापर्यंत राहू शकते. याचे कारण म्हणजे ज्या हवामान प्रणालींमुळे यापूर्वी अनेक भागांमध्ये चांगला पाउस पडत होता, त्या आता कमकुवत झाल्या आहेत. एजन्सीनुसार, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये ऊष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे.

**अधिका-यांना सतर्क राहण्याचे निर्देश-**मध्य प्रदेशमध्ये या हंगामातील सर्वाधिक ऊष्णता नोंदवली गेली. खजुराहोमध्ये पारा ४६.८, उज्जैनमध्ये ४५.४, खंडवामध्ये ४५.१ अंश नोंदवला गेला. भोपाळमध्ये पारा ४४ अंश होता. कडक उन्हामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांवरील डांबर वितळले. यूपीचे मुख्यमंत्री योगी यांनी सर्व जिल्हाधिकारी, आरोग्य विभाग, वीज विभाग आणि मदत संस्थांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच रुग्णवाहिका सेवा सक्रिय ठेवण्यास सांगितले. मुख्यमंत्र्यांनी अधिका-यांना प्रत्यक्ष मैदानात उतरून संवेदनशील जिल्ह्यांवर विशेष लक्ष ठेवण्याचे, तसेच मदत आणि बचाव कार्याची तयारी वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

**महाराष्ट्रातही भीषण ऊष्णता-** राजस्थानमध्ये तीव्र ऊष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. रात्रीही ऊष्ण राहतील. छत्तीसगड, हरियाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, पंजाब, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातही ऊष्णतेची लाट येईल.

# मणिपूरमध्ये राष्ट्रीय महामार्ग बंद

**● पेट्रोल पंपांवर इंधनाचा तुटवडा ● ड्रायव्हर्सकडील अन्न संपले**



**इम्फाळ /वृत्तसंस्था :** मणिपूरची जीवनवाहिनी मानला जाणारा राष्ट्रीय महामार्ग २ गेल्या पाच दिवसांपासून पूर्णपणे ठप्प झाला आहे. पंतप्रधानांना सादर केलेल्या मागणी पत्रावर कोणतीही प्रगती न झाल्याने आणि सेनापती येथून अपहरण केलेल्या १४ कुकी नागरिकांना सोडवण्यात सरकारला अपयश आल्याच्या निषेधार्थ हा बंद पुकारण्यात आला आहे. यामुळे सेनापती जिल्ह्यातील खोंगनेम ते टी. खुल्लेन दरम्यान एक हजाराहून अधिक ट्रक, बस यांसारखी वाहने अडकली आहेत. दरम्यान, कुकी इन्पी संघटनेने सोमवारी बंदचा कालावधी ४८ तासांनी वाढवला होता.

**ड्रायव्हर्सकडील अन्न संपले-** बंदमध्ये अडकलेले ट्रक चालक, क्लिनर आणि प्रवासी आपल्या वाहनांजवळच उघड्या आकाशाखाली रात्री काढण्यास भाग पडले आहेत. या भागात मोबाईल नेटवर्क अत्यंत कमकुवत असल्याने ते आपल्या कुटुंबांशी संपर्क साधू शकत नाहीत. अडकलेल्या लोकांकडे खाण्यापिण्याचे साहित्य आणि रेशन पूर्णपणे संपले आहे. स्थानिक बाजारात त्यांना वस्तू चढ्या दराने मिळत आहेत. प्रशासनाकडून कोणतीही व्यापक मदत सामग्री पोहोचवली जाउ शकली नाही, ज्यामुळे अनेकांवर उपाशी राहण्याची वेळ आली आहे.

**पेट्रोल पंपांवर इंधनाचा तुटवडा-** शेकडो तेल आणि एलपीजी टँकर रस्त्यात अडकल्याने राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधन संपले आहे. मालोम तेल डेपोमध्ये साठा असूनही टँकरच्या कमतरतेमुळे आणि ट्रान्सपोर्टर्सनी कमी लोडिंग शुल्काचा विरोध केल्यामुळे किरकोळ पंपांपर्यंत पुरवठा पोहोचू शकत नाही आहे.

# आर्थिक संकटांकडे दुर्लक्ष करून मोदींचा विदेश दौरा

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था -**गेल्या काही दिवसांपुर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य पूर्वेत सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांना अनेक महत्त्वाची आवाहने केली. यापैकी एक म्हणजे इधन बचतीसाठी पुढील काही महिने परदेश दौरे टाळावे, असे आवाहन केले होते. या आवाहनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः पाच दिवसांच्या परदेश दौ-यावर गेले आहे. यावरुन आता काँग्रेसचे खासदार आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे.



> **खूप कठीण काळ -देशातील युवा, शेतकरी, कामगार, लघु ऊद्योगांना मोठा फटका**

**केंद्र सरकारच्या धोरणांवर राहुल गांधींची टीका-** राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. एक्सवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणतात की, एक भयंकर आर्थिक वादळ घोंघावत आहे. मोदींनी १२ वर्षांत जी रचना उभारली, ती केवळ अदानी आणि अंबानींसाठीच होती. आणि आता तीच रचना कोसळण्याच्या मार्गावर आहे. त्यांना काही होणार नाही. त्यांच्याकडे बाहेर पडण्याचा मार्ग आहे. तुम्हाला फटका बसेल. तरुणांना, गरिबांना, मध्यमवर्गीयांना, शेतक-यांना, मजुरांना, लहान व्यावसायिकांचे नुकसान होईल, जे या रचनेचा कधीच भाग नव्हते. तुमच्या आजूबाजूला पाहा. तुम्ही त्या रचनेचा भाग आहात, की त्या वादळाचे बळी? अशी विचारणा राहुल गांधी यांनी एक्स पोस्टमध्ये केली आहे. या एक्स पोस्टसोबत शेअर केलेल्या व्हिडिओत केंद्र सरकारच्या धोरणांवर राहुल गांधी यांनी टीका केली आहे.

**स्वतः जगभर दौरे करत आहे-** आर्थिक मंदीचे वादळ येत आहे. अदानी आणि अंबानी ढाचा त्यांनी तयार केला आहे. तो पूर्णपणे कोसळणार आहे. दुःखद गोष्ट ही आहे की, सामान्य जनतेचे मोठे नुकसान होणार आहे. याचा अर्थ ते आपल्या महालात बसून राहतील आणि तरुणांचा याचा मोठा फटका बसेल. अदानी आणि अंबानी यांना आर्थिक झळ बसणार नाही. मोदींवर याचा प्रभाव होणार नाही. देशातील युवा, शेतकरी, कामगार, लघु उद्योगांना याचा मोठा फटका बसणार आहे. गेल्या अनेक वर्षांत झाले नाही, इतके मोठे नुकसान होणार आहे. खूप कठीण काळ येत आहे. देशातील आर्थिक समस्यांवर तोडगा काढण्याऐवजी मोदी नागरिकांना परदेश दौरे टाळण्याचा सल्ला देतात. पण, स्वतः जगभर दौरे करत आहेत. देशातील अंतर्गत आर्थिक संकटांकडे दुर्लक्ष करून केवळ प्रतिमा उभारण्यावर भर दिला जात आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला आहे.

# आता आचारसंहितेमुळे कर्जमाफी लांबणीवर?

**मुंबई/प्रतिनिधी :**महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतक-यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. कर्जमाफीचा निर्णय आता आणखी काही दिवस लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे. ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबवणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्विकृत सदस्य आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाउ शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे.



# मोटेगावकर सरांच्या ट्युशनमधील विद्यार्थी सीबीआयच्या रडारवर, विद्यार्थ्यांच्या घरी पोलीस




> ***केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) दिल्ली येथील विशेष पथकाने मंगळवारी नागपूर आणि चंद्रपूर येथे मोटेगावर सरांच्या तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर झडती कारवाई केली.***

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरः देशभरात खळबळ उडालेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्रात मोठी कारवाई करण्यात आली. लातूरमधील एका प्रसिद्ध क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) अटक केली. मोटेगावकर यांना १८ मे) पुण्यातून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केली. त्यानंतर त्यांना दिल्लीतील न्यायालयात हजर करण्यात आले. देशभरात खळबळ उडवून देणा-या नीट पेपरफूट प्रकरणाच्या तपासात आता विदर्भ कनेक्शन समोर येउ लागले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) दिल्ली येथील विशेष पथकाने मंगळवारी नागपूर आणि चंद्रपूर येथे मोटेगावर सरांच्या तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर झडती कारवाई केली. यामुळे आता मोठी खळबळ उडाली आहे. थेट विद्यार्थ्यांची चौकशी होत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

***घर व मोबाईलची तपासणी-*** मिळालेल्या माहितीनुसार, झडती घेण्यात आलेल्या तिघांपैकी दोन विद्यार्थी नागपूरमधील असून एक उमेदवार चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. ➪(पान २ वर)

## मोटेगावकरच्या मुलाची चौकशी!

**पुणे/प्रतिनिधी :** लातूर येथील आरसीसी कोचिंग क्लासेसचा संचालक प्रा. शिवराज मोटेगावकरने आपल्या साथीदारांना हाताशी धरून नियोजनबद्ध कट आखल्याचे सीबीआयच्या तपासात समोर आले. प्रा. मोटेगावकरचे एनटीएशी निगडित प्राध्यापकांशी संबंध होते. तसेच पी. व्ही. कुलकर्णीसोबतही मोटेगावकरचे घनिष्ठ संबंध आहेत. त्यामुळे परीक्षेपूर्वीच प्रश्न मिळवून उत्तरांसह मुलांपर्यंत पोहोचवले. मोबाईलमध्ये पेपरफुटीचे अनेक पुरावे मिळाले. त्यानंतर आता मोटेगावकरच्या मुलाचीही पुण्यातील सीबीआय कार्यालयात चौकशी सुरू आहे. दरम्यान, आरसीसी क्लासमधील आणखी २ विद्यार्थी, पालकांची पुण्यात चौकशी सुरू असल्याचे समजते. प्रा. शिवराज मोटेगावकरला अटक झाल्यानंतर आज त्याच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयात चौकशी करण्यात आली. मोटेगावकरच्या मुलाने बारावीची परीक्षा दिली. त्यालाही फुटलेल्या नीट प्रश्नपत्रिकाचा फायदा झाल्याचा बोलले जात आहे. मोटेगावकरच्या मुलासोबत शिवराज मोटेगावकरच्या आरसीसी क्लासमध्ये शिकणा-या आणखी तीन विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांसह सीबीआय ऑफीसमध्ये चौकशी केली जात आहे.प्रा. मोटेगावकरने लिक पेपर विकून पैसे तर कमावलेच. शिवाय स्वतःच्या मुलालाही या फुटलेल्या पेपरच्या माध्यमातून फायदा पोहोचवण्याचे काम केले किंवा या मुलाला आधीच प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिली, अशा प्रकारची सीबीआयची माहिती आहे. त्यामुळे सीबीआयने मोटेगावकरच्या मुलाला सीबीआयच्या ➪(पान २ वर)



# होर्मुझ स्ट्रेट वर इराणी वसुली

**तेहरान/वृत्तसंस्था :** जागतिक व्यापाराचा कणा आणि जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ स्ट्रेटवर इराणने आता पूर्णपणे आपले नियंत्रण मिळवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. इराणने या मार्गावरून जाणा-या सर्व व्यापारी जहाजांसाठी एक नवा आणि कडक परमिट नियम लागू केला आहे. यासाठी इराणने एक नवीन नियामक संस्था स्थापन केली असून तिच्या परवानगीशिवाय आणि फी भरल्याशिवाय आता कोणतेही जहाज या मार्गावरून पुढे जाउ शकणार नाही. इराणच्या या निर्णयामुळे अमेरिका, युरोपीय देश आणि आखाती देशांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून त्यांनी या निर्णयाला बेकायदेशीर ठरवले आहे. इराणने तयार केलेल्या या नव्या संस्थेचे नाव पर्शियन गल्फ स्ट्रेट ऑथॉरिटी असे आहे. इराणच्या सुप्रीम नॅशनल सिक्युरिटी➪(पान २ वर)








# कीटकांप्रमाणे रांगत आंदोलक पोहोचले मंत्र्यांच्या निवासस्थानी

**लखनौ//वृत्तसंस्था :** तब्बल ६९००० शिक्षक भरती उमेदवारांनी शिक्षण मंत्री संदीप सिंह यांच्या निवासस्थानी निदर्शने केली. निदर्शक मंत्र्यांच्या निवासस्थानापासून सुमारे १०० मीटर आधी जमा झाले. जमिनीवर किड्या-मुंग्यांसारखे रांगत ते मंत्र्यांच्या निवासस्थानापर्यंत पोहोचले.यावेळी आंदोलक म्हणाले आम्ही सरकारच्या दृष्टीने किडे-मुंग्या झालो आहोत. आमचे कुठेही कोणी ऐकत नाही. त्यामुळे आज आम्ही ➪(पान २ वर)

# नीट परिक्षेनंतर MH–CET मध्येही मोठा घोटाळा

**सचिन सावंतांकडून चौकशीची मागणी**



**मुंबई/प्रतिनिधी :** देशभरात (NEET) पेपरफुटीने विद्यार्थी व पालकांची चिंता वाढली असून, आयुष्याच्या महत्वाच्या टप्प्यावर जर तरुणपिढीला फसवले जात असेल तर ही देशाची सुद्धा फसवणूकच आहे. एकीकडे पेपरफुटीची चौकशी सुरु असली तरी अशा चौकशातून पुढे काहीही निष्पन्न होत नाही. नीट सारखाच गडबड घोटाळा MH – CET परिक्षेतही झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. दहावी बारावीला जेमतेम ३५-४० टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्यांना MH – CET मध्ये १०० पर्सेंटाईल्स पडलेले आहेत, हा घोटाळा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींनी कठोर शिक्षा करा, अशी मागणी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत यांनी केली आहे. टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी MH – CET परिक्षेतील घोटाळ्यावर बोलताना➪(पान २ वर)

# भटक्या श्वानांना शेल्टर होम मध्ये ठेवा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**देशभरातील सार्वजनिक ठिकाणे अधिक सुरक्षित करण्यासोबतच भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनाबाबत सर्वोच्च न्यायालयाने आज निर्णय दिला. रुग्णालये, बसस्थानके, शाळा आणि रेल्वे स्थानके यांसारख्या सार्वजनिक ठिकाणांहून पकडलेल्या भटक्या श्वानांना केवळ लसीकरण किंवा नसबंदी करून पुन्हा त्याच ठिकाणी सोडू नये. त्याऐवजी, या श्वानांना त्यांच्यासाठी राखीव असलेल्या सुरक्षित शेल्टर होममध्ये ठेवले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठाने, गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये दिलेल्या निर्देशांमध्ये बदल



करण्याची मागणी करणा-या याचिका, तसेच भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या प्रमाणित कार्यपद्धतीला आव्हान देणा-या सर्व याचिका फेटाळून लावल्या. देशभरात लहान मुले, वृद्ध नागरिक आणि पर्यटकांवर श्वानांनी हल्ला केल्याच्या वाढत्या घटनांवर न्यायालयाने चिंता व्यक्त केली. अशा घटना या प्रशासकीय त्रुटींचे लक्षण असून विमानतळ आणि निवासी भागांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी हा धोका वाढणे गंभीर आहे असे न्यायालयाने नमूद केले. प्रत्येक नागरिकाला भीतीमुक्त वातावरणात जगण्याचा आणि सार्वजनिक ठिकाणी फिरण्याचा अधिकार राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ नुसार मिळाला आहे असे स्पष्ट ➪(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपूर कृषी विभागाच्या नवीन इमारत बांधकामास लवकरच मंजुरी

**आ. प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याला यश**

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची घेतली होती भेट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील कृषी विभागाच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून या कामास लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यासाठी स्थानिक आमदार प्रवीण तायडे यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली होती .आणि याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याने आ.प्रवीण तायडे यांच्या शासन स्तरावर सातत्याने केलेल्या प्रभावी पाठपुराव्याला यश मिळत असल्याचे चित्र आहे.



अचलपूर तालुक्यातील शेतकरी, कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनेक वर्षांपासून स्वतंत्र व सुसज्ज इमारतीची आवश्यकता भासत होती. आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त नवीन इमारत उभारण्याची मागणी सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर आमदार प्रवीण तायडे यांनी संबंधित विभाग, वरिष्ठ अधिकारी तसेच मंत्रालय स्तरावर वारंवार पाठपुरावा करून हा विषय प्राधान्याने मांडला. त्यांच्या प्रयत्नांमुळे प्रस्तावाला सकारात्मक गती मिळाली असून प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मंजुरीनंतर अचलपूर येथे कृषी विभागाची आधुनिक प्रशासकीय इमारत उभारली जाणार असून त्यामुळे शेतकरी बांधवांना विविध कृषी योजनांचा लाभ अधिक सुलभपणे मिळणार आहे. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही प्रशासकीय कामकाजासाठी सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे अचलपूर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार प्रवीण तायडे यांच्या पाठपुराव्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# फिन्ले मिल्स मधून १ लाख रुपयाचे साहित्य लंपास

**अचलपुर/प्रतिनिधीः-** कोरोना काळापासून बंद असलेल्या फिन्ले मिल्स ला चोरट्यांनी लक्ष केले असून मिलच्या मुख्य लुमशेड च्या खिडकीच्या काचा फोडून त्यातील अत्यंत महत्त्वाचे इलेक्ट्रिक साधने अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना सोमवारी सुरक्षा रक्षक गस्त घालताना उघडीस आहे .

मिलच्या मुख्य कडील खिडकीचे काचा फोडून लूमशेडमध्ये प्रवेश केला व मुख्य दरवाजा उघडून बंद असलेल्या एअर जेट लुम मशीनला जोडलेले अत्यंत महत्त्वाची इलेक्ट्रिक साधने ज्याला वेब फीडर म्हणतात ते कटरच्या साह्याने इलेक्ट्रिक वायर ,नट व ते पाण्याच्या साह्याने फिडरशिप स्क्रू उघडून अंदाजे ३० ते ३५ जुने वापरले मशीनचे नग वेब फीडर ज्याची अंदाजे किंमत एक



लाख रुपये आहे ते अज्ञात चोरट्यांनी लंपास केले आहे. अशा आशयाची तक्रार मिलचे प्रबंधक धर्मेंद्र उत्तमराव पिपेरेवार (वय ४४) रा.देवमाळी यांनी अचलपूर पोलीस स्टेशनला दिली. फिन्ले मिल बंद असली तरी मिल परिसरात सेक्युरिटी चोख बंदोबस्त आहे . अशातही चोरट्यांनी सुरंग लावल्याने सुरक्षा रक्षक काय करत होते असा प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात अचलपूर पोलिसांनी कलम ३०५ , ३३४ ( १) ३८० ४६१ भारतीय दंडविधान अन्वये गुन्हा दाखल करून पुढील चौकशी सुरू आहे .

# यमराजांनी दिली नागरिकांनी वाहतुक नियमांचे धडे

## -राजापेठ, पंचवटी ,बनडेरामध्ये जनजागृती

**अमरावती/प्रतिनिधीः-** रस्ता अपघाताचे प्रमाण वाढतं चालले आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी वाहतूक विभागाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहे. अशात आज मंगळवार १९ मे रोजी विभागाच्या वतीने विशेष जनजागृती मोहीम राबवत वाहन धारकांना वाहतुकीचे नियम शिकवले. स्वतः यमराजांनी हातात गदा घेऊन नागरिकांना वाहतूक नियमांची माहिती दिली आणि त्याचे पालन करण्याचे सांगीतले. शहरातील राजापेठ,पंचवटी चौक, यशोदा नगर, बडनेरा परिसरात ही जनजागृती मोहीम चालविण्यात



आली. यमराजांच्या पारंपारिक वेशभूषेने सर्वांचे लक्ष वेधले. त्यांनी नागरिकांना ट्राफिक सिग्नल चे पालन करावे, दारू पिऊन वाहन चालवू नये, सीट बेल्ट लावून वाहन चालवावे, वेग मर्यादा ठेवावी, वाहन चालवताना हेल्मेट वापर करावे यासह इतर वाहतूक नियमांचे सक्तीने पालन करण्याचे आवाहन केले. आपल्या जीवाची सुरक्षा करा कुटुंबाकडे लक्ष द्या... सुरक्षा नियमांचे करा अशी माहिती वाहनधारकांना देण्यात आली. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना गुलाबाचे फुल आणि समजपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या विशेष मोहीमेने शहरवासी यांचे लक्ष वेधले.

पोलीस आयुक्त राकेश ओला ,उपायुक्त रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय खताळे, राजापेठचे पोलीस निरीक्षक प्रवीण डांगे, गाडगे नगरचे रिता उईके, फ्रेजरपुरा पोलीस निरीक्षक ज्योति विल्हेकर यांच्या नेतृत्वात वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जनजागृती मोहीम मध्ये सहभाग घेतला.

# १ व १० वरिल उर्वरित

## राणीगाव शेतशिवारात बिबट्याचा

सुमारास बिबट्या लक्ष्मण भिलावेकर यांच्या शेतात शिरला होता. शेतामध्ये असलेल्या श्वांनांचा शिकार करण्यासाठी बिबट्या शेतात घुसला होता. कुत्र्याची शिकार केल्यानंतर शेताबाहेर पडण्याचा प्रयत्न करत असताना चारही बाजूंनी तारकुंपण असल्यामुळे बिबट्या घाबरून वारंवार कुंपणावर आदळला. यामध्ये त्याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज धुळघाट वनपरिक्षेत्र अधिकारी एस. डी. चक्रे यांनी व्यक्त केला.घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. राणीगांव येथील धुळघाट रेल्वे रोड लगत असलेल्या शेता जवळच मृत बिबट्याचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर वन विभागाच्या उपस्थितीत मृत बिबट्याचा दाहसंस्कार करण्यात आला. लक्ष्मण भिलावेकर यांच्या शेता लगतच रानिगाव वन तलाव असून, पाण्याच्या शोधात बिबट्या त्या परिसरात आला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्याचवेळी कुत्र्याचा आवाज ऐकून तो शेतात शिरला असावा, अशी शक्यता वन विभागाकडून वर्तविण्यात येत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास मुख्य वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली व्याघ्र विभागाकडून सुरू आहे.

## बांधून ठेवलेल्या ४ गोवंशाला

डीबी पथकाला पेट्रोलिंग दरम्यान मंगळवारी पहाटे गुप्त माहिती मिळाली, त्या आधारे पथकाने अन्सार नगर येथे आरोपी अब्दुल बशीर शेख गब्बू याच्या गोठ्या मध्ये पाहणी केली असता तेथे ४ गोवंश जनावरे उपाशी, तहानलेले व वेदना दायक स्थिती मध्ये कत्तलीच्या दृष्टीने बांधल्याचे लक्षात आले. येथे एक चार वर्षाचा काळा गोंडा सुद्धा मिळाला. पोलिसांनी ४६ हजार रुपये किमतीच्या गोवंशला जप्त करून देखभाल व सुरक्षेच्या दृष्टीने दस्तूर नगर येथील गोरक्षण संस्थेमध्ये दाखल केले. आरोपी अब्दुल बशीर विरुद्ध प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, सहाय्यक आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली गाडगे नगरचे पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार, डीबी पथक प्रमुख इरफान रायलीवाले, प्रवीण ढेगेकार, विक्रम नशीबकर , इमरान खान, मोहन चव्हाण, कुणाल बरडे यांनी केली.

## निधी विना इ वाचनालयाचे

तसेच या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली नसून सबंधित ठरावावर अध्यक्षांच्या सह्याही नव्हत्या व ठराव कायम करण्यात आलेला नव्हता. असे असतानाही देशाचे माजी सरन्यायाधीश यांच्या हस्ते इ वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले.

उद्घाटन वेळी इ वाचनालयाला तोंडी स्वरूपात भूषण गवई असे नाव देण्यात आले. या संपूर्ण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश, नगर परिषद प्रशासन आणि नागरिकांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.नगराध्यक्ष प्रियांका विश्वकर्मा व त्यांचे पती तथा स्वीकृत सदस्य निलेश विश्वकर्मा यांनी केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापोटी हा प्रकार करण्यात आल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. ३ मे रोजी चांदूर रेल्वे येथे न्यायालय इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी माजी सरन्यायाधीश शहरात आले होते. याच वेळी घाईघाईने इ वाचनालयाचे लोकार्पण करून घेण्यात आले. या कार्यक्रमास ईतर न्यायाधीश देखील उपस्थित होते. मात्र नगर परिषदेचा अधिकृत ठराव नसताना उद्घाटन करण्यात आल्याने भाजप नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान गटनेता निलेश भालेराव यांनी मुख्याधिकारी यांचे कडे लेखी अर्ज देऊन माहिती मागवली होती. पत्रकार परिषदेला नगर परिषद चांदूर रेल्वेचे नगरसेवक प्राविण्य देशमुख, अनिल मोटवानी, गजानन ठाकरे, दुर्गा भूत, ममता रॉय, शालिनी राऊत, भाजप शहराध्यक्ष नंदा वाधवाणी, अजय हजारे यांसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

## फेरफारासाठी २५ हजारांची लाच..!

कळंब येथील भूमिअभिलेख कार्यालयात परिरक्षण भुमापक म्हणून कार्यरत आहेत. तक्रारदार हे कोठा (वेणी) शिवारातील शेती व प्लॉट देखरेखीचे काम करतात. संबंधित प्लॉट मालकाचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कायदेशीर वारसांची नावे फेरफारद्वारे नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यासाठी तक्रारदारांनी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन विनंती केली असता, वारसांना कार्यालयात न बोलावता नावे नोंदवून देण्यासाठी स्वतःकरिता २५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीने १८ व १९ मे रोजी पडताळणी केली. पडताळणीदरम्यान लाचेच्या मागणीची खातरजमा झाल्यानंतर आज सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. त्यानुसार तक्रारदाराने कळंब येथील भूमिअभिलेख कार्यालयातील चेंबरमध्ये पंचांसमक्ष २५ हजार रुपयांची रक्कम दिली. ही रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने तत्काळ कारवाई करत शितल पांडे यांना रंगेहात पकडले.

या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचींद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर, पोलीस निरीक्षक मनोज ओरके, अर्जुन घनवट आणि एसीबी यवतमाळच्या पथकाने पार पाडली.

दरम्यान, शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी ॲन्टी करप्शन ब्युरो यवतमाळ कार्यालयाच्या ०७२३२-२४४००२, मोबाईल ८९७५७९१०६४ किंवा टोल फ्री १०६४ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीकडून करण्यात आले आहे.

## आज औषध विक्रेता संघटनेचा

आले आहे. औषध उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास नागरिकांनी हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले ओ. अन्न व औषध प्रशासन, अमरावती कार्यालय हेल्पलाईन क्रमांक - गजानन घीरके, सहायक आयुक्त (औषधे) वाशिम, अमरावती-९८५०१५०६८७, मनिष गोतमारे, औषध निरीक्षक, वाशिम, अमरावती ९५५२५७४४९५, तालुकानिहाय आपत्कालीन औषध उपलब्धता हेल्पन्नाईन क्रमांक - अमरावती शहर - प्रविण देशमुख ९४२२१५८४०९, संजय बोबडे ९४२२१५७६१५, सौरभ मालानी ९४२३८१२३४५, मनोज डफळे ९८२३२०५२५०, राजा नानवाणी ९८२२६४३२२६ येथे संपर्क साधावा, असे आवाहन सह आयुक्त (औषधे) करण्यात मि. कृ. काळेश्वरकर यांनी केले आहे.

## जुना बायपास मार्गावरील

पोहोचवून पंचनामा केला आणि मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला होता. त्याची ओळख रामप्रकाश रामनाथ चौधरी अशी झाली आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट नाही झाले आहे. प्राथमिक अंदाजा नुसार उष्माघातामुळे मृत्यू झाला असावा अशी शक्यता वर्तवली जात आहे. पुढील तपास पोलिस करत आहे.

## ट्रकचे टायर चोरी करणारा

करण्यात आली आहे. ट्रकचे तब्बल १६ टायर लोखंडी डिस्क सह चोरीला गेल्याने परिसरात खळबळ उडाली होती. माहिती नुसार अमोल धनराजराव धर्माळे (वय ३०, रा. ग्राम शिराळा ता. जि. अमरावती ) यांनी पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे तक्रार दाखल केली होती.

त्यांनी आपला टाटा कंपनीचा १६ टायर असलेला ट्रक २४ एप्रिल रोजी रात्री वलगाव रोडवरील रोशन धर्मकाटा परिसरातील मनपा वाहन पार्किंगमध्ये उभा करून घरी गेले होते. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी ट्रकजवळ गेले असता ट्रकचे सर्व १६ टायर लोखंडी डिस्कसह गायब असल्याचे दिसून आले. ट्रकचे सर्व टायर चोरीला गेल्याने मोठा आर्थिक फटका बसला. चोरी गेलेल्या टायर आणि डिस्कची किंमत सुमारे ३ लाख ७० हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी धर्माळे यांनी संतोष पुंडलिकराव मानापुरे ( उत्कर्ष नगर, कठोरा रोड, ) याच्यावर संशय व्यक्त करत तक्रार दाखल केली.यावरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी तात्काळ डी.बी. पथकाला तपासासाठी रवाना केले. डी.बी. पथकाने संशयित आरोपी संतोष पुंडलिकराव मानापुरे (वय ४६ ) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची बारकाईने चौकशी केली असता सुरुवातीला आरोपीने उडवा उडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसी खाक्या दाखवताच त्याने ट्रकचे टायर चोरी केल्याची कबुली दिली.तपासा दरम्यान आरोपीच्या घरासमोर ठेवलेले ८ टायर डिस्क किंमत १ लाख ६० हजार जप्त करण्यात आले. तपासा दरम्यान आरोपीने चोरी केलेल्या उर्वरित ८ टायर डिस्क सह दुसऱ्या ट्रकला लावल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संबंधित ठिकाणी जाऊन पडताळणी केली असता हे टायर आरोपीच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट झाले.या संपूर्ण कारवाईमुळे ट्रक टायर चोरीच्या मोठ्या प्रकरणाचा उलगडा करण्यात गाडगेनगर पोलिसांना यश आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या निर्देशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव आणि पोलीस निरीक्षक समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली डिबी पथक प्रमुख योगेश श्रीवास, भारत वानखडे, नंदकिशोर करोची, राजेश गुरेले, मतीन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुंमरे, महेश शर्मा यांनी केली.

## अमरावती विभागाची ऐतिहासिक

करण्यात आले.

अमरावती विभागाने विविध स्तरावर तब्बल आठ पुरस्कार पटकाविले असून, १५ मे रोजी, सातारा सैनिक स्कूल येथे आयोजित एका भव्य गौरव सोहळ्यात संबंधित विभाग प्रमुखांना पुरस्कार प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे व प्रधान सचिव एकनाथ डवले यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात विभागीय आयुक्त (अमरावती विभाग), अपर आयुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), अकोला व अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आणि पातुर (जि. अकोला) चे गटविकास अधिकारी यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

**अमरावती विभागाला मिळालेले विविध स्तरांवरील पुरस्कार पुढीलप्रमाणे :**

विभाग स्तरावर राज्य पुरस्कृत आवास योजनेत अमरावती विभागाला राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. जिल्हा परिषद स्तरावर अमरावती जिल्हा परिषदेला 'राज्य पुरस्कृत आवास योजनेत' राज्यात द्वितीय क्रमांक मिळाला आहे. अकोला जिल्हा परिषदेला 'प्रधानमंत्री आवास योजनेत' राज्यात तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे. पंचायत समिती स्तरावर अकोला जिल्ह्यातील पातूर पंचायत समितीला 'प्रधानमंत्री आवास योजनेत' राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. ग्रामपंचायत स्तरावर वाईगौळ ग्रामपंचायत (ता. मानोरा, जि. वाशीम) - प्रधानमंत्री आवास योजनेत तृतीय क्रमांक, बेलुरा बु. ग्रामपंचायत (ता. अकोट, जि. अकोला) - 'उत्कृष्ट बहुमजली इमारत' श्रेणीत तृतीय क्रमांक, देपूळ ग्रामपंचायत (ता. जि. वाशीम) - राज्य पुरस्कृत आवास योजनेत तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

**यवतमाळच्या लाभार्थ्याला 'देशातील ३ कोटीचे घरकुल' पूर्ण करण्याचा बहुमान-**या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील इनापूर येथील लाभार्थी दशरथ सवई-चव्हाण यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत देशातील ३ कोटी क्रमांकाचे घरकुल पूर्ण करण्याचा ऐतिहासिक मान मिळवला. या अभूतपूर्व कामगिरीबद्दल केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चव्हाण व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांना त्यांच्या हक्काच्या घराची चावी प्रदान करून विशेषरित्या सन्मानित करण्यात आले.

**विभागीय आयुक्तांकडून कौतुक आणि आवाहन-** या गौरव सोहळ्यास पुरस्कारप्राप्त जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच आणि ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमरावती विभागाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी सर्व यशस्वी अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींचे मनापासून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, विभागात अद्याप अपूर्ण असलेली घरकुलांची कामे गतीने आणि गुणवत्तापूर्ण रितीने त्वरित पूर्ण करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## ट्रॅफिक व्यवस्था सुधारून नागरिकांना

यापासून कोणताही बोध घेऊन यामध्ये सुधारणा करण्याचा पुढाकार घेताना निदर्शनास येत नाही. त्याच बरोबर अमरावती शहराच्या मुख्य बाजारपेठेतील उड्डाणपुला खाली असलेले घुमंतू यांच्या वास्तव्याने त्रस्त असलेले व्यापारी वर्ग याबाबत अडचणी व सूचना सह शहरातील ट्रॅफिक व्यवस्था सुदृढ करण्याकरिता माजी पालक मंत्री डॉ.सुनील देशमुख यांचे नेतृत्वात अमरावती शहरातील वृत्त माध्यमे, डॉक्टर्स, ज्येष्ठ विधीज्ञ व व्यापारी यांचे प्रतिनिधी यांनी पोलिस आयुक्त राकेश ओला यांची भेट घेऊन त्यांचे सोबत चर्चा करून वाहतूक व्यवस्थेतील अडचणी व त्या सुधारण्याकरिता करावयाच्या उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा केली. सुरक्षित रस्ते वाहतूक नागरिकांना मिळावी अशी आशा व्यक्त केली. या शिष्टमंडळामध्ये माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख ,दैनिक हिंदुस्थान चे प्रबंध संपादक विलास मराठे , डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए.टी देशमुख, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष सुरेश जैन,सचिव घनश्याम राठी,वरिष्ठ अधिवक्ता के.एस देशपांडे,वरिष्ठ इएनटी तज्ञ डॉ.बबन बेलसरे , हृदयरोग तज्ञ डॉ.अजय डफळे ,डॉ.अनिल रोहनकर, एड. बंधू खोरगडे , अतुल गायगोले प्रामुख्याने उपस्थित होते. या मान्यवरांनी अमरावती शहरातील बिघडलेल्या वाहतूक व्यवस्थेवर चिंता व्यक्त करून निवेदन सादर केले.

## सराफा व्यापाऱ्यांसाठी विशेष

त्यांच्यासमोर उभ्या राहणार आहे म्हणून सराफा व्यापारी आणि कारागीरांसाठी सरकारने विशेष मदत पॅकेज घोषित करावे अशी मागणी सराफा व्यापारी असोसिएशनच्या वतीने आज मंगळवार १९ मे रोजी जिल्हाधिकारी मार्फत पंतप्रधानांकडे करण्यात आली आहे.निवेदनात म्हटले आहे की, सोन्या सोबत लोकांचा विश्वास जोडलेला आहे. स्वर्णकार, सराफा कर्मचारी सह कारागीर या व्यापाराशी जुळलेले आहे, जर एका वर्षापर्यंत लोकांनी सोने विकत नाही घेतले तर त्यांच्यावर बेरोजगारीचे संकट निर्माण होणार आहे. कोरोना काळामध्ये पहिलेच व्यापार बंद असल्याने मंदी ची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशातच जर सोने खरेदी बंद झाली तर व्यापार बंद होणार आहे. उदरनिर्वाहाची समस्या व्यापा-यांपुढे निर्माण होणार आहे. म्हणून सराफा व्यापारी आणि कारीगारांसाठी विशेष मदत पॅकेज देण्यात यावे. त्यासोबतच एक वर्षासाठी कर मध्ये सूट आणि बँक लोन व्याज मध्ये पण सूट देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र भंसाळी, मिलिंद श्रॉफ,अनिल गोमटे, सिमेश श्रॉफ, रंजन महाजन, नवनीत मोहोड, प्रकाश अग्रवाल, किशोर वडनेरे, शरद चुटके आदि उपस्थित होते.

## कृत्रिम प्रज्ञा ' या कादंबरीचे

विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.काशिनाथ बऱ्हाटे यांची प्रमुख उपस्थिती राहील.

'कृत्रिम प्रज्ञा ' ही कादंबरी मेधा पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली असून या प्रकाशन सोहळ्याला उपस्थित रहावे अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

## आजपासून पेट्रोल-डिझेल

काळात सलग १५ दिवस तेल वितरक कंपन्यांनी थोडे-थोडे तेल दर वाढवले. १५ दिवसांत १३ वेळा दरवाढ करण्यात आली.

## मोटेगावकर सरांच्या ट्युशनमधील

सीबीआयच्या पथकांनी या विद्यार्थ्यांच्या घरांची व मोबाईलची तपासणी केली. या विद्यार्थ्यांचे नीट परीक्षेदरम्यान काही संशयास्पद संपर्क, आर्थिक व्यवहार आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित डिजिटल पुरावे तपासण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. सीबीआयच्या अधिका-यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या निवासस्थानी लॅपटाप, मोबाईल फोन, काही दस्तऐवज तसेच ऑनलाईन व्यवहारांची माहिती तपासली.

## मोटेगावकरच्या मुलाची

ऑफिसमध्ये चौकशीसाठी बोलावले आहे. शिवराज मोटेगावकरच्या मुलासोबत २ ते ३ वकीलही आहेत. कारण शिवराज मोटेगावकरचा मुलगा हा बारावीला म्हणजे अल्पवयीन आहे, त्यामुळे त्याच्यासोबत वकील आहेत.मोटेगावकरच्या मुलासोबत इतर काही शहरांमधील पालक आणि विद्यार्थी आहेत,

## कीटकांप्रमाणे रांगत आंदोलक

किड्यांसारखे रांगत मंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचलो. भीषण उष्णतेमुळे अनेक उमेदवार बेशुद्ध पडले. पोलिसांनी त्यांना पाणी पाजले. यावेळी निदर्शकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.आम्ही घरातून हरलो आहोत आणि आता सरकारकडूनही कोणतीही अपेक्षा राहिलेली नाही. ही आमची शेवटची विनंती आहे.

## नीट परिक्षेनंतर

सचिन सावंत पुढे म्हणाले की, या परिक्षेचा अभ्यासक्रम हा ११-१२ वीचा असतो, १० वी १२ वीच्या परिक्षेत जेमतेम मार्क्स मिळवलेल्या २२ विद्यार्थ्यांना एमएच सीईटीमध्ये मात्र १०० पर्सेंटाईल मिळालेले आहेत. ज्या विद्यार्थ्याला १० व्या परिक्षेत ३७ टक्के मार्क्स मिळाले त्याला एमएच सीईट मध्ये ९९.९७१ टक्के पर्सेंटाईल मिळाले आहेत. बारावीत ज्यांना ५१ टक्के मार्क्स मिळाले अशा दोन विद्यार्थ्यंना एमएच सीईटमध्ये १०० पर्सेंटाईल, ४५ टक्के मार्क्स पडलेल्याला १०० पर्सेंटाईल व ३९ टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्याला १०० पर्सेंटाईल पडलेले आहेत. बारावीला ज्या विद्यार्थ्याला ३५ मार्क्स पडले त्यालाही १०० पर्सेंटाईल पडले आहेत.

## भटक्या श्वानांना शेल्टर

करत न्यायालयाने प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली आहे. तसेच, निर्देशांचे पालन न करणा-या अधिका-यांवर कारवाई केली जाईल, असाही न्यायालयाने इशारा दिला.

सर्वोच्च न्यायालयाचे राज्यांना निर्देश

१) सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात.

२) भटक्या श्वानांच्या लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान एक ॲनिमल बर्थ कंट्रोल केंद्र उभारण्यात यावे.

३) रेबीज प्रतिबंधक लस आणि इम्युनोग्लोबुलिन्सचा पुरेशा प्रमाणात साठा उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी राज्य सरकारांची असेल.

४) नागरिकांच्या सुरक्षेसाठी काम करणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिका-यांना योग्य संरक्षण मिळेल. कर्तव्यावर असताना त्यांच्याविरुद्ध सहसा कोणतीही एफआयआर किंवा फौजदारी तक्रार नोंदवली जाणार नाही.

५) मानवी जीविताला असलेला धोका कमी करण्यासाठी अधिकारी कायद्याच्या चौकटीत राहून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करू शकतात.

६) या सर्व निर्देशांचे योग्य पालन होत आहे की नाही, यावर देखरेख ठेवण्यासाठी संबंधित राज्यांच्या उच्च न्यायालयांनी स्वतःहून खटले दाखल करून लक्ष ठेवावे.

७) महामार्गावरील भटके प्राणी नियंत्रणात आणण्यासाठी एनएचएआयला निर्देश देण्यात आले आहेत.

## होर्मुझ स्ट्रेट वर इराणी

कौन्सिलने सोमवारी या संस्थेचे अधिकृत ट्विटर अकाउंट लाँच करून जगाला याचे संकेत दिले आहेत. आता हीच संस्था होर्मुज स्ट्रेटमधील वाहतुकीवर देखरेख ठेवणार आहे.

**मार्च महिन्यापासून गुपचूप वसुली सुरू**-इराणने हा परमिट पॅटर्न मार्च २०२६ पासूनच गुपचूपपणे राबवण्यास सुरु वात केली होती, परंतु आता त्याला अधिकृत आणि कायदेशीर स्वरूप देण्यात आले आहे. नव्या नियमांनुसार, कोणत्याही जहाजाला होर्मुज स्ट्रेट ओलांडायचा असल्यास, त्यांना आधी पीजीएसए च्या अधिकृत ईमेलवर अर्ज करावा लागेल.

जहाज मालकांना त्यांच्या जहाजाची संपूर्ण माहिती, विम्याची कागदपत्रे, चालक दलाची यादी, जहाजातील मालाचा तपशील आणि प्रवासाचा संपूर्ण मार्ग इराणला द्यावा लागेल. या सर्व तपासणीनंतर आणि इराणची मंजुरी मिळाल्यानंतरच जहाजाला पुढे सोडले जाईल.

**एका फेरीसाठी १७ कोटी रु पये**

इराणने अद्याप या परमिटसाठी अधिकृत फीची रचना जाहीर केलेली नाही. मात्र, समोर आलेल्या अहवालांनुसार, या मार्गावरून जाणा-या काही मोठ्या जहाजांकडून एका फेरीसाठी तब्बल २० लाख ड?लर्स म्हणजेच सुमारे १७ कोटी रु पये वसूल करण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी अमेरिकन ड?लरचा वापर न करता, ही कोट्यवधींची फी युआन अर्थात चीनी चलनामध्ये स्वीकारली जात आहे. हे नवे नियम लागू करण्यासाठी इराणची वादग्रस्त रिव्होल्युशनरी गार्ड नेव्ही सक्रियपणे काम करत आहे, ज्याला अमेरिका आणि युरोपियन युनियनने दहशतवादी संघटना घोषित केले आहे.

**वर्षाला १०० अब्ज डॉलर्स कमावण्याचा इरादा**

इराणचे खासदार इब्राहिम अजीजी यांनी या निर्णयाचे समर्थन करताना सांगितले की, इराणने होर्मुझमधील ट्रॅफिक नियंत्रित करण्यासाठी पूर्ण यंत्रणा सज्ज केली आहे. जे देश किंवा व्यापारी इराणला सहकार्य करतील, त्यांनाच या मार्गाचा वापर करता येईल, पण त्यासाठी शुल्क मोजावे लागेल. तेहरानमधील मेट्रो स्टेशनवर लागलेल्या पोस्टर्समध्ये तर इराण या नव्या परमिट सिस्टीमच्या माध्यमातून दरवर्षी १०० अब्ज डालर्स कमावणार असल्याचा दावा केला जात आहे.

**जागतिक अर्थव्यवस्थेवर काय होणार परिणाम?**

होर्मुझ स्ट्रेट हा जगातील सर्वात संवेदनशील सागरी मार्ग आहे. जागतिक स्तरावर होणा-या एकूण तेल आणि एलएनजी पुरवठ्यापैकी सुमारे २०ऽ पुरवठा याच मार्गाने होतो. फेब्रु वारी २०२६ मध्ये युद्ध सुरू झाल्यापासून इराणने या मार्गावरील व्यापारी जहाजांची वाहतूक जवळपास रोखून धरली आहे. आता लागू केलेल्या या नव्या जाचक नियमांमुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती भडकण्याची आणि महागाई वाढण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २० मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# कुपोषणमुक्त बालकांसाठी संयुक्त स्क्रिनिंग मोहिम प्रभावीपणे राबवावे -जिल्हाधिकारी

## महिला सुरक्षा, बालसंरक्षणासाठी यंत्रणांनी अधिक संवेदनशीलतेने काम करावे

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

*जिल्ह्यात महिला व बालकांच्या संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. महिलांवरील अत्याचार, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार तसेच बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये अत्यंत संवेदनशीलतेने व तत्परतेने कार्यवाही करण्यात यावी. विविध विभागांनी परस्पर समन्वयातून महिला सक्षमीकरण आणि बाल संरक्षणासाठी अधिक परिणामकारक उपक्रम राबवावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.*



जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित 'जिल्हा सनियंत्रण समिती'च्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा महिला बालकल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, परिविक्षाधीन अधिकारी गणेश ठाकरे, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया यांच्यासह संबंधित समितीचे सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत हुंडा प्रतिबंध, महिला संरक्षण, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध, मिशन शक्ती, मिशन वात्सल्य, सखी वन स्टॉप सेंटर, बालविवाह प्रतिबंध तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासह विविध शासकीय उपक्रमांचा सखोल आढावा घेण्यात आला. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने शाळा, महाविद्यालय व ग्रामस्तरावर प्रचार आणि जनजागृतीचे कामकाज सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. जिल्ह्यात हुंडा प्रतिबंधासाठी जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात येत असून, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत पीडित महिलांना संरक्षण व कायदेशीर मदत दिली जात आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधासाठी जिल्ह्यातील ३०० आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. गावपातळीवर बाल संरक्षण समित्या गठीत करण्यात आल्या असून, त्यांच्या नियमित बैठका घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आढावा घेताना बैठकीत सांगण्यात आले की, जिल्ह्यात 'माविम' अंतर्गत 'उमेद' अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत प्राप्त तक्रारींचे तातडीने निवारण करण्यात येत आहे. बाल संरक्षण क्षेत्रात प्रशासनाने ४० बालविवाह रोखण्यात यश मिळवले असून, चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर प्राप्त झालेल्या ३६ तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यात आली आहे.

# महावितरण जनतेची सेवा करते की त्रास ?



### अनियमित वीजपुरवठा, उघडे रोहित्र आणि कर्मचाऱ्यांच्या अरेरावीवर आ. साजिद पठाण संतप्त; तीन तास अधिकाऱ्यांची घेतली क्लास

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

शहरातील वाढत्या वीज समस्यांमुळे नागरिक त्रस्त असताना महावितरणचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. वारंवार खंडित होणारा विद्युतपुरवठा, अघोषित भारनियमन, उघड्यावर पडलेले धोकादायक रोहित्र, तसेच तक्रारी करूनही प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष यामुळे संतप्त झालेल्या पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी मंगळवारी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तब्बल तीन तास झाडाझडती घेतली. 'जनतेला सुविधा देण्याऐवजी त्रास देण्याचे काम सुरू आहे का?' असा थेट सवाल करत आ. पठाण यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला.

महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला अधीक्षक अभियंता प्रतीक्षा शंभरकर, कार्यकारी अभियंता हेमंत पावडे, काँग्रेसचे नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत शहरातील विविध भागांतील वीज समस्यांचा अक्षरशः पाढाच वाचण्यात आला. अनेक भागांत दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत आहे. व्यापारी, विद्यार्थी, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा फटका बसत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

बैठकीत सर्वाधिक गंभीर मुद्दा ठरला तो उघड्यावर असलेल्या रोहित्रांचा. शहरातील अनेक भागांत सुरक्षाव्यवस्था नसलेले रोहित्र नागरिकांच्या जीवाशी खेळ करत असल्याची बाब नगरसेवकांनी मांडली. 'लहान मुले, नागरिक यांचा जीव धोक्यात असताना महावितरणला जाग येणार कधी?' असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला. किरकोळ अपघातांच्या घटनाही घडल्या असून भविष्यात मोठी दुर्घटना झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्नही उपस्थित झाला. याशिवाय नागरिक तक्रार घेऊन कार्यालयात गेल्यानंतर त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नसल्याच्या तक्रारींनीही बैठकीचे वातावरण तापले. काही कर्मचाऱ्यांकडून नागरिकांशी आणि लोकप्रतिनिधींशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचे आरोप करण्यात आले. या प्रकारावर आ. पठाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत 'महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी हे जनतेच्या पैशावर काम करतात, त्यामुळे जनतेशी उद्धटपणा अजिबात सहन केला जाणार नाही,' अशा शब्दांत सुनावले.

बैठकीदरम्यान अनेक प्रभागांतील प्रलंबित कामांबाबतही चर्चा झाली. खराब रोहित्र बदलणे, तारा दुरुस्ती, कमी दाबाचा प्रश्न, वारंवार खंडित होणाऱ्या लाईन्स आणि तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी करण्याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश आ. पठाण यांनी दिले. 'आठवडाभरात परिस्थितीत सुधारणा दिसली नाही तर नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशाराही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.

दरम्यान, बैठकीत उपस्थित नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनीही महावितरणच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरात मूलभूत सुविधांबाबत सातत्याने समस्या निर्माण होत असताना प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची खैरात केली जात असल्याचा आरोप करण्यात आला. या बैठकीला महेंद्र गवई, मो. इरफान, आझाद खान, फजलू पहेलवान, याकूब पहेलवान, अफसर कुरैशी, गुड्डू पठाण, आकाश कवडे, मोईन खान, आर्किटेक्ट सोहेल खान, हुसैन चौधरी, शेख अब्दुल्ला, आसिफ खान, मो. शारीक, शेख साजिद, शेख नवेद, अंकुश पाटील, राहुल सरवान, अभिजीत तवर, सैय्यद अहमद यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीमच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

### २३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ,पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल, वाशीमच्या च्या इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत इयत्ता पाचवीमधील ७ व इयत्ता आठवीमधील १६ असे एकूण २३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. इयत्ता पाचवीमधून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आयांश जैस्वाल, धनश्री इंगळे, आरोही पट्टेबहादूर, ज्ञानेश्वरी ईढोळे, शिवम बोरकर, विहान इंगळे आणि आयुष चव्हाण यांचा समावेश आहे.

तसेच इयत्ता आठवीमधील श्री उलेमाले, आराध्या पवार, सिद्धी घुगे, वेदश्री गुलाखे, स्वस्तिक मापारी, कुबेर भुरे, श्रद्धा कोंगे, मयूर छावछरीया, पुनम माहोरकर, सार्थक वानखेडे, हर्ष कवर, तन्वी ढवळे, तृप्ती घुगे, भक्ती कढणे, इशिता कंगले आणि अथर्व परळकर हे विद्यार्थी परीक्षेत पात्र ठरले आहेत.

# पाण्यासाठी समाजसेवी हरीश सारडा यांनी घेतली पद्मभूषण डॉक्टर जोशीची भेट

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

पद्मश्री आणि पद्मभूषण डॉ अनिलजी जोशी डेहराडून उत्तराखंड यांची समाजसेवी तथा वैनगंगा पैनगंगा संघर्ष समितीचे अध्यक्ष हरीश सारडा यांनी दीर्घ भेट घेतली.. यावेळी सारडा यांनी वाशिम जिल्ह्याची पाण्याची परिस्थिति सांगीतली आणि त्यांचे म्हणणे एकून अवाक झालो. आमच्या जिल्ह्यातून २१ नद्यांचे उगम झाले आहे. पण सर्व पाणि शेजारच्या जिल्ह्यात वाहुन जाते. आणि मग त्यानी त्यांची कथा सांगीतली ती अशि की एके काळी आम्ही पाण्याच्या झरण्यानी वेढ़लेले होतो.खाली गंगा वाहत होती.सर्वीकड़े सुजलाम सुफलाम.आणि अचानक आमचे झरणे , धबधबे आटायला लागले आणि पाण्याचा दुष्काळ पड़ला.

उत्तराखंड ची वस्ती हे पहाड़ावर आहे एकदम ऊँचावर आणि खाल़ी गंगा म्हणजे रोज़ सकाळ संध्याकाळ २४ तास पाणि पहा प्यायला नाही

या हरफ़न मौला ने काम सुरु केले.आणि परत झरणे जीवंत केले सर्वी कड़े पुनः पाणि , जंगल ,जंगली जनावरे ,पक्षी सर्व वैभव परत आणले.आज त्यांच्या हाताखाल़ी २० ते २५ पी एच डी झालेत.मोठे आश्रम आहे.



वाशिम ला असे काम करण्याची खुप गरज आहे. पुढ़च्या पन्नास वर्षात वाळवंट होणार आहे. आम्ही पण्यासाठी वण वण भटकणार आहोत. एकटा सचिन कुलकर्णी काम करत आहे. सारडा सारखे त्याच्या सोबत थोड़ा फार हात भार लावात आहे.

**पण एवढ्यानी होणार नाही.**

कोणी डॉ अनिल जोशी होणार आहे काय हा प्रश्न उपस्थित होत आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये पाण्यासाठी मोठी चळवळ उभारून दिशा देण्याची खरी गरज असल्याचे दोघांच्या चर्चेमधून स्पष्ट झाले.

# विद्याभारती आचार्य प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

विद्याभारती विदर्भ प्रांताच्या वतीने आयोजित आचार्य प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ मंगळवार, १९ मे रोजी रेखाताई राष्ट्रीय विद्यालय, वाशीम येथे उत्साहात पार पडला. हा निवासी प्रशिक्षण वर्ग १९ मे ते २९ मे २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन वाशीम जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी मंगलताई धुपे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विद्याभारती विदर्भ प्रांत अध्यक्ष अभियंता सचिन जोशी होते. प्रमुख उपस्थितीत विद्या भारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष विधिज्ञ सत्यानंद कांबळे तसेच विद्याभारती वाशीम जिल्हाध्यक्ष प्रा. अनिल धुमकेकर उपस्थित होते.

प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक व विद्या भारती विदर्भ-देवगिरी प्रांताचे संघटन मंत्री शैलेश जोशी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थानचा परिचय करून देत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने प्रशिक्षण वर्गात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

उद्घाटक मंगल धुपे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर निवासी आचार्य प्रशिक्षण वर्गाचे कौतुक करत नव्या शैक्षणिक धोरणाचे महत्त्व विशद केले.

दीपप्रज्वलन व वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वर्ग संचालिका निर्मला महाजन यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अनुपमा वालदूरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अनिल धुमकेकर यांनी मानले.

यावेळी विद्याभारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष प्रांजली जोशी, मंत्री रोशन आगरकर, सहमंत्री प्रा. दिलीप जोशी, रणदीप बिसणे, सुभाषजी, प्रा. रमेश आरु, प्रा. श्रीकांत जोशी आदींची विशेष उपस्थिती होती.

## श्रीमद भागवत कथा व हरिनाम सप्ताह

**अकोला :** मुर्तिजापुर तालुक्यातील शिरताळा येथे दरवर्षी प्रमाने याही वर्षी श्री महंत १००८सिताराम महाराज यांच्या कृपेने व श्री वै . समर्थ सदगुरु श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या जन्मशताब्दी निमित्य श्रीमद भागवत कथा व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह हनुमान मंदीर शिरताताळा येथे पार पडला आहे. या आध्यात्मीक सोहळ्याचा शुभारंभ शनीवार ९ मे रोजी तर सांगता शनीवार १६ मे रोजी झाली आहे. सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व ज्ञानेश्वर महाराज कळंबेश्वर यांनी केले.

# देवठाणा खांब येथील पाणी प्रश्न सुटणार

### मनसे जिल्हाध्यक्षांच्या मध्यस्थीनंतर दोन दिवसांत तोडग्याचे आश्वासन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

मालेगाव तालुक्यातील देवठाणा खांब येथील ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न आता मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. गावात पाणी मिळत नसल्यामुळे संतप्त झालेल्या महिला व पुरुषांनी आपली कैफियत मांडण्यासाठी वाशिम जिल्हा परिषद कार्यालय गाठले होते.

जिल्हा परिषदेत या ग्रामस्थांची भेट महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांच्याशी झाली. त्यांनी गावकऱ्यांच्या अडचणी अत्यंत संवेदनशीलतेने ऐकून घेतल्या. त्यानंतर किडसे यांनी तात्काळ



पुढाकार घेत ग्रामस्थांना सोबत घेऊन ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे यांची भेट घेतली.

ग्रामस्थांचे गाऱ्हाणे ऐकून घेतल्यानंतर कार्यकारी अभियंता वानखेडे यांनी या पाणी प्रश्नावर येत्या दोन दिवसांत योग्य तो तोडगा काढण्याचे ठोस आश्वासन दिले. तसेच, जलजीवन मिशनचे काम सध्या सुरू असले तरी, गावकऱ्यांची पाण्यासाठी गैरसोय होऊ नये म्हणून ठेकेदाराला तात्काळ पर्यायी व्यवस्था करण्याचे आदेश दिले. प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेनंतर प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली असून गावकऱ्यांना लवकरच पिण्याचे पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## कुटासा येथे रामकथेचे आयोजन

**अकोला :** पवित्र अधिक मास निमित्त अकोट तालुक्यातील भगवान कोटेश्वराची पवित्र नगरी कुटासा येथे प्रथमच ऐतिहासिक अश्या भव्य 'श्री रामकथा सप्ताह'चे आयोजन करण्यात आले असून यात महाराष्ट्र शासनाचा 'ज्ञानेबा-तुकोबा' पुरस्कार प्राप्त हभप संजय महाराज पाचपोर हे गावातील चार एकराच्या शेतात संगीतमय रामकथा सादर करणार असल्याची माहिती माहिती अधिक मास सार्वजनिक महोत्सव समिती, कुटासा यांच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते तथा युवक काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष कपिल ढोके यांनी दिली.

## एल निनोच्या प्रभावामुळे यंदा कमी पावसाची शक्यता

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

भारतीय हवामान विभागाने चालू वर्षामध्ये 'एल निनो'च्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची आणि त्याचे वितरण अनियमित होण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, खरीप हंगामात संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीचा फटका शेतीला बसू नये, म्हणून शेतकऱ्यांनी आतापासूनच शेती व्यवस्थापनात आवश्यक बदल करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी शेतकऱ्यांना योग्य नियोजन करण्याचे आवाहन केले आहे.

संभाव्य एल निनो परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी खालीलप्रमाणे महत्त्वाची मार्गदर्शक नियमावली जाहीर केली आहे:

कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड व टप्प्याटप्प्याने पेरणी

कमी आणि अनिश्चित पावसाच्या काळात जास्त पाणी लागणारी आणि दीर्घ कालावधीची पिके घेणे जोखमीचे ठरू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचा प्रकार आणि उपलब्ध पाण्याचा विचार करून सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या कमी कालावधीत येणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे. तसेच, कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या दुष्काळ सहनशील सुधारित वाणांचाच वापर करावा. हवामान विभागाच्या अंदाजाचा नियमित अभ्यास करून आणि पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी. पावसात मोठा खंड पडण्याची शक्यता असल्यास टप्प्याटप्प्याने पेरणी करावी.

# वाशिम अर्बन बँकेच्या रक्तदान शिबिराला भव्य प्रतिसाद

### दोनशे रक्तदात्यांनी पार पाडले राष्ट्रीय कर्तव्य

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या वाशिम अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक के च्या वतीने बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय रामकृष्ण जी उर्फ बाबाजी राठी यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित रक्तदान शिबिरामध्ये २०० च्या जवळपास रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालय शासकीय रक्तपेढी व वाशिम ब्लड बँक सेंटरच्या माध्यमातून आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई राठी यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम बँकेचे संस्थापक स्वर्गीय रामकृष्ण राठी व बँकेचे प्रेरणास्थान मार्गदर्शक सुभाषभाऊ राठी यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रजलवन करण्यात आले. सदर रक्तदान शिबिराला यवतमाळ वाशिम लोकसभा खासदार संजय देशमुख, शिक्षक आमदार एडवोकेट किरणराव सरनाईक, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे, नगरपरिषद उपाध्यक्ष राजु भांदुर्गे, नगरसेवक पुरणमल बदलानी, गटनेते गजानन पाटील दाहात्रे,



नगरसेवक नितेश राठी, नगरसेवक नितीन मडके, डॉक्टर सिद्धार्थ देवले, माजी आमदार लखन मलिक, बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई राठी, उपाध्यक्ष पुरुषोत्तम चरखा, संचालक सर्वश्री सुरेश लोध, विष्णू सोनी, सुधीर राठी, डॉक्टर राजकुमार. बी . हेडा, रमण अग्रवाल, अशोक इंनानी, राधेश्याम हेडा, राजेश सिसोदिया, कायद जोहर भाई, विपिन राठोड, बँकेचे व्यवस्थापन मंडळ संचालक एडवोकेट सज्जनसिंह चंदेल, पवन कुमार भन्साळी, कर्मचारी प्रतिनिधी तेजराव वानखेडे, हरीश राठी,वाशिम शाखा सभापती नितीन करवा, संचालक तरणसिंग सेठी, आसाराम जायभाये, जितेंद्र गोधा, निलेश सोमानी, गोपाल बंग, रामदास चांदवानी, रिसोड शाखा सभापती गोपाल काबरा, उमरखेड शाखा सभापती नारायणदास भट्टड, कारंजा शाखा समिती सदस्य शंकर पुंड, मनीष साबू, अनसिंग शाखा समिती सदस्य घनश्याम हेडा, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख, सर व्यवस्थापक राजेंद्र काळे, वाशिम शाखा प्रबंधक राजेंद्र अग्रवाल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अनिल कावरखे, रक्त संकलन अधिकारी डॉक्टर हरिदास मुंडे, डॉक्टर अनुराधा दागडिया, वाशिम ब्लड बँक सेंटरचे सुनील गट्टानि, अनिल सोळंके, डॉक्टर पंकज दागडिया, माजी संचालक मम जोशी, सुभाष गट्टानी, वाशिम जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष माधवराव अंभोरे ज्येष्ठ पत्रकार विश्वनाथ राऊत,, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाष चौधरी, राजूभाऊ चौधरी, समाजसेवक माधवराव मारशेटवर, राजस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य ओमप्रकाश झंवर, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश दाभाडे, माँ गंगा बाहेती हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर हरीश बाहेती, भाजपा शहर प्रमुख मनीष मंत्री ,सनदी लेखापाल प्रशांत लोहिया, रुपेश लड्डा, अभय चरखा, दिलीप जोशी, विशाल चांडक, रोहित हेडा, सचिन करवा, आशिष लड्डा, सुमित चांडक, कॉन्ट्रॅक्टदार राजू वर्मा, प्राचार्य प्रशांत गडेकर, समवेत मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व रक्तदात्यांना बँक व शासकीय रक्तपेढीच्या वतीने प्रमाणपत्र व बँकेच्या वतीने दुपट्टा भेट घेऊन सन्मानित करण्यात आले, गत अनेक वर्षापासून वाशीम अर्बन बँक सामाजिक बांधिलकीतून कडाक्याच्या उन्हात शासकीय रक्तपेढीमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण होत असल्याने रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करीत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७२ ■ बुधवार, २० मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# वाघिणीच्या जलदरबाराने बोर दणाणले

## बीटीआर-१६ तीन बछड्यांसह पानवठ्यात धुमाकूळ; जलक्रीडेचे थरारक क्षण कॅमेराबद्ध

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भाच्या अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हात जंगलातील प्रत्येक पाण्याचा थेंब वन्यजीवांसाठी जीवनाचा आधार ठरत असतानाच बोर व्याघ्र प्रकल्प येथील बफर जंगलाने अक्षरशः पर्यटकांना रोमांचित करून सोडले. ढगा गेटमार्गे जंगल सफारीसाठी गेलेल्या पर्यटकांना कृत्रिम पानवठ्यावर बीटीआर-१६ या रुबाबदार वाघिणीसह तिच्या तीन बछड्यांचे जलक्रीडा करतानाचे दुर्मीळ आणि हृदयस्पर्शी दर्शन घडले. जंगलाच्या शांततेत पाण्याचे उडणारे फवारे, बछड्यांची खेळकर धावपळ आणि वाघिणीची सतर्क नजरष्ठ या साऱ्या दृश्यांनी सफारीतील प्रत्येक क्षण थरारक बनविला.

यापूर्वी रहाटी गेट परिसरात बीटीआर-७ 'पिंकी' आणि आखूड शेपटीचा बीटीआर-१७ वाघ पर्यटकांच्या नजरेस पडल्याने बोर जंगलाची चर्चा रंगली होती. त्यातच आता बीटीआर-१६ व तिच्या तीन बछड्यांच्या दर्शनाने बोर व्याघ्र प्रकल्प पुन्हा एकदा वन्यजीव प्रेमींच्या आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. विशेष म्हणजे, पर्यटकांनी या जलक्रीडेचे दुर्मीळ क्षण कॅमेऱ्यात कैद केल्याने





सोशल मीडियावरही या दृश्यांची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

संपूर्ण विदर्भ सध्या उष्णतेच्या तडाख्याने होरपळून निघत आहे. जंगलातील अनेक नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडल्याने वन्यजीवांसाठी कृत्रिम पाणवठेच जीवनदायी ठरत आहेत. बांगडापूर बफर वनपरिक्षेत्रातील अशाच एका पाणवठ्यावर बीटीआर-१६ आपल्या तीन बछड्यांसह निवांतपणे विसावलेली दिसली. एका बछड्याने दुसऱ्यावर पाण्याचे फवारे उडवत खेळकर झुंज दिली, तर दुसरा पूर्णपणे निर्धास्त होऊन पाण्यात लोळत उन्हापासून दिलासा घेत होता. हिंस्त्र आणि सावध समजल्या जाणाऱ्या वाघांची ही निरागस, मोकळी आणि खेळकर बाजू पाहून पर्यटक अक्षरशः भारावून गेले.

सामान्यतः वाघ हा एकाकी आणि अत्यंत सतर्क प्राणी म्हणून ओळखला जातो. मात्र उन्हाळ्याच्या दिवसांत शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी वाघ पाणवठ्यांभोवती जास्त वेळ घालवतात. पाण्यात डुंबताना त्यांच्या स्वभावातील मोकळेपणा आणि खेळकरपणाही दिसून येतो. बोरच्या जंगलातील हे दृश्य म्हणजे वन्यजीवांच्या नैसर्गिक जीवनशैलीचा जिवंत दस्तऐवजच ठरत आहे. जंगल सफारीत असे क्षण अनुभवायला मिळणे हे पर्यटकांसाठी पर्वणी मानले जात आहे.

दरम्यान, बोर व्याघ्र प्रकल्प हा पट्टेदार वाघांच्या संवर्धनासाठी अधिक सक्षम ठरत असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. बीटीआर-१६ आणि तिच्या तीन बछड्यांचे वारंवार होत असलेले दर्शन हे जंगलातील सुरक्षित अधिवास आणि संवर्धनाच्या यशाची साक्ष मानली जात आहे. त्यामुळे विदर्भासह राज्याबाहेरील पर्यटकांची पावले आता मोठ्या प्रमाणात बोर जंगल सफारीकडे वळत आहेत.

बफर क्षेत्रातील पाणवठ्यावर बीटीआर-१६ व तिच्या तीन बछड्यांचे दर्शन झाले आहे. जंगल पर्यटनामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होत असून पर्यटकांचाही प्रतिसाद वाढत आहे, अशी माहिती सहाय्यक वनरक्षक दत्तात्रय लोंढे यांनी दिली.

# स्थानिक स्वराज्य संस्थेचे ९७७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक

### आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक १८ जून रोजी होणार आहे. यासाठी तिनही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे ९७७ कार्यरत सदस्य मतदानाचा हक्क बजावणार आहे. यात सर्वाधिक चंद्रपूर जिल्ह्यातील ४६९ सदस्य, वर्धा जिल्ह्यातील २६४ तर गडचिरोली जिल्ह्यातील २४४ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्य मतदारांचा समावेश आहे. तिनही जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा चंद्रपूर जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीबाबत आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी संजीव देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार उपस्थित होते.

सदर निवडणुकीकरीता चंद्रपूर महानगरपालिकेचे ६६ सदस्य तसेच जिल्ह्यातील १० नगर परिषदा आणि ७ नगर पंचायतीचे एकूण ४०३ असे चंद्रपूर जिल्ह्यातील ४६९ मतदार, गडचिरोली जिल्ह्यातील ३ नगर परिषदा आणि ९ नगर पंचायतींचे एकूण २४४ मतदार तर वर्धा जिल्ह्यातील १० नगर? परिषदांचे एकूण २६४ मतदार आहेत तर चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा येथील जिल्हा परिषदांच्या सदस्यांची संख्या शुन्य आहे.

वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीकरीता प्रत्येक जिल्ह्यातील उपविभागाच्या मुख्यालयी एक याप्रमाणे १७ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. तसेच मतमोजणी चंद्रपूर जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. या निवडणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग यांच्याकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षक यांची नियुक्ती केली जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी चंद्रपूर वसुमना पंत यांनी सांगितले.

# उबदा परिसरात भीषण अपघात; दोन ट्रकची समोरासमोर धडक

### ओव्हरटेकचा प्रयत्न ठरला जीवघेणा : एक चालक गंभीर जखमी, महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर सुरू असलेल्या विकासकामांमुळे उबदा परिसरात वाहतूक एकेरी मार्गाने सुरू असताना मंगळवारी दुपारी दोन ट्रकची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात एका ट्रक चालकाला गंभीर दुखापत झाली असून दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.



ही घटना मंगळवार, १९ मे रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर-हैदराबाद लेनवर दुरुस्ती व विकासकाम सुरू असल्याने संबंधित मार्गावर एका बाजूनेच वाहतूक सुरू होती. ट्रक क्रमांक आरजे ११ जीए ९९३० चे चालक बबलू खान (रा. आग्रा) हे जामकडून हैदराबादच्या दिशेने जात होते. त्याचवेळी समोरून जामच्या दिशेने येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच ४० बीजी ५०३० चे चालक संजय नथुजी सहारे (वय ३४, रा. दिघोरी नाका, नागपूर) यांनी ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, एकेरी वाहतूक सुरू असल्याने दोन्ही ट्रक एकमेकांसमोर आले आणि काही क्षणांतच भीषण धडक झाली.

धडकेचा आवाज इतका जोरदार होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. अपघातात संजय सहारे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या ट्रकचे पुढील बाजूचे मोठे नुकसान झाले. दुसऱ्या ट्रकलाही मोठा फटका बसला.

घटनेची माहिती मिळताच पीएसआय तोडासे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमी चालकाला तातडीने हिंगणघाट येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, अपघातग्रस्त दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला हटवून वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्गावरील सुरू असलेल्या विकासकामांदरम्यान वाहतूक नियंत्रणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, एकेरी मार्गावर होणारे बेदरकार ओव्हरटेकिंग अपघातांना निमंत्रण देत असल्याची चर्चा वाहनचालकांमध्ये सुरू आहे. या प्रकरणाची नोंद समुद्रपूर पोलिसांनी घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# रामनगरात 'मृत्यू'चे गूढ; रस्त्याच्या कडेला आढळला विजय कांबळे यांचा मृतदेह

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील रामनगर परिसर मंगळवारी सकाळी एका धक्कादायक घटनेने हादरला. महाकाली ट्रेडर्सजवळ रस्त्याच्या कडेला विजय विठ्ठल कांबळे (वय ५२) यांचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. नागठाणा हनुमान मंदिर, सिंदी (मेघे) परिसरातील रहिवासी असलेले विजय कांबळे हे सकाळी निपचित अवस्थेत पडलेले दिसताच नागरिकांनी एकच गर्दी केली.



घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात उत्तरिय तपासणीसाठी पाठविण्यात आला. मात्र, विजय कांबळे यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप गूढ कायम आहे.

सध्या वर्धा जिल्ह्यात प्रचंड उष्म्याची लाट उसळली असून तापमानाने अक्षरशः कहर माजविला आहे. त्यामुळे उष्माघातामुळे मृत्यू झाला की अन्य काही कारण आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. दुसरीकडे, काही नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रामनगर पोलिसांनी घटनेची नोंद घेत पुढील तपास सुरू केला असून उत्तरिय अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होणार आहे.

# मुख्यालयात राहाच, नाहीतर कारवाईला सामोरे जा

## ग्रामसभेच्या ठरावाशिवाय आता सुटका नाही; राज्य शासनाचा शासकीय कर्मचाऱ्यांना दणका

**सेलू जनमाध्यम :** ग्रामीण भागातील जनतेला शासकीय योजनांचा लाभ वेळेवर मिळावा आणि कार्यालयीन कारभारावर शिस्त बसावी यासाठी राज्य शासनाने मोठा आणि धडाकेबाज निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेमार्फत नियुक्त वर्ग-३ मधील कर्मचाऱ्यांना आता नियुक्तीच्या मुख्यालयात राहणे बंधनकारक करण्यात आले असून, ते प्रत्यक्षात मुख्यालयात राहत असल्याचा पुरावा म्हणून ग्रामसभेचा ठराव सादर करणेही सक्तीचे करण्यात आले आहे.

ग्रामविकास विभागाच्या या निर्णयामुळे वर्षानुवर्षे 'कागदोपत्री मुख्यालयात' राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. आतापर्यंत काही कर्मचारी स्थानिक सरपंचांकडून केवळ रहिवासी दाखले घेऊन शासनाची दिशाभूल करत असल्याचे प्रकार उघडकीस आले होते. प्रत्यक्षात कर्मचारी शहरात राहत आणि ग्रामीण भागातील कार्यालये 'रामभरोसे' चालत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या.

पंचायत राज समितीने २०१७-१८ च्या अनुपालन अहवालात या गंभीर प्रकाराकडे शासनाचे लक्ष वेधले होते. सरपंचांच्या वैयक्तिक दाखल्यांचा गैरवापर थांबविण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी आता थेट ग्रामसभेच्या मंजुरीची अट घालण्यात आली आहे. त्यामुळे आता ग्रामस्थांनाच कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार मिळाला आहे.

# दोन तासांत अट्टल चोरटा गजाआड

## २० घरफोड्यांचा सुपारीबाज; ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** बसस्थानक परिसरातील उपहारगृहाचे शटर फोडून चोरी करणाऱ्या भामट्याला कारंजा पोलिसांनी अवघ्या दोन तासांच्या आत धूळ चारली. विशेष म्हणजे, चौकशीत या इसमाने नागपूर, अमरावतीसह विविध भागांत केलेल्या तब्बल २० घरफोड्यांची कबुली दिल्याने पोलिसांनाही क्षणभर धक्काच बसला!

कारंजा बसस्थानक परिसरात नितीन विठ्ठल राऊत यांचे उपहारगृह आहे. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्याने उपहारगृहाचे शटर तोडले, आतील साहित्याची नासधूस केली आणि रोख पाच हजार रुपये लांबवले. सकाळी हे उघडकीस आल्यावर नितीन राऊत यांनी कारंजा पोलिस ठाण्यात धाव



घेत तक्रार नोंदवली. तक्रार हाती पडताच ठाणेदार प्रल्हाद मदन यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखले. गोपनीय सूत्रांकडून माहिती घेत पोलिसांची चमू तात्काळ सक्रिय झाली. कौशल्यपूर्ण तपास आणि गुप्त माहितीच्या जोरावर अवघ्या दोन तासांत आरोपीला रंगेहात पकडण्यात पोलिसांना यश आले.


अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव राजा खान सलीम खान असून तो नागपूर येथील बडा ताजबाग परिसरातील रहिवासी आहे. पोलिसांच्या ताब्यात आल्यावर चौकशीदरम्यान त्याने एकामागून एक गुन्ह्यांची माळच उलगडली. नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि अमरावती शहर या भागांत त्याने आतापर्यंत केलेल्या तब्बल २० घरफोड्यांची कबुली त्याने पोलिसांना दिली. आरोपीकडून पोलिसांनी एक दुचाकी, एक मोबाईल फोन, रोख पाच हजार रुपये आणि घरफोडीसाठी वापरण्याचे साहित्य असा एकूण ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही धडाकेबाज कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष कारवाईत ठाणेदार प्रल्हाद मदन, सहाय्यक पोलिस निरीक्षक सतीश जायभाये, निलेश मंडारी, नितेश मैदपवार, दिनेश घसाड, अमोल मानमोडे, श्याम गहाट, आशिष कालोकार, मंगेश मिलके आणि दशरथ मेहत्रे यांचा सहभाग होता.

# झोपेच्या डुलकीने आंब्यांचा ट्रक पलटी; महामार्गावर मध्यरात्री थरार

### बरबडीजवळील अपघातात लाखोंचे नुकसान, सुदैवाने जीवितहानी टळली

**समुद्रपूर जनमाध्यम :** जाम-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर मध्यरात्री भीषण अपघात घडला. नागपूरकडे भरधाव वेगाने निघालेला आंब्यांनी भरलेला ट्रक चालकाला आलेल्या झोपेच्या डुलकीमुळे अनियंत्रित होऊन थेट दुभाजकावर आदळला आणि पलटी झाला. बरबडीजवळ घडलेल्या या अपघाताने महामार्गावर काही काळ एकच खळबळ उडाली. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली; मात्र ट्रकसह आंब्याच्या मालाचे मोठे नुकसान झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, चालक साईनाथ रामकिसन (वय २५, रा. आदिलाबाद) हा क्लिनर शेख करीम (वय ५८) व शेख शफीक (वय २८, दोघेही रा. जैनूर, तेलंगणा) यांच्यासह टीजी ०१ टी २२५० क्रमांकाच्या ट्रकमधून आंब्याचा माल घेऊन आदिलाबादहून नागपूरकडे निघाला होता. मध्यरात्रीच्या सुमारास ट्रक जाम-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील बरबडी परिसरात पोहोचला असता चालकाला



अचानक झोपेची डुलकी आली.

क्षणातच वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव ट्रक दुभाजकावर आदळून रस्त्यावर पलटी झाला. अपघातानंतर महामार्गावर आंब्याच्या पेट्या विखुरल्या गेल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. या अपघातात ट्रकचे मोठे नुकसान झाले असून आंब्याचा मालही खराब झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच जाम महामार्ग पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. किरकोळ जखमी झालेल्या शेख करीम आणि शेख शफीक यांना रुग्णवाहिकेद्वारे ग्रामीण रुग्णालय, समुद्रपूर येथे उपचारासाठी पाठविण्यात आले. त्यानंतर प्रमोद धोटे यांच्या नेतृत्वातील पथकाने क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त ट्रक रस्त्याच्या कडेला हटवून वाहतूक सुरळीत केली.

दरम्यान, महामार्गावरील वाढत्या अपघातांमुळे चालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, रात्रीच्या प्रवासात थकवा आणि झोपेच्या डुलकीकडे दुर्लक्ष करणे किती घातक ठरू शकते, याचीच ही घटना बोलकी उदाहरण ठरली आहे.

# ओबीसी समाजाच्या विकासासाठी केंद्र-राज्य समन्वयातून योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ओबीसी समाजाचा विकास राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया, ओबीसी सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध

**मुंबई जनमाध्यम :** ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ओबीसींसाठी विविध योजनांची अंमलबजावणी गुणवत्तापूर्ण आणि परिणामकारक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.ओबीसी समाजाचा विकास हा राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

इतर मागासवर्ग कल्याण संसदीय समितीने हॉटेल ट्रायडेंट येथे भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, इतर मागासवर्ग कल्याण संसदीय समितीचे अध्यक्ष गणेश सिंह यांच्यासह समितीतील अन्य सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. राज्य शासनाने स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना करून ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांना गती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना १०० टक्के फी सवलत देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

ओबीसी विभागामार्फत आश्रमशाळा चालविण्यात येत असून ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी एकूण ७२ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून यासाठी इतर मागासा बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वयंम' योजना सुरू करण्यात आली असून या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना राहणीमान आणि शिक्षणासाठी ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. महाज्योती संस्थेमार्फत यूपीएससी आणि एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून यूपीएससीमध्ये २९ तर एमपीएससीमध्ये ११८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत युवकांना १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून या कर्जाला शासन हमी देते. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ न मिळालेल्या घटकांसाठी 'मोदी आवास योजना' सुरू करण्यात आली असून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. याशिवाय सौरऊर्जेसाठी स्वतंत्र अनुदान दिले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ओबीसी कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता अधिक वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून समितीकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात येतील असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.


## कार्यालय ग्राम पंचायत बाभुळगांव
## पंचायत समिती सेलु, जिल्हा परिषद वर्धा

सर्व नोंदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, ग्रामपंचायत बाभुळगांव येथे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पाणी टंचाई अंतर्गत मंजूर प्राकलनानुसार पंजीबध्द कंत्राटदारांकडून सिलबंद निविदा दिनांक २०.०५.२०२६ ते २७.०५.२०२६ पर्यंत स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | ता.क्र. | रक्कम | निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|
| १. | नळ पाणी पुरवठा दुरुस्ती, बाभुळगांव | ३७४ | १८८२९५/- | ग्रा.पं.मासिक सभा |
| २. | पाणी पुरवठा टाकी व पाईप लाईन दुरुस्ती | ३७५ | ४६६३१८/- | मासिक सभा |

**अटी व शर्ती -**

१) ग्रामपंचायतच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.

**स्वाक्षरी/-**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत बाभुळगांव**
**पंचायत समिती सेलु, जि.वर्धा**

**झाडे लावा, झाडे जगवा**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## देशाला 'संपन्न उर्जा' राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे बळ मिळणार- मुख्यमंत्री

# राज्य शासनाचा अणुउर्जा निर्मितीसाठी कंपन्यांशी सामंजस्य करार

- 25, 400 मेगावॅट अणुउर्जा व 1,23,500 रोजगार निर्मिती
- एकूण गुंतवणूक 6,50,000 कोटी



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न उर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ उर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न उर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्तकेला. राज्यात अणुउर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुउर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पावर कार्पोरेशन लिमिटेड), अदानी पावर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पावर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ उर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ उर्जा निर्मितीमध्ये अणुउर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य उर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ उर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ उर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे. कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.याप्रसंगी उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व कंपन्यांच्या संबंधित अधिका-यांमध्ये करारांचे आदान-प्रदान करण्यात आले.

**करारामुळे होणारी अणुउर्जा व रोजगार निर्मिती-** अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून ६ हजार मेगावॅट उर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांचीगुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट उर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट उर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट उर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी उर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

## राज्यातील 15 जिल्ह्यांतील 633 गावे, 1652 वाड्यांमध्ये 706 टँकरद्वारे पाणीपुरवठा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्याअसून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे. दिनांक ११ मे ते १७ मे २०२६ दरम्यानच्या कालावधीतील अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे. ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू



आहे.छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही. राज्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायती आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांना नियमित आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून टँकर पुरवठ्याबरोबरच पर्यायी जलस्त्रोतांचा वापर, विहिरींचे अधिग्रहण आणि जलसाठ्यांचे नियोजन यावरही भर दिला जात आहे. आगामी काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेउन प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## यूपीएससी वन सेवा परीक्षेत बार्टीच्या विद्यार्थ्यांनी मिळवले यश

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत मार्गदर्शन घेतलेल्या दोन विद्यार्थ्यांनी संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय वन सेवा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ४ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या अंतिम निकालात कबीर राहुल कांबळे यांनी १२५ वा तर अक्षय विजय बर्हे यांनी १४० वा क्रमांक मिळवत यश प्राप्त केले. या दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय बार्टी संस्थेकडून मिळालेल्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्याला दिले आहे. बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना यूपीएससी पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा तसेच मुलाखत चाचणीच्या तयारीसाठी प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य दिले जाते. भारतीय वन सेवा २०२५ मुख्य परीक्षेसाठी ५२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात आले होते, तर त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी मुलाखत आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या विविध टप्प्यांवर बार्टी संस्थेकडून तज्ज्ञ मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करण्यास मोठी मदत झाली.बार्टीच्या मार्गदर्शनाखाली यश संपादन करून प्रशासकीय सेवेत प्रवेश करणा-या या दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे 'बार्टी'च्या महासंचालक दीपा मुधोळ-मुंडे, निबंधक डॉ. सुचिता शिंदे आणि विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## शेतक-यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती दूर करण्याची कार्यवाही करा - कृषि मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कृषि क्षेत्राच्या डिजिटलायझेशनसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतक-यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती संबधित सर्व यंत्रणांनी दूर कराव्यात, असे निर्देश कृषि मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. विधानसभा सदस्य विजयसिंह पंडीत यांनी शेतक-यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक विसंगती दूर करण्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती यासंदर्भात बैठकीत कृषि मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार विजयसिंह पंडित, सचिव परिमल सिंह, व्हिसीव्दारे कृषि आयुक्त सूरज मांढरे, ॲग्रीस्टॅकचे संचालक अंकुश माने, उपसचिव श्रीकांत आंडगे, यासह बीड जिल्ह्यातील अधिकारी बैठकीला उपस्थित होते. कृषि मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, गेवराई विधानसभा मतदार संघातील फार्मर आयडी संदर्भातील त्रु टींवर तातडीने संबधित सर्व कार्यान्वयिन यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. शेतक-यांच्या ८ अ उता-यावरील क्षेत्राची नोंद फार्मर आयडीवर घ्यावी. मोबाईल नंबर जर चुकीचा असल्यास त्यात दुरूस्ती करावी.ज्या शेतक-यांच्या नावावर जमीन आहे त्याचेच क्षेत्र नोंद करावी.

## ई-चलन संदर्भातील मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊ-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत भेट घेउन ई-चलन प्रणाली, वेगमर्यादा नियम, एएनपीआर कॅमेरे तसेच दंड आकारणी संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाहतूकदारांच्या मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीचे अध्यक्ष प्रदीप राठोड, सदस्य मनोज चौगुले, महेंद्र काळभोर, पंकज त्रिपाठी, अशोक शिंदे, गौरव कुसाळे, रफिक रावथर, अशोक कुचकोरवी, राजु ढाले, सुनील मगदुम आदी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात जुन्या ई-चलनांची सरसकट

**वाहतूकदारांना न्याय देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणार**

रद्दबातल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेगमर्यादेचा पुनर्विचार, एएनपीआर कॅमे-यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा, वाहनांमधील अंतराच्या नियमांमध्ये व्यवहार्य बदल तसेच दंडावरील चक्रवाढ पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहतूक व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वाहतूकदारांच्या अडचणी शासन गंभीरपणे ऐकत असून, नियमांची अंमलबजावणी करताना अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल. ई-चलन आणि वेगमर्यादा संदर्भातील तक्रारींबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर अहवाल मागवून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. तसेच, रस्ते सुरक्षा अबाधित ठेवत वाहतूकदारांना दिलासा मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या पदाधिका-यांनी यावेळी या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्तकेली.

# ओबीसी समाजाच्या विकासासाठी केंद्र-राज्य समन्वयातून योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी- मुख्यमंत्री







- ओबीसी समाजाचा विकास राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया
- ओबीसी सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ओबीसींसाठी विविध योजनांची अंमलबजावणी गुणवत्तापूर्ण आणि परिणामकारक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.ओबीसी समाजाचा विकास हा राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

इतर मागासवर्ग कल्याण संसदीय समितीने हाटेल ट्रायडेंट येथे भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, इतर मागासवर्ग कल्याण संसदीय समितीचे अध्यक्ष गणेश सिंह यांच्यासह समितीतील अन्य सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. राज्य शासनाने स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना करून ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांना गती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य तसेच उच्च शिक्षण घेणा-या मुलींना १०० टक्के फी सवलत देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

ओबीसी विभागामार्फत आश्रमशाळा चालविण्यात येत असून ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी एकूण ७२ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून यासाठी इतर मागासा बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंम योजना सुरू करण्यात आली असून या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना राहणीमान आणि शिक्षणासाठी ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. महाज्योती संस्थेमार्फत यूपीएससी आणि एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून यूपीएससीमध्ये २९ तर एमपीएससीमध्ये ११८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती त्यांनी दिली. स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत युवकांना १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून या कर्जाला शासन हमी देते. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ न मिळालेल्या घटकांसाठी मोदी आवास योजना सुरू करण्यात आली असून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. याशिवाय सौरउर्जेसाठी स्वतंत्र अनुदान दिले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ओबीसी कल्याणासाठी राबविण्यात येणा-या योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता अधिक वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून समितीकडून प्राप्त होणा-या सूचनांचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात येतील असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

## धार्मिक स्थळांवरील सोने सरकार दरबारी जमा होणार?

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून विविध प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अशा बातम्या आणि पोस्ट्स व्हायरल होत होत्या. यामध्ये भारत सरकार देशातील मंदिर ट्रस्ट किंवा धार्मिक संस्थांकडे असलेल्या सोन्याच्या साठ्याचे मुद्रीकरण करण्यासाठी एक नवीन योजना आणण्याच्या तयारीत आहे. या योजनेंतर्गत मंदिरांचे सोने जमा करून घेउन त्याबदल्यात सरकार मंदिरांना सोन्याचे बाँड्स देणार आहे



असा दावा केला आहे. या दाव्यांमुळे नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू होती.दरम्यान देशातील मंदिरांच्या ताब्यातील सोन्याचे मुद्रीकरण करण्याबाबत आणि त्याबदल्यात मंदिरांना गोल्ड बाँड्स देण्याबाबत सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांवर केंद्र सरकारने मंगळवार दि. १९ मे रोजी अधिकृतपणे पडदा टाकण्याचा प्रयत्न केला असून केंद्रीय वित्त मंत्रालयाने एक विशेष पत्रक प्रसिद्ध करून, असे सर्व दावे पूर्णपणे खोटे, दिशाभूल करणारे आणि आधारहीन असल्याचे स्पष्ट केले आहे. देशातील मंदिर ट्रस्ट किंवा कोणत्याही धार्मिक संस्थेकडील सोन्यासाठी मुद्रीकरण योजना सुरू करण्याचा सरकारचा कोणताही विचार किंवा प्रस्ताव नाही. या स्वरूपाच्या सर्व चर्चा निव्वळ अफवा आहेत. स्ट्रॅटेजिक गोल्ड रिझर्व्हचा दावाही फेटाळला असून मंदिरांचे कळस, दरवाजे किंवा इतर संरचनेवर लावलेल्या सोन्याच्या थरांना भारताचे स्ट्रॅटेजिक गोल्ड रिझर्व्ह मानले जाणार असल्याचा दावाही काही पोस्ट्समध्ये करण्यात आला होता. सरकारने हा दावाही पूर्णपणे चुकीचा आणि निराधार असल्याचे म्हटले आहे.दरम्यान केंद्र सरकार मंदिरांमधील सोन्याच्या साठ्याच्या बदल्यात मंदिरांना सुवर्ण रोखे जारी करण्याचा विचार करत आहे किंवा मंदिरांच्या सोन्याच्या साठ्याचे मुद्रीकरण करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे, असे दावे करणा-या काही बातम्या प्रसारमाध्यमांमधून आणि सोशल मीडिया पोस्ट्समधून फिरत आहेत. देशातील मंदिर विश्वस्त संस्था किंवा कोणत्याही धार्मिक संस्थांकडे असलेल्या सोन्यासाठी मुद्रीकरण योजना सुरू करण्याचा सरकार विचार करत असल्याचे अंदाज आणि अफवा पूर्णपणे खोट्या, दिशाभूल करणा-या आणि कोणताही आधार नसलेल्या आहेत.

**नागरिकांना सरकारचे आवाहन-**प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने देशातील नागरिकांना अशा प्रकारच्या कोणत्याही अपु-या आणि असत्य माहितीवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. अशा प्रकारच्या पडताळणी न केलेल्या बातम्यांमुळे समाजात विनाकारण संभ्रम निर्माण होतो आणि जनतेची दिशाभूल होते असे सरकारने म्हटले आहे.

**सरकारी माध्यमांवर विश्वास ठेवा-**कोणत्याही सरकारी धोरणात्मक निर्णयांची किंवा योजनांची माहिती घेण्यासाठी नागरिकांनी फक्त अधिकृत प्रेस रिलीज, सरकारी संकेतस्थळे आणि प्रमाणित शासकीय माध्यमांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहनही या पत्रकात करण्यात आले आहे.

## DCM शिंदे दिल्लीला रवाना

- राजकीय घडामोडींना वेग
- चर्चेला उधाण

**मुंबई/प्रतिनिधी :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या नियोजित दिल्ली दौ-यासाठी खासगी विमानाऐवजी एअर इंडियाच्या प्रवासी विमानातून करण्याचा निर्णय घेतला. दुपारी ४ वाजता एअर इंडियाच्या प्रवासी विमानाद्वारे मुंबईहून दिल्लीला रवाना झाले. जागतिक बाजारपेठेत तेलाचा किंमती वाढल्याने भविष्यातील धोका



ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीचा संदेश दिला होता. या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी देशातील आपल्या राजकीय सहका-यांनाही केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत विशेष बैठक घेउन राज्यातील सर्व मंत्र्यांसाठी नियमावली जाहीर केली होती. एकनाथ शिंदे यांचे मुंबई विमानतळावर उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी अनेकांनी त्यांच्यासोबत फोटो काढून घेतले. तर काहींनी त्यांना भेटून आपले निवेदन त्यांच्या हाती दिले. या सर्वांना भेटून त्यांचे अभिवादन स्वीकारत एकनाथ शिंदे यांनी विमान गाठले. केंद्रीय नगरविकास विभागाच्या वतीने दिल्लीत स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० ची विशेष आढावा बैठक दिल्लीत आयोजित केली आहे. या बैठकीत सहभागी होण्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना झाले. ते स्वतः या बैठकीत सहभागी होणार आहेत. एरवी खासगी विमानाने प्रवास करणा-या शिंदे यांनी यावेळी मात्र सर्वसामान्य नागरिकाप्रमाणे प्रवासी विमानाने दिल्लीला जाण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी तत्काळ ईव्ही गाडी वापरण्याचा निर्णय घेतला. तसेच आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी केली. हेलिकाप्टरने होणारे आपले दौरे कमी केले असून, आता तर खासगी विमानाने प्रवास न करता एअर इंडियाच्या प्रवासी विमानाने प्रवास करण्याला प्राधान्य दिले आहे.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत माही मोहोडची भरारी

- दहावीत 88 टक्के गुण
- अभियंता होण्याचे स्वप्न



**अमरावती / प्रतिनिधी-** प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर लुम्बिनी नगर येथील कु.माही गणेशराव मोहोड हिने दहावीच्या परीक्षेत तब्बल ८८ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे परिसरात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अत्यंत साध्या परिस्थितीत शिक्षण घेत असताना माहीने सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले. तिच्या या यशामागे कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि चिकाटीची मोठी साथ लाभली. माहीच्या यशाबद्दल शाल व पुष्पगुच्छ देउन तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी कु. वंदना गोपाळे, आजी ज्योती गोपाळे, आई वैशाली मोहोड, पत्रकार मंगेश तायडे, दिनेश खडसे, प्रवीण गोपाळे, वृषाली चव्हाण, सुहानी मोहोड आदी उपस्थित होते. उपस्थितांनी माहीच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत तिच्या जिद्दीचे कौतुक केले.यावेळी माही मोहोड हिने भविष्यात अभियंता बनून समाजासाठी कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. तिने आपल्या यशाचे श्रेय हॉलीक्रॉस शाळेतील शिक्षिका व शिक्षकवृंद तसेच गजभीये सर यांना दिले. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसमोरही प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

## रशियन राष्ट्राध्यक्ष पुतिन सप्टेंबरमध्ये भारतात येतील

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन याच वर्षी सप्टेंबरमध्ये भारतात येणार आहेत. रशियन सरकारने मंगळवारी सांगितले की, पुतिन १२ आणि १३ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणा-या BRICS परिषदेत सहभागी



होतील.पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना डिसेंबर २०२५ मध्ये त्यांच्या भारत दौ-यादरम्यान परिषदेत सहभागी होण्यासाठी अधिकृतपणे निमंत्रण दिले होते. एका वर्षाच्या आत पुतिन यांचा हा दुसरा भारत दौरा असेल. पंतप्रधान मोदीही याच वर्षी रशिया दौ-यावर जाणार आहेत. यापूर्वी पुतिन डिसेंबर २०२५ मध्ये भारतात आले होते. त्यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदींसोबत २३व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेत भाग घेतला होता. २०२५ चा दौरा विशेष मानला गेला होता, कारण युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर पुतिन यांचा हा पहिला भारत दौरा होता. यापूर्वी ते शेवटचे २०२१ मध्ये नवी दिल्लीत आले होते. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन ४ डिसेंबर २०२५ रोजी भारतात पोहोचले होते. त्याचवेळी दिल्ली विमानतळावर उतरल्यानंतर ते पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत पालम विमानतळावरून एकाच टोयोटा एसयूव्हीमधून पंतप्रधान निवासस्थानाकडे रवाना झाले होते.रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन ४ डिसेंबर २०२५ रोजी भारतात पोहोचले होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## संकटाची चाहूल

जागतिक पातळीवरील तेलाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी देशातील जनतेने खर्चात काटकसर करावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. पंतप्रधानांनी देशातील १४० कोटी जनतेला सावध केले आणि इंधन वाचवा, खाद्यतेलाचा वापर कमी करा, विनाकारण परदेश प्रवास करू नका, वर्षभर सोने खरेदी टाळा, विजेच्या वापरात बचत करा, सार्वजनिक वाहनांतून प्रवास करा, असे आवाहन केले. पंतप्रधानांनी केलेले आवाहन म्हणजे जागतिक संकटाची चाहूल आहे. देशातील जनतेचे पालक या नात्याने पंतप्रधानांनी जनतेला सावध केले. देशात पेट्रोल-डिझेल, घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडर, सीएनजीच्या किमतीत पाठोपाठ वाढ झाली.अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यात चालू असलेल्या युद्धाच्या झळा महागाईच्या रूपाने भारतात सामान्य लोकांच्या घरापर्यंत पोहोचल्या आहेत. युद्ध २८ फेब्रुवारीला सुरू झाले. कच्च्या तेलाचे भाव भरमसाट वाढल्याने जगातील बहुतेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. जगात बहुसंख्य देशांमध्ये इंधनाच्या किमतीत यापूर्वीच ३५ ते ५५ टक्के वाढ झाली आहे. पण भारतात तुलनेने कमी व बरीच उशिरा वाढ झाली. पाच राज्यांत विधानसभा निवडणुकांचा प्रचार चालू असताना केंद्र सरकारला युद्धाच्या झळा देशात सामान्यांच्या स्वयंपाकघरात पोचतील याची आठवणही नव्हती, अशी टीका विरोधी पक्षाने केली आहे. युद्धामुळे सारे देश होरपळून निघत आहेत. अनेक देशांची अर्थव्यवस्था रुळावरून घसरली आहे. इंधनाचे दर वाढले म्हणून मोदी सरकारवर राजकीय चिखलफेक करण्याची ही वेळ नव्हे, हे विरोधी पक्षाला समजत नसेल तर हे दुर्दैव म्हणावे लागेल. जनतेला काटकसर करण्याचे आवाहन करणे, पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाला साथ देणे, महागाई नियंत्रणाखाली कशी राहील यावर उपाय सुचवणे, जनता व सरकार यांच्यात समन्वय साधणे ही भूमिका विरोधी पक्षांकडून अपेक्षित आहे. महागाईच्या जागतिक संकटाला तोंड देण्यासाठी जनतेला दिलासा देणे हेही महत्त्वाचे आहे. महागाईच्या झळा हा काही राजकारणाचा विषय नाही.देशातील लहान-मोठ्या शहरांमध्ये मोटारींची संख्या कित्येक लाखांमध्ये आहे. नवी दिल्ली, मुंबईसारख्या महानगरात तर मोटारींच्या झालेल्या गर्दीने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बस किंवा मेट्रोमधून प्रवास करण्याची हीच वेळ आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला तर इंधनाची मोठी बचत होऊ शकते. स्वतः पंतप्रधानांनी दिल्लीत दोनच मोटारी ताफ्यात बरोबर घेतल्या आहेत. इतरवेळी पंतप्रधानांच्या ताफ्यात पन्नास-साठ मोटारी असतात. या परंपरेला त्यांनी स्वतःच छेद दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन दिवसांपूर्वी मुंबईत चक्क मोटार बाईकवरून विधान भवनात आले. पिंपरी-चिंचवडच्या महापौर व आयुक्त हे तर सायकलवरून कार्यालयात आले. मुख्यमंत्री पुण्याहून बंगळूरला जाताना प्रवासी विमानाने गेले. खासगी व चार्टर्ड विमानांचा वापर आता मुक्तपणे करता येणार नाही, असा आदेशच मुख्यमंत्र्यांनी काढला आहे, हे स्वागतार्ह आहे. तसेच एकाच कार्यक्रमाला एकाचवेळी अनेक मंत्र्यांनी जाणेही टाळले पाहिजे. सत्तेच्या परिघातील उच्चपदस्थांनी मोटारीचे ताफे बरोबर घेऊन फिरणे लोकांना आजघडीला आवडणार नाही. भाजपची सत्ता असलेल्या अनेक राज्यांत मंत्र्यांनी व राज्यपालांनीसुद्धा त्यांच्या ताफ्यातील सरकारी वाहनांची संख्या निम्मी केली आहे. जर स्वतः पंतप्रधान एस्कॉर्ट म्हणून त्यांच्याबरोबर एकच मोटार घेतात, मग अन्य राज्यांत मंत्र्यांना जास्त मोटारींची गरजच काय? महागाईचे मोठे संकट येऊ घातले असताना राज्यकर्ते व नोकरशहा यांनीही इंधन वापराबाबत काटकसर केली पाहिजे व जनतेला तसा आदर्श घालून दिला पाहिजे.देशातील जनतेला काटकसरीचे आवाहन करून पंतप्रधान चार दिवसांच्या विदेश दौऱ्यावर रवाना झाले म्हणून विरोधी पक्षांनी लगेचच टीका केली. पण पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रपती अल नाहयान यांच्यात द्विपक्षीय झालेल्या बैठकीत भारत व संयुक्त अरब अमिराती (यूएई) यांच्यात एलपीजी पुरवठ्यासह पाच करार केले. सध्याच्या परिस्थितीत एलपीजी पुरवठ्याविषयी झालेला करार भारतासाठी मौल्यवान आहे. पंतप्रधान किंवा उच्चपदस्थांचे विदेश दौरे व कार्यक्रम अगोदर ठरलेले असतात, ते काही ऐनवेळी ठरत नाहीत, याचेही भान विरोधी पक्षाला नसावे याचे आश्चर्य वाटते. पंतप्रधान विदेश दौऱ्यावर भारताच्या भल्यासाठी गेले होते, हे त्यांनी तेथे केलेल्या करारानंतर स्पष्ट झाले आहे. युद्धाचा परिणाम म्हणून इंधनाचे दर वाढले आहेत. कदाचित नजीकच्या काळात ते आणखी वाढण्याची शक्यता आहे. अशा वेळी विरोधकांनी राजकीय चष्म्यातून या विषयाकडे पाहणे जनहिताचे नाही. सोने आणि तेल यांच्या आयातीवर देशाचे सर्वाधिक परकीय चलन खर्च होते. भारत ७० ते ७५ टक्के तेल आयात करतो.गेल्या वर्षी ११ लाख ६६ हजार कोटी तेलाच्या आयातीवर खर्च झाले. तसेच सोने ९० टक्के आयात केले जाते. गेल्या वर्षी सोन्याच्या आयातीवर ६.४ लाख कोटी खर्च झाले. सोने व तेल यांच्या आयातीत कपात झाली तर भारताचे परकीय चलन वाचू शकेल. इंधन दरवाढीचा परिणाम म्हणून राज्यातील एसटी बसच्या तिकिटातही वाढ करावी लागेल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संकेत दिले आहेत. इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढणार व भाजीपाला, अन्नधान्य, औषधे, डिलिव्हरी सेवा, खाद्यपदार्थ आदी जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होणे अटळ आहे. गेल्या तीन महिन्यांत देशातील तीन प्रमुख तेल कंपन्यांचा तोटा दरमहा एक लाख २० कोटींवर पोहोचला आहे. सहा महिने असाच तोटा झाला तर या कंपन्या दिवाळखोरीकडे जाण्याची भीती आहे. सध्या केवळ तीन टक्के इंधनाचे दर वाढले आहेत. नजीकच्या भविष्यात पेट्रोल-डिझेल १५ ते १८ रुपये वाढण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. काटकसर, स्वदेशी पर्यायांचा वापर आणि ऊर्जा बचतीची सवय यामुळेच देशावर येणारा आर्थिक ताण काही प्रमाणात कमी होऊ शकतो. संकटाच्या काळात संयम, जबाबदारी आणि राष्ट्रीय हिताची जाणीव ठेवून प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका पार पाडणे हीच काळाची गरज आहे.

**साखर निर्यातबंदीच्या फेरविचाराची मागणी आता राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानेच केली आहे. ती मान्य झाली, तर लाभ साखर कारखान्यांना होणार आहे. पण 'सहकारी' साखर कारखान्यांना होणारे हे लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात का, हा प्रश्न आहे. अशा स्थितीत, यंदा सरकारने ऊस दर किंवा 'एफआरपी' ठरवण्यासाठी ठरवलेल्या नव्या सूत्रामुळे कोणता बदल होणार.**

# ऊस उत्पादक शेतकऱ्याला जागरुक राहावेच लागेल

'एफआरपी' म्हणजेच 'फेअर ॲण्डरेम्युनरेटिव्ह प्राइस' ऊस दराबाबत नेहमी वापरला जाणारा शब्द- याला मराठीत 'रास्त आणि किफायतशीर दर' म्हटले जाते. सोप्या शब्दांत सांगायचे तर, एफआरपी म्हणजे साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाला दिलेला प्रति टन दर. उसाचा एकूण उत्पादन खर्च आणि त्यावरील साधारण १५ टक्के नफा गृहीत धरून 'एफआरपी' ठरवला जातो, म्हणून त्याला 'रास्त' म्हणायचे. पण साखरेच्या प्रत्येक हंगामासाठी हा 'रास्त आणि किफायतशीर भाव' (एफआरपी) निश्चित करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. केंद्र सरकारच्या कृषी आयोगाकडून हा दर ठरवला जातो. कायद्यानुसार साखर कारखाने 'एफआरपी'पेक्षा कमी दर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देऊ शकत नाहीत. 'एफआरपी'मुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के जास्त परतावा मिळणे अपेक्षित असते. एक टन उसापासून ९० किलो साखर (साधारणतः ९ टक्के) तयार होईल, असे गृहीत धरले जाते. ९ टक्के 'साखर उतारा' हा पायाभूत समजला जातो. त्या आधारे प्रति टन उसाची किंमत काढली जाते. वास्तविक प्रत्येक साखर कारखान्याचा 'साखर उतारा' हा वेगळा असतो.केंद्र सरकारने गाळप हंगाम २०२६-२७ वर्षासाठी १०.२५ टक्के साखर उताऱ्यावर प्रति क्विंटल ३६५ रुपये ऊस दर निश्चित केला आहे (म्हणजे प्रति टन ऊस दर (एफआरपी) ३६५० रुपये). केंद्र सरकारच्या माहितीनुसार, २०२६-२७ हंगामासाठी ऊस उत्पादन खर्च सुमारे १८२ रुपये प्रति क्विंटल आहे. त्याच्या तुलनेत जाहीर केलेला एफआरपी १००.५ टक्क्यांनी अधिक आहे. तसेच हा दर चालू २०२५-२६ हंगामापेक्षा २.८१ टक्क्यांनी जास्त आहे. असा केंद्र सरकारचा दावा आहे!

मात्र तो कितपत खरा? गेल्या वर्षभरात शेतीच्या मशागतीची साधन-सामग्री-मजुरी, त्याचबरोबर खते, तणनाशक, कीटकनाशके यामध्ये ३५ टक्क्यांपेक्षा अधिक दरवाढ झाली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान ४५०० रुपये प्रति टन ऊस दर १० टक्के साखर उताऱ्यावर द्यावा, ही मागणी स्वामिनाथन आयोगाचे सदस्य राहिलेले अतुलकुमार अंजान करत आहेत. केंद्र सरकारने उसाची एफआरपी जाहीर करताना, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीतील तरतुदीनुसार 'सी २ ५० टक्के' हे सूत्र वापरण्याऐवजी 'ए २ एफ एल' या सूत्राचा आधार घेतला आहे ('ए २ एफ एल' या सूत्रामध्ये बी-बियाणे, खते, तणनाशक, कीटकनाशके अशा सर्वच निविष्ठांवरील खर्च तसेच शेतकरी कुटुंबातील व्यक्तींच्या मजुरीचा समावेश असतो. तर 'सी २ ५० टक्के' या सूत्रामध्ये या सगळ्यांबरोबरच यंत्रसामग्री, इतर भांडवली गोष्टीं वरील व्याज अधिक ५० टक्के नफा गृहीत धरलेला असतो.).२०१७-२०१८ पर्यंत एफआरपीसाठी ९.५ टक्के साखर उतारा धरला जात असे. त्यानंतर तो १० टक्के करण्यात आला. २०२२-२०२३ साठी तो १०.२५ टक्के करण्यात आला आणि यावर्षी तोच कायम राखण्यात आला आहे.साखर उतारा नोंदवण्यासाठी कोणतीही स्वतंत्र यंत्रणा केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने स्थापन केलेली नाही. यामुळे साखर कारखाने स्वतःहून जो काही साखर उतारा नोंदवतात त्यालाच आधारभूत मानून ऊस दर निश्चित केला जातो. ऊस दराचे नवे सूत्र यंदाच्या गाळप हंगामापासून लागू करण्यात आले आहे. मागील हंगामातील साखर उताऱ्यानुसार ऊस दर देण्याची पद्धत रद्द करून त्याऐवजी चालू गाळप हंगामातील साखर उतारा ग्राह्य धरला जाणार आहे.

केंद्र सरकारने चालू गाळप हंगामासाठी १०.२५ टक्के साखर उताऱ्याकरिता ३६५० रुपये प्रति टन ऊस दर जाहीर केला आहे. यासाठी साखर कारखान्यांच्या मागील दोन गाळप हंगामांतील ऊसतोडणी आणि वाहतूक खर्चाची सरासरी काढली जाणार आहे. ही सरासरी यंदाच्या ३६५० रुपये प्रति टन या एफआरपीतून (१०.२५ टक्के साखर उतारा) वजा करण्यात येईल (राज्यात ऊसतोडणी, वाहतूक, त्याचे व्यवस्थापन आणि त्यावरील एकूण खर्च यांचा सरासरी प्रति टन खर्च काढून, कारखाना व्यवस्थापन उसाच्या एफआरपी रकमेतून याची कपात करतो आणि उर्वरित रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देतो.).



हंगामाच्या या सुरुवातीला ऊस उत्पादक शेतकऱ्यांना या सूत्रानुसार एफआरपी दिली जाणार आहे.ऊस पिकासाठी रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार 'रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्म्युला' लागू आहे. याचा अर्थ उसापासून साखर कारखान्यांनी केलेल्या विविध उप-उत्पादना (मळी, बायोगॅस, इथेनॉल, अल्कोहोल, सह-वीजनिर्मिती) पासून झालेल्या नफ्यातदेखील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाटा दिला पाहिजे! पण या धोरणाची योग्य अंमलबजावणी आजपर्यंत करण्यात आलेली नाही.

हाताने ऊसतोडणी केल्यास, उसाचे 'वाढे' (पाचट) घेतले जात नाही. त्यांचा वापर जनावरांना खाद्य म्हणून केला जातो. मात्र 'हार्वेस्टर'ने (ऊसतोडणी यंत्र) ऊसतोडणी केल्यास पाचटासकट ऊस तोडला जातो. पर्यायाने 'हार्वेस्टर'ने तोडलेल्या उसाचे वजन जास्त भरते. परंतु त्यात पाचट असल्याने अंदाजे पाचटाचे वजन ठरवून साखर कारखाने मनमानी करत असत. यासाठी कोणतेही प्रमाण नसल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दाद मागता येत नव्हती. साखर आयुक्तालयाने फेब्रुवारी २०२१ मध्ये, ऊसतोडणी यंत्राने तोडणी केल्यास येणाऱ्या पाचटाचे वजन निश्चित करण्याकरिता अभ्यास गट नेमला होता. या अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालावर अप्पर मुख्य सचिव (सहकार व पणन) यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली.त्यानुसार 'हार्वेस्टर'ने तोडणी केलेल्या उसाच्या वजनातून सरसकट ४.५ टक्के पाचटाचे वजन वजावट करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. ही वजावट आणखी कमी असावी अशी शेतकरी संघटनांची मागणी आहे.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने, 'साखर कारखान्यांनी प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्याला समान दर दिला पाहिजे' असा आदेश दिला होता. त्यास अनुसरून साखर आयुक्तालयानेही 'एकसमान ऊस दर' द्यावा असे आदेश साखर कारखान्यांना दिले. यानंतरही राज्यातील आणि पुणे जिल्ह्यातील साखर कारखाने सभासद शेतकरी आणि बिगरसभासद शेतकरी यांना वेगवेगळे ऊस दर देत आहेत. या संदर्भातील पहिला आदेश साखर आयुक्तालयाने २०१३ साली काढला होता. त्यानंतरही अनेक साखर कारखाने सभासद शेतकरी आणि बिगरसभासद शेतकरी यांना वेगवेगळ्या दरांनी उसाची देयके देत आहेत, अशा तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे साखर आयुक्तालयाने पुन्हा २०१९ मध्ये नव्याने परिपत्रक काढून, 'तोडणी आणि वाहतूक खर्च वगळून सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना, सभासद आणि गेटकेनधारक अशी वेगवेगळी वर्गवारी न करता उसाचे पैसे समान पद्धतीने चुकते करावेत,' असा स्पष्ट आदेश काढला. परंतु आजही साखर कारखाने सभासद शेतकरी आणि बिगरसभासद (गेटकेनधारक) अशी वेगवेगळी वर्गवारी करतात. साखर कारखान्याचा सभासद शेतकऱ्यांपेक्षा, बिगरसभासद शेतकऱ्यांना प्रति टनामागे २०० ते ३०० रुपये कमी मिळतात. गेटकेनधारकांचा ऊस लांबून आणला, कमी साखर उताऱ्याचा आणला अशी सबळ कारणे साखर कारखान्यांकडे असली तरी अशी वर्गवारी करता येत नाही. आता साखर कारखान्यांनी, 'सभासद शेतकरी आणि बिगरसभासद शेतकरी यांच्यात वर्गवारी करता येणार नाही' या नियमातून पळवाट शोधली आहे! बिगरसभासद ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी (गेटकेनधारक) जर संबंधित कारखान्याशी आधीच करार केला, तर मात्र वेगवेगळे ऊस दर देता येत आहेत.

थोडक्यात, राज्यातील साखर उद्योग आज अशा वळणावर आहे की, कारखाना 'सहकारी' आहे म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे कल्याण होईलच असे नाही. त्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाच जागरुक राहावे लागेल.

**पद्माकर कांबळे**

# शेतीव्यवस्था असेल स्मार्ट अन् शाश्वत

**पुढील काही वर्षांत शेतीविषयक कायदे हे केवळ जमीन आणि उत्पादनापुरते मर्यादित राहणार नाहीत. ते हवामान बदल, तंत्रज्ञान, जैवसुरक्षा, डिजिटल डेटा, अन्नसुरक्षा आणि शेतकरी कल्याण या सर्व घटकांना समाविष्ट करणारे व्यापक स्वरूप धारण करतील.**

भविष्यातील कायदे शेतकऱ्यांचे हक्क सुरक्षित ठेवतानाच पर्यावरणीय संतुलन, तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर आणि अन्नसुरक्षा यांना प्राधान्य देतील. त्यामुळे 'शाश्वत, स्मार्ट आणि न्याय्य शेतीव्यवस्था' निर्माण करण्यासाठी कायदे हा सर्वांत महत्त्वाचा आधारस्तंभ ठरेल. जागतिक व्यापार आणि अन्नसुरक्षा यांसारख्या बदलत्या परिस्थितीमुळे पुढील काही वर्षांत शेतीविषयक कायद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होणे अपरिहार्य आहे. भविष्यातील शेती ही केवळ उत्पादनकेंद्रित न राहता शाश्वत, तंत्रज्ञानाधारित, पर्यावरणपूरक आणि बाजाराभिमुख असेल. या पार्श्वभूमीवर पुढील महत्त्वाचे कायदेविषयक बदल अपेक्षित आहेत. सध्या भारतात जमिनीचे तुकडीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. पुढील काळात लहान व विखुरलेल्या जमिनींमुळे शेती फायदेशीर राहणार नाही. त्यामुळे 'सामूहिक शेती', 'क्लस्टर फार्मिंग', 'लीज फार्मिंग' आणि 'कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग' यांना कायदेशीर मान्यता अधिक स्पष्ट स्वरूपात दिली जाईल. महाराष्ट्राने शेत जमिनी कराराने



कसण्यासाठी देणारा महाराष्ट्र लँड लिजिंग कायदा नुकताच केला आहे.

जमिनीचे डिजिटल रेकॉर्ड, उपग्रह नकाशे आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित मालकी नोंदी कायद्याने बंधनकारक केल्या जातील. निर्विवाद मालकी हक्क प्रणाली लागू होण्याची शक्यता आहे. यामुळे जमिनीवरील वाद, बनावट व्यवहार आणि फसवणूक कमी होईल. शेतीजमिनीचा औद्योगिक किंवा बिगरशेती वापर नियंत्रित करण्यासाठी कठोर पर्यावरणीय नियम येतील. सुपीक जमिनीचे संरक्षण हा भविष्यातील महत्त्वाचा कायदेशीर विषय असेल. हवामान बदलामुळे दुष्काळ, अतिवृष्टी, पूर आणि तापमानवाढ यांचा शेतीवर गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे 'क्लायमेट स्मार्ट ॲग्रिकल्चर' संबंधित कायदे तयार होतील. भविष्यात पुढील बाबी कायद्याने अनिवार्य होऊ शकतात, जसे की पाणी बचत तंत्रज्ञानाचा वापर, ठिबक आणि तुषार सिंचन सक्तीचे करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणाऱ्या पद्धतींचा अवलंब, सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन, रासायनिक खत व कीटकनाशकांवर मर्यादा. 'कार्बन क्रेडिट' बाजारात शेतकऱ्यांना सहभागी करण्यासाठी स्वतंत्र कायदे येऊ शकतात. पर्यावरणपूरक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन देणारी कायदेशीर व्यवस्था निर्माण होईल.

पुढील काही वर्षांत पाणी हे शेतीतील सर्वांत महत्त्वाचे आणि मर्यादित साधन असेल. त्यामुळे भूजल उपसा, नदीपात्र वापर आणि सिंचन व्यवस्थापन यांवर कठोर नियंत्रण येईल. 'वॉटर बजेटिंग', 'वॉटर ऑडिट' आणि 'प्रति पीक पाणी मर्यादा' यांसारख्या संकल्पना कायदेशीर होतील. जलसंपदा आयोगाकडून देखील भूजलाचा वापर आणि कॅनॉलमध्ये पाण्याचा वापर यासंबंधी अधिक काटेकोर नियमावली केली जाईल. शहरीकरण वाढत असल्यामुळे धरणाचे पाणी शहरांनी वापरावे की शेतीसाठी वापरावे यासंबंधीची नियमावली अधिक सुस्पष्ट करावी लागेल. भूजलाचा अमर्याद वापर रोखण्यासाठी परवाना प्रणाली लागू होऊ शकते. जलसंधारण करणाऱ्या गावांना किंवा शेतकऱ्यांना विशेष सवलती देण्याचे कायदे होऊ शकतात. नदीजोड प्रकल्प, पुनर्वापरित पाणी आणि सांडपाणी प्रक्रिया यांचाही शेतीसाठी कायदेशीर वापर वाढेल.

भविष्यात शेतीमध्ये ड्रोन, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि उपग्रह निरीक्षण यांचा मोठ्या प्रमाणात वापर होईल. त्यामुळे 'डिजिटल ॲग्रिकल्चर लॉ' ही स्वतंत्र कायदेव्यवस्था विकसित होऊ शकते. उदा. ड्रोनद्वारे फवारणीचे नियम, कृषी डेटाचे मालकी हक्क, शेतकऱ्यांच्या डेटाचे संरक्षण, एआय आधारित निर्णय प्रणालींचे नियमन, स्मार्ट करार. शेतीतील डिजिटल व्यवहार, ऑनलाईन बाजारपेठ आणि ई-नामसारख्या प्लॅटफॉर्मना अधिक बळकटी देणारे कायदे तयार होतील. भविष्यात शेतकरी आणि उद्योग यांच्यातील थेट संबंध वाढतील. अन्न प्रक्रिया उद्योग, निर्यात कंपन्या आणि किरकोळ साखळ्या यांच्याशी शेतकऱ्यांचे करार वाढतील. करार शेतीतील शेतकऱ्यांचे संरक्षण, हमीभाव आणि हमीखरेदी नियम, करार विवाद निवारण यंत्रणा, ई-व्यापार आणि डिजिटल पेमेंट नियम अधिक कठोर केले जातील. जनुक संपादन, जीएम पिके आणि नवीन जैवतंत्रज्ञान पुढील काळात अधिक प्रचलित होईल. त्यामुळे बियाणे कायद्यांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत.

भविष्यात शेती हा उच्च जोखमीचा व्यवसाय राहणार असल्याने शेतकऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षा कायदे अधिक मजबूत केले जातील. जागतिक व्यापार वाढल्याने अन्न गुणवत्तेचे नियम अधिक कठोर होतील. 'फार्म टू फोर्क ट्रेसिबिलिटी' म्हणजे उत्पादनापासून ग्राहकापर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध ठेवणे कायद्याने बंधनकारक होऊ शकते. कीटकनाशक अवशेष, सेंद्रिय प्रमाणपत्र, निर्यात मानके आणि अन्न सुरक्षितता यावर कठोर नियंत्रण असेल. अन्न भेसळ आणि निकृष्ट उत्पादनांवर कठोर शिक्षा असतील, भविष्यात जमिनीचे वाद, करार वाद, पाणीवाटप आणि डिजिटल व्यवहार यांमुळे कृषी क्षेत्रातील खटले वाढू शकतात. त्यामुळे 'विशेष कृषी न्यायाधिकरण' स्थापन होण्याची शक्यता आहे. ऑनलाइन विवाद निवारण, ई-कोर्ट आणि मध्यस्थी प्रणाली अधिक प्रभावी होईल. सरकार शाश्वत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना करसवलत, अनुदान आणि विशेष बाजारपेठ उपलब्ध करून देईल. जमिनीची सुपीकता, जैवविविधता आणि जलसंधारण राखणाऱ्या पद्धतींना कायदेशीर प्राधान्य दिले जाईल.

**शेखर गायकवाड**

## शिकवणी वर्गांवर बंदी घाला

वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे ती परीक्षाच रद्द करण्याची नामुष्की केंद्र सरकारवर आली. या पेपरफुटी प्रकरणामुळे अनेक अधिकारी आणि शिकवणी वर्गाचे प्रमुख यांना गुप्तवार्ता विभाग (सिबीआय)ने अटक केली आहे. परंतु या प्रकरणामुळे अनेक पालकांना प्रचंड मानसिक त्रास होत आहे तर काही विद्यार्थ्यांनी आत्महत्यासारखा मार्ग स्वीकाराला. या सगळ्यास जबाबदार तीन यंत्रणा आहेत. एक केंद्रीय शिक्षण मंत्रालय,दोन मान्यता प्राप्त महाविद्यालय, तीन खाजगी शिकवणी वर्ग. केंद्रीय शिक्षण विभागाने सर्व उच्च शिक्षण शिकवणी वर्गावर बंदी घातली पाहिजे. या शिकवणी वर्गावर कोणाचेही नियंत्रण नाही.कोणताही नियम,परवाना यांना नाही. कोणतेही नियम,अटी, पद्धती किंवा पाहणी राज्य वा केंद्र सरकार करीत नाही. त्यामुळे शिकवणी वर्गाचे पेव फुटले आहे.भरमसाठ फी घेऊन यात पालकांची आणि विद्यार्थ्यांची ससेहोलपट होत आहे. याला मान्यता प्राप्त महाविद्यालय सुद्धा तेवढीच जबाबदार आहेत.या महाविद्यालयातील शिक्षकांना गलेलठ्ठ पगार आहेत. हेच महाविद्यालयीन शिक्षक विद्यार्थी आणि पालकांना खाजगी शिकवणी वर्गाचा आग्रह धरतात. हे शिकवणी वर्ग यांच्या ओळखीचे असतात किंवा यांचे सोबत या शिक्षकाचे लागेबंदे असतात. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने यावर नियंत्रण घालण्यासाठी नियम तयार केले पाहिजेत. पेपरफुटीचा आता झालेला प्रकार काही पहिला नाही. यापुर्वीही पेपर फुटले, अटक झाली पण उपाययोजना झाल्या नाहीत.पेपरफुटी महाराष्ट्र प्रशासकीय सेवा, इतर अनेक परीक्षेत झाले आहेत.शिकवणी वर्ग मालक आपल्या शिकवणी वर्गाचे नाव मोठे होण्यासाठी वाटेल ते फंडे वापरतात. आज शिकवणी वर्गाची उलाढाल वीस हजार कोटीवर गेली आहे.यात सरकारचे लागेबांधे अडकलेले आहेत. त्यापेक्षा ही शिकवणी वर्ग बंद करून अकरावी, बारावीच्या शिक्षकांना शिकविण्यात गुंतवावे. तरच विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित होईल.

**माजी खा.अनंत गुढे,**
अमरावती

# यवतमाळचे रस्ते रोज वाटीभर माती खायला लावतात..!

## सात दिवसांत कारवाई नाही तर न्यायालयीन लढा – ॲड. असीम सरोदे

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १९ :** यवतमाळ शहरातील खड्डेमय रस्ते, धुळीचे साम्राज्य, विस्कळीत पायाभूत सुविधा, निकृष्ट घनकचरा व्यवस्थापन आणि अपुऱ्या ड्रेनेज व्यवस्थेमुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः त्रस्त झाले असून, या गंभीर प्रश्नांवर शहरातील नागरिकांनी आता कायदेशीर लढ्याची भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर आज आयोजित पत्रकार परिषदेत ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी प्रशासनावर जोरदार हल्लाबोल करत, "यवतमाळचे रस्ते नागरिकांना रोज वाटीभर माती खायला लावत आहेत," अशी टोकदार टीका यावेळ केली.

या पत्रकार परिषदेची प्रस्तावना शेतकरी चळवळीचे प्रा.पंढरी पाठे यांनी केली, तर संपूर्ण भूमिका ॲड. सरोदे यांनी मांडली. यावेळी शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, सोशल मीडिया काँग्रेस जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, रमेश भिसणकर, मनोज डोईजड, अमित सरोदे आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेत सादर करण्यात आलेल्या कायदेशीर नोटीस देण्यात आली असून नगर परिषद, प्रशासक आणि पालकमंत्र्यांना थेट जबाबदार धरत शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनातील गंभीर त्रुटींचा पाढाच वाचण्यात आला. दिलेल्या माहितीनुसार शहरातील अनेक रस्त्यांवर जीवघेणे खड्डे निर्माण झाले असून, पाइपलाईनच्या कामांसाठी उकरलेले रस्ते अनेक ठिकाणी ना दुरुस्तीविना पडून आहेत. परिणामी नागरिकांचा रोजचा प्रवास जीव धोक्यात घालून करावा लागत आहे. दिलेल्या नोटीस नुसार आगामी पावसाळ्यापूर्वी शहरातील स्टॉर्म-वॉटर ड्रेनेजची सक्षम व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊन जीवित व वित्तहानी होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच नगराध्यक्ष यांना काही सूचना देत सरोदे म्हणाले की नगराध्यक्ष या शोभेच्या वस्तू आहे का? आमदार व इतर कार्यक्रमांमध्ये फक्त रील बनवण्यासाठी व ते instagram वर टाकून काम होतात का? नगरपरिषद अंतर्गत अनेक समस्या आजही कायम असून सार्वजनिक ठिकाणी कचरा साचणे, महिलांसाठी अपुऱ्या स्वच्छतागृहांची समस्या आणि वाढते प्रदूषण हे नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे असल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेत सात दिवसांच्या आत प्रशासनाने ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अन्यथा उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा ॲड. सरोदे यांनी दिला. यामुळे आता यवतमाळच्या रखडलेल्या नागरी प्रश्नांवर राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर मोठा संघर्ष उभा राहण्याची चिन्हे दिसत आहेत.

# ऑनलाईन औषध विक्रीमुळे स्थानिक मेडिकल व्यवसाय धोक्यात..!

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

## २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक



**यवतमाळ, दि. १९ :** देशातील औषध व्यवसाय सध्या मोठ्या संक्रमणातून जात असून ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांच्या वाढत्या प्रभावामुळे स्थानिक मेडिकल दुकानदारांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर २० मे २०२६ रोजी देशभरातील सुमारे १३ लाख औषध विक्रेत्यांनी भारत बंदचे आवाहन केले आहे. भारतीय औषध उद्योगाने गेल्या काही दशकांत मोठी प्रगती केली आहे. जनरिक औषध निर्मितीत भारताने जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली.

Cipla, Sun Pharmaceutical Industries आणि Dr. Reddy's Laboratories यांसारख्या कंपन्यांनी भारताला "जगाची फार्मसी" म्हणून ओळख मिळवून दिली. मात्र आज बदलत्या बाजारपेठेमुळे पारंपरिक मेडिकल व्यवसाय अडचणीत सापडत असल्याचे चित्र आहे. विशेषतः कोविड-१९ महामारीच्या काळात स्थानिक केमिस्ट आणि फार्मासिस्ट यांनी दिलेली सेवा महत्त्वपूर्ण ठरली होती. लॉकडाऊनच्या काळात मेडिकल दुकाने २४ तास सुरू ठेवणे, रुग्णांना घरपोच औषधे पोहोचवणे, ऑक्सिजन आणि सॅनिटायझर उपलब्ध करून देणे तसेच नागरिकांना प्राथमिक मार्गदर्शन करणे, अशी जबाबदारी त्यांनी पार पाडली. अनेक फार्मासिस्ट स्वतः संक्रमित झाले, तर काहींना जीवही गमवावा लागला. तरीही त्यांनी सेवा खंडित होऊ दिली नाही. दरम्यान, ऑनलाईन औषध विक्रीमुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोप औषध विक्रेते करत आहेत. मोठ्या ई-फार्मसी कंपन्या मोठ्या प्रमाणावर सवलती देत असल्याने छोट्या मेडिकल दुकानदारांचे उत्पन्न घटत आहे. त्याचबरोबर डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधांची खरेदी वाढत असून चुकीच्या औषध वापराचा धोका वाढत असल्याचेही सांगितले जात आहे. औषध विक्रेत्यांच्या मते, अनधिकृत वेबसाइट्समुळे बनावट औषधांचा धोका वाढत असून स्थानिक फार्मासिस्टकडून मिळणारे वैयक्तिक मार्गदर्शनही कमी होत आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य व्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. २० मेच्या भारत बंदमागील प्रमुख मागण्यांमध्ये ऑनलाईन औषध विक्रीवर नियंत्रण, अनधिकृत ई-फार्मसींवर कारवाई, स्थानिक मेडिकल दुकानदारांना संरक्षण, फार्मासिस्टच्या भूमिकेला अधिक मान्यता आणि नकली औषधांविरोधात कठोर कारवाई यांचा समावेश आहे. औषध विक्रेत्यांनी नागरिकांनाही स्थानिक मेडिकल दुकानांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. "आरोग्य सेवा ही केवळ व्यापार नाही, तर जनतेच्या सुरक्षिततेशी संबंधित विषय आहे. त्यामुळे सवलतींपेक्षा सुरक्षितता अधिक महत्त्वाची आहे," असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. तज्ज्ञांच्या मते, डिजिटल सेवा आणि स्थानिक आरोग्य व्यवस्था यामध्ये संतुलन राखणे अत्यावश्यक आहे. स्थानिक केमिस्ट टिकला तरच समाजातील विश्वासार्ह औषध वितरण व्यवस्था मजबूत राहू शकते.

# घटना-घडामोडी

## यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पात गौणखनिजाचा काळाबाजार? महसूल प्रशासनाची धडक कारवाई..! ८ हायवा टिप्पर जप्त

**पुसद :** यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्गाच्या कामात वापरल्या जाणाऱ्या



गौणखनिज वाहतुकीवर महसूल प्रशासनाने मोठी कारवाई करत विनापरवाना वाहतूक करणारे ८ हायवा टिप्पर ताब्यात घेतल्याने खळबळ उडाली आहे. रेल्वे प्रकल्पाच्या नावाखाली नियम धाब्यावर बसवले जात आहेत का, असा प्रश्न या कारवाईनंतर उपस्थित होत आहे. सोमवार (दि. १८ मे २०२६) रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजताच्या सुमारास पुसद-माहूर मार्गावरील हॉटेल अतिथी परिसरात उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल व तहसीलदार रेखा वाणी यांच्या नेतृत्वाखालील महसूल पथकाने ही कारवाई केली. छत्रपती संभाजीनगर येथील कंपनीशी संबंधित असल्याचे सांगण्यात येणारी एकूण ८ हायवा टिप्पर वाहने विनापरवाना गौणखनिज वाहतूक करत असल्याच्या संशयावरून ताब्यात घेण्यात आली.

जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये एमएच-२० जीझेड-५६२९, एमएच-२० जीझेड-५६०६, एमएच-२० जीझेड-५४३४, एमएच-२० जीझेड-५६०३, एमएच-२० जीझेड-५४३८, एमएच-२० जीझेड-८७३६, एमएच-२० जीझेड-५६०५ आणि एमएच-४० सीटी-१९१६ या वाहनांचा समावेश आहे. सर्व वाहनांचा संयुक्त पंचनामा करून ती तहसील कार्यालय परिसरात जमा करण्यात आली आहेत. ही वाहने यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्गाच्या सुरू असलेल्या कामासाठी गौणखनिज टाकण्याचे काम करत होती. संबंधित वाहने एन.पी. इन्फ्रा व सुशी इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर यांच्याशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईदरम्यान मंडळ अधिकारी मयूर मस्के, एस.आर. मारकड तसेच तलाठी अमोल राठोड, प्रकाश मस्के, मनोज कोरडे, सुनील जाधव आणि अभय चौधरी उपस्थित होते.महसूल विभागाच्या माहितीनुसार, संबंधित वाहने विनापरवानगी गौणखनिज वाहतूक करताना आढळून आल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ (७) व (८) नुसार बाजारभावाच्या पाचपट दंडाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

दरम्यान, रेल्वेसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्ये नियमबाह्य गौणखनिज वापर अथवा वाहतुकीचे प्रकार घडत असतील, तर त्याची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी आता पुढे येत आहे.

## कृषी विभागाचा मोठा दणका..!

**अनियमितता करणाऱ्या ३८ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित, १५ कायमस्वरूपी रद्द, अनधिकृत HTBT बियाणे, बोगस खत विक्रीवर धडक कारवाई; ४० लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त**

**यवतमाळ :** जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पेरणीपूर्व तयारीला वेग आला असून शेतकरी खते, बियाणे व कीटकनाशकांच्या खरेदीत व्यस्त आहेत. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने कृषी निविष्ठांच्या विक्रीवर कडक नजर ठेवत धडक कारवाई मोहीम सुरू केली आहे. कृषी निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळून आल्याने जिल्ह्यातील एकूण ३८ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून १५ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यात अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाणे विक्रीविरोधातही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. यवतमाळ, वणी आणि कळंब तालुक्यात अनधिकृत कापूस बियाणे विक्रीप्रकरणी तीन फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत ६३१ पॅकेट अनधिकृत कापूस बियाणे आणि तीन वाहने जप्त करण्यात आली असून, सुमारे २२ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच उमरखेड तालुक्यातील ढाणकी येथे अनधिकृत व बोगस रासायनिक खत विक्रीप्रकरणी बिटरगाव पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान ७०० खताच्या बॅग आणि एक वाहन जप्त करण्यात आले असून, जप्त साठ्याची किंमत सुमारे १८ लाख रुपये असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

कृषी निविष्ठांच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी जिल्ह्यात ३६ गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक नियुक्त करण्यात आले असून एक जिल्हास्तरीय भरारी पथकही कार्यरत आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी साहित्य उपलब्ध व्हावे आणि फसवणूक टाळता यावी, यासाठी कृषी विभागाकडून सातत्याने तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी कृषी विभागाने शेतकरी तक्रार निवारण कक्ष स्थापन केला आहे. कृषी निविष्ठांबाबत कोणतीही अडचण किंवा तक्रार असल्यास शेतकऱ्यांनी ९४०३२२९९९१ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

# सायबर फसवणुकीतील तब्बल ७२ हजार रुपये परत !

## उमरखेड पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी !!

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**



**उमरखेड, दि. १९ :** महाराष्ट्र राज्यासह जिल्ह्यात सध्या ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून अनेक नागरिक आर्थिक फसवणुकीचे बळी ठरत आहेत. अशा परिस्थितीत केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल (NCCR Portal) च्या माध्यमातून उमरखेड पोलिसांनी एका तक्रारदाराची संपूर्ण ७२ हजार रुपयांची रक्कम परत मिळवून देत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, रवि पुरुषोत्तम चौधरी रा उमरखेड यांची दि ०४ मे २०२५ रोजी ऑनलाईन माध्यमातून ७२,००० रुपयांची फसवणूक झाली होती. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ पोलीस स्टेशन उमरखेड येथे धाव घेत तक्रार नोंदवली. पोलिसांनी राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोटींग पोर्टलवर ऑनलाईन तक्रार दाखल केली असता Akn. No. ३१९०५२५००७२९५८ प्राप्त झाला. पोलीस अधीक्षक कुमारचिंता , उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ व सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक मुनेश्वर मॅडम यांच्या संयुक्त नेतृत्वात ही कार्यवाही करण्यात आली. या प्रकरणात पोलीस स्टेशन उमरखेड येथील पोलीस शिपाई विष्णु राठोड तसेच सायबर सेल यवतमाळ येथील पोलीस शिपाई अविनाश शहारे यांनी तांत्रिक तपास, बँक व्यवहारांची पडताळणी व सातत्यपूर्ण पाठपुरावा करून फसवणूक झालेली संपूर्ण ७२ हजार रुपयांची रक्कम तक्रारदाराला परत मिळवून दिली. रक्कम परत मिळाल्यानंतर तक्रारदार रवि चौधरी यांनी पोलीस स्टेशन उमरखेड येथे उपस्थित राहून पोलिसांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व त्यांच्या तत्पर कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक यांनी पोलीस शिपाई विष्णु राठोड यांच्या उत्कृष्ट कार्याचे विशेष कौतुक केले. याबाबत अधिक माहिती घेतली असता पोलीस शिपाई विष्णु राठोड यांनी सांगितले की, सन २०२५ मध्ये ऑनलाईन फ्रॉड झालेल्या प्रकरणांपैकी ३० हजार ६२५ रुपये तर सन २०२६ मध्ये आतापर्यंत तब्बल ६,३८,६०९ रुपये विविध तक्रारदारांना परत मिळवून देण्यात यश आले आहे. सायबर गुन्ह्यांविरोधात उमरखेड पोलिसांनी केलेली ही कार्यवाही नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणारी असून, ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर पोर्टलवर किंवा जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# मुकुटबनमध्ये निकृष्ट रस्ता बांधकामाविरोधात बुधवारी रास्ता रोको..!

## चौकशीच्या मागणीसाठी आंदोलन

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**

**झरी, दि. १९ :** मुकुटबन परिसरातील सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकामात झालेल्या कथित अनियमितता आणि निकृष्ट दर्जाच्या कामांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, वणी विधानसभा क्षेत्राच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे आंदोलन बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजता मुकुटबन येथील बसस्थानकासमोर होणार असून परिसरातील नागरिक, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. सदर रस्ता बांधकामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा तसेच निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून संपूर्ण कामाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनादरम्यान करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वणी विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष दिलीप भोयर करणार असून प्रदेश संघटन सचिव रज्जाक पठाण, तालुकाध्यक्ष प्रमोद थेरे, कामगार सेलचे तालुकाध्यक्ष किशोर गोंलावार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# नीट घोटाळा: सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली चौकशी करा!

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १९ :** नीट परीक्षेमधील कथित पेपर लीक, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, या मागणीसाठी बहुजन समाज पार्टी, यवतमाळच्या वतीने मंगळवार दि. १९ मे २०२६ रोजी भारताचे पंतप्रधान यांना निवेदन सादर करण्यात आले.

दिवसरात्र मेहनत करून मध्यमवर्गीय कुटुंबातील लाखो विद्यार्थी डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगतात. मात्र एनटीएच्या कथित हलगर्जीपणामुळे व परीक्षेतील गैरप्रकारांमुळे सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप बसपाच्या वतीने करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणाची सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शनाखाली सखोल चौकशी करण्यात यावी, दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी तसेच नव्याने परीक्षा घेण्याची वेळ आल्यास ती पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या परीक्षा केंद्रापर्यंत जाण्यासाठी शासनाने मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून आर्थिक व मानसिक ताण विद्यार्थ्यांवर येणार नाही, अशीही मागणी करण्यात आली. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि कडक नियंत्रण यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास बहुजन समाज पार्टी संपूर्ण महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरून उग्र जनआंदोलन छेडेल, असा इशारा इंजि. जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक विपुल पद्माकर खोब्रागडे यांनी दिला.विपुल पद्माकर खोब्रागडे यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. यावेळी पंडित दिघडे, दिलीप बेलसरे, राजेश देशमुख, महेंद्र डेपे, राजू इंगोले, सुनील घोडेस्वार, सुनील वाघमारे, गुणवंत गणवीर, सुरेश गजभिये, सौ. दयमयंती बहादुरे, अजय खोब्रागडे, संजय तागडे, सुरेश बडवाईक, प्रफुल शंभरकर, शिवप्रसाद राऊत, राकेश पाटील, कुणाल इंगोले, शंकर धनकुलवार यांच्यासह सुमारे दीडशे ते दोनशे कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत गुरुकुल कॅन्वेटचे पाच विद्यार्थ्यांचे यश

**दै. जनमाध्यम| प्रतिनिधी**



**झरी, दि. १९ :** गुरुकुल कॉन्व्हेन्टचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनिय यश संपादन केले असून मर्यादीत सहभागातुन विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले आहे . विद्यालयातील सर्वेश विश्वनाथ परसावार, कु . कुशभू आशिस आवारी ,यश हरेंद्र कुमार ,तुषार मोरेश्वर गागरे ,कु.प्रियांशी प्रदिप पुंगुरवार यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरत शाळेचे नाव वाढवला आहे.

शिष्यवृती परीक्षेसाठी कमी संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता . मात्र सहभागी विद्यार्थ्यांनी मेहनत सातत्यपूर्ण अभ्यास आणी शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर उत्कृष्ठ यश मिळविले . या यशामूळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे . विद्यालयाचे संस्थापक मंडळ तसेच मुख्याध्यापक विलास चिट्टलवार सर्व शिक्षकवृंद आणि पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असुन भविष्यात आणखी विद्यार्थी अशा स्पर्धात्मक परीक्षेमध्ये सहभागी होवून यश मिळवितील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे लवकरच सत्कार करण्यात येणार आहे .

**क्रमांक/म/सहा. प्रस्तु-३/कावि/४१४/२०२६ तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालये, उमरखेड दिनांक: २९/०४/२०२६**

## जाहीर सूचना

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अफसर खान अकबर खान रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा भाउ नामे रोशन खान अकबर खान जन्म दि-०१/०१/१९९० मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ०३.०६.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी, उमरखेड

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४१३/२०२६ तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड दिनांक:- २९/०४/२०२६**

## जाहीर सूचना

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अईनम आलिया झिया अहमद रा. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दि-०१/०१/१९९८ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १६.०५.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी, उमरखेड

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४१५/२०२६ तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड दिनांक:- ०५/०५/२०२६**

## जाहीर सूचना

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शेख इसा शेख महेबुब रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दि १२/०७/१९८२ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ३०.०५.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी, उमरखेड

**क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/४१०/२०२६ तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड दिनांक: २९/०४/२०२६**

## जाहीर सूचना

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रेशमा बानो अब्दुल मन्नान रा.उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दिनांक-०५/०३/१९८२ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक- १६.०५.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी, उमरखेड

# संशोधक विद्यार्थ्यांना मिळाला दिलासा

## प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्या पाठपुराव्यामुळे विद्यापीठाने घेतला सकारात्मक निर्णय



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे संशोधन विद्यार्थ्यांच्या आर.आर.सी. आणि आर.ए.सी. प्रक्रिये दरम्यान निर्माण झालेल्या गंभीर प्रशासकीय व कायदेशीर प्रश्नांवर अखेर सकारात्मक तोडगा निघाला असून, नूटा संघटनेचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तब्बल ५६ संशोधक विद्यार्थी आणि तेवढ्याच अधिकृत पीएच.डी. मार्गदर्शकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रशासनाकडून १३ नोव्हेंबर २०२५ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या आर.आर.सी. प्रक्रियेदरम्यान, पूर्वीपासून मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे आणि अधिकृत मार्गदर्शकांना अचानक अपात्र ठरवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी केला होता. यूजीसी २०२२ च्या निर्देशांच्या आधारावर २९ मे २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या डायरेक्शन क्र. १४१/२०२५ चा वापर करून, आधीपासून संशोधन मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांवर निर्बंध लादण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले होते.या संदर्भात प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी स्पष्ट भूमिका घेत, कोणताही नवीन नियम किंवा निर्देश पूर्वलक्ष प्रभावाने लागू करता येत नाही, हे कायद्याचे मूलभूत तत्त्व असल्याचे ठामपणे मांडले. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश प्रक्रिया, कोर्सवर्क, आर.ए.सी. सादरीकरण आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण केलेली असताना अचानक त्यांच्या मार्गदर्शकांना अपात्र घोषित करणे ही अन्यायकारक आणि अमानवी भूमिका असल्याची टीका त्यांनी केली होती.


या प्रकरणात आर.आर.सी. प्रक्रियेचे प्रमुख प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. आधीपासून अधिकृत असलेल्या मार्गदर्शकांना 'यापुढे संशोधन मार्गदर्शन करता येणार नाही' असे सांगून प्रक्रिया थांबवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. यामुळे संशोधक विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर नूटा संघटनेचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी कुलगुरूंकडे निवेदन देत संशोधक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, सर्व अधिकृत मार्गदर्शकांना तात्काळ मान्यता द्यावी आणि अकॅडेमिक कौन्सिलच्या चुकीच्या निर्णयात दुरुस्ती करावी, अशी ठाम मागणी केली होती. यावेळी कुलगुरू मिलिंद बाराहाते यांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.

दरम्यान, ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या विद्यापीठाच्या सिनेट बैठकीत जुन्या प्रक्रियेनुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. १/२०१६ च्या नियमांनुसार ज्यांचे प्रवेश झालेले आहेत, त्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार ५६ संशोधक विद्यार्थी आणि संबंधित मार्गदर्शकांची ऑनलाइन आर.आर.सी. प्रक्रिया घेऊन त्यांना संशोधन प्रक्रियेत पुढे जाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला.या निर्णयामुळे संशोधक विद्यार्थी, मार्गदर्शक आणि शिक्षक संघटनांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक संशोधक विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी प्रा. डॉ. प्रशांत विघे यांचे अभिनंदन करत, 'संशोधक विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी त्यांनी संघर्षपूर्ण आणि अभ्यासपूर्ण भूमिका घेतली. त्यांच्या पुढाकारामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला,' अशा भावना व्यक्त केल्या.

# कर्तव्यात कसुरी व प्रगणकाला शिवीगाळ प्राध्यापकाला भोवणार

■ जनगणना पर्यवेक्षक प्रा. बिजवे यांना कारणे दाखवा नोटीस

■ २४ तासांत खुलासा न केल्यास कायदेशीर कारवाई



**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

आगामी जनगणनेच्या कामात निष्काळजीपणा करणे आणि माहिती विचारणाऱ्या प्रगणकालाच थेट फोनवर शिवीगाळ करण्याचा धक्कादायक प्रकार अंजनगाव सुर्जी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी मुख्यधिकारी तथा चार्ज अधिकारी यांनी श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा जनगणना पर्यवेक्षक प्रा. समीर बिजवे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. २४ तासांच्या आत समाधानकारक खुलासा सादर न केल्यास जनगणना अधिनियम १९४८ नुसार कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आल्याने तालुक्यातील कर्मचारी वर्गात तीव्र खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, आगामी जनगणनेच्या कामासाठी प्रा. समीर बिजवे यांची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, नियुक्ती झाल्यापासून त्यांनी त्यांच्या अधिनिस्त असलेल्या प्रगणकांना कोणतीही माहिती दिली नाही, अथवा त्यांच्याशी कोणताही समन्वय साधला नाही. याबाबतची माहिती घेण्यासाठी आणि कामाचे नियोजन समजून घेण्यासाठी जनगणना प्रगणक रवींद्र भागवत यांनी प्रा. बिजवे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला. मात्र, कामाची माहिती देण्याऐवजी प्रा. बिजवे यांनी प्रगणक भागवत यांना फोनवरच शिवीगाळ केली.

पर्यवेक्षकाकडून मिळालेल्या या अपमानास्पद वागणुकीमुळे प्रगणक रवींद्र भागवत यांनी तात्काळ या घटनेची लेखी माहिती अंजनगाव सुर्जीचे मुख्याधिकारी तथा चार्ज अधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे दिली. शासकीय कामात अडथळा निर्माण करणे आणि सहकाऱ्याला शिवीगाळ करणे हा गंभीर प्रकार असल्याचे लक्षात घेऊन मुख्याधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली.

मुख्याधिकाऱ्यांनी प्रा. समीर बिजवे यांना नोटीस बजावून २४ तासांच्या आत या वर्तनाचा लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मुदतीत खुलासा सादर न केल्यास, जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ११ व १२ मधील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. या कडक भूमिकेमुळे तालुक्यातील जनगणना पर्यवेक्षक आणि प्रगणकांच्या गोटात सध्या मोठी खळबळ उडाली आहे.

## प्रा. सुनीता केने यांना आचार्य पदवी



**अमरावती-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. सुनीता केने-उमेकर यांना नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मार्फत शारीरिक शिक्षण विषयात पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.डॉ. सुनिता उमेकर-केने यांनी आपल्या यशाचे श्रेय श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांना समर्पित केले आहे. सोबतच या यशाचे श्रेय त्यांनी पती राजेंद्र ए. उमेकर, अण्णासाहेब उमेकर परिवार तसेच आई मधुमती एस. केने आणि श्रीकृष्णराव केणे परिवार यांना दिले आहे. या मान्यतेमुळे शारीरिक शिक्षण क्षेत्रातील संशोधनाला चालना मिळणार असून भावी संशोधकांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# दर्यापुरात गोवंश वाहतूक करणारे वाहन पकडले



**खल्लार/ वार्ताहर**

रविवारी (१७) रात्रीच्या वेळी काही गौरक्षकांना एका वाहनात गोवंश कोंबून कटाईसाठी नेत असल्याची माहिती मिळताच गोरक्षकांनी त्या वाहनाचा पाठलाग करून रविवारी रात्री ११:३० वाजता बाभळी येथिल मोठ्या पुलावर ते वाहन पकडले. यावेळी दोन गटात तणाव निर्माण झाला. याचवेळी जमावावर अचानक दगडफेमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दर्यापूर शहरातून एम एच ३० ए ए ३२५५ क्रमांकच्या वाहनातून गोवंश कोंबून नेत असल्याची माहिती मिळताच काही गोरक्षकांनी ते वाहन बाभळी येथिल मोठ्या पुलावर पकडले. यावेळी जमावाची गर्दी वाढू लागली होती. पोलिसांचे ११२ क्र. चे वाहन सुद्धा घटना स्थळी पोहोचले परंतु दोन गटात त्या ठिकाणी वाद निर्माण झाला. आणि एका बाजूने अचानक जमावावर तुफान दगड फेक झाली. यामध्ये अनेक जण जखमी सुद्धा झाले. यावेळी सुरुवातीला दोनच पोलिस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित असल्याने ते सुद्धा हतबल झाले होते. त्यानंतर दर्यापूर ठाणेदार सुनिल वानखडे व इतर कर्मचारी येताच त्यांनी उपस्थित जमावाला पांगविले. तसेच गोवंश व वाहन ताब्यात घेतले. रात्री उशिरापर्यंत बाभळी पुलाजवळ पोलिसांची गस्त होती. सोमवारी दोन गटातील काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरु होती.

# असदपूर येथे बेमुदत उपोषणाची हाक

## कृषी विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी



**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**


कृषी विभागातील अधिकाऱ्यां विरोधात कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी असदपूर येथे सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी आमरण उपोषण सुरू करण्यात आले. बस स्टॅन्ड परिसरात सकाळी ११ वाजता या उपोषणास सुरुवात झाली असून परिसरात याची मोठी चर्चा रंगली आहे.

या उपोषणात संतोष शा. नितनवरे, सचिन दे. नितनवरे आणि हर्षल ज्ञा. चौधरी हे सहभागी झाले आहेत. उपोषणकर्त्यांनी कृषी विभागातील काही अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त करत संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये येसूर्णा येथील सहाय्यक कृषी अधिकारी जे. व्ही. वानखडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचे निलंबन करण्याबाबतचा अहवाल जिल्हा कृषी अधिकारी यांच्याकडे पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच अचलपूर येथील तालुका कृषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांची वेतनवाढ (इंक्रीमेंट) कमी करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.प्रशासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा उपोषण कर्त्यांनी दिला आहे.दरम्यान, उपोषणस्थळी स्थानिक नागरिकांनी भेट देत आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दर्शविला असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


## स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी १८ जून रोजी मतदान

**अमरावती-** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात अमरावतीचा समावेश असल्याने मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तातडीने लागू करण्यात आली आहे.जिल्ह्यामध्ये स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे.निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार, सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करणे, १ जून रोजी नामांकने (उमेदवारी अर्ज) दाखल करण्याची अंतिम तारीख, २ जून रोजी नामांकनांची छाननी, ४ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान, २२ जून रोजी मतमोजणी, २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख आहे.

# एकलव्य गुरुकुल स्कूलचे पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीकरीता पात्र



वीर चौकडे



सर्वज्ञ देशमुख



ओम गुल्हाने



मोहित उडबगले



घनश्याम बनकर

**नांदगाव खंडेश्वर/ वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा आयोजित वर्ग पाचवी साठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत एकलव्य गुरुकुल स्कूलचे विद्यार्थी पात्र ठरले आहे. त्यामध्ये याने प्राविण्य प्राप्त केले असून याचे सह घनश्याम बनकर, मोहित उडबगले, ओम गुल्हाने, सर्वज्ञ देशमुख हे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरल्यामुळे नांदगाव परिसरात अभिनंदन होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे एकलव्य गुरुकुल स्कूलचे मुख्य मार्गदर्शक सदानंद जाधव, मुख्याध्यापक विलास मारोटकर, व्यवस्थापक अनुप काकडे, एकलव्य अकादमीचे अध्यक्ष विशाल ढवळे, क्रीडा मार्गदर्शक अमर जाधव एकलव्य गुरुकुल स्कूलचे शिक्षक, शिक्षिका प्रा. डॉ. गजानन काकडे, श्रीकांत खांडेकर, प्रमोद सुरजुसे, वैशाली भगत, पूजा ठाकरे, सीमा पोहनकर, आरती काळे, सुनिता पोपळघाटे, सुरेखा लोंदे, आदिती बोरकर, निकिता दांडगे, रेवती परसनकर, शिक्षक व पालकांनी कौतुक केले.

# अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर



**कुऱ्हा/ वार्ताहर**

मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ (ऑल इंडिया) अमरावती जिल्हा (पूर्व) कार्यकारिणीची घोषणा उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली आहे. यावेळी जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन अर्पण केले. धामणगांव रेल्वे येथील शासकीय विश्रामगृहात संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली आहे.

बैठकीत पत्रकारांच्या संघटनात्मक बळकटीसह ग्रामीण भागातील पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली आहे .त्यानंतर सर्वानुमते अमरावती जिल्हा (पूर्व) कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.बैठकीचे अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने तर प्रमुख अतिथी राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, राष्ट्रीय संघटक तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख, राष्ट्रीय चिटणीस अशोक पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप जोशी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, महाराष्ट्र प्रदेश संघटक दिनेश भटकर, हे उपस्थित होते. बैठकीचे नियोजनअमरावती (पूर्व) जिल्हाध्यक्ष संतोष वाघमारे यांनी केले होते.

बैठकीला उपस्थित चांदूर रेल्वे तालुका सचिव राजीव शिवणकर यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

अमरावती जिल्हा (पूर्व) कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष संतोष वाघमारे धामणगांव रेल्वे, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश ठाकरे वरुड, जिल्हा उपाध्यक्ष धनराज बारबुद्धे गुरुकुंज तिवसा ,जिल्हा उपाध्यक्ष कैलास ठाकूर सावरखेड मोर्शी, जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर भगोले चांदुर रेल्वे, जिल्हा सरचिटणीस निलेश रामगावकर तळेगाव दशासर, जिल्हा सरचिटणीस निशिकांत देशमुख चांदुर रेल्वे, जिल्हा संघटक अश्विन हरिदास सिनकर अंबाडा मोर्शी, जिल्हा संघटक शेख शाहरुख शेख रजाक कुऱ्हा, जिल्हा सदस्य वासुदेव गावंडे शिवनी रसूलपुर, ज्ञानेश्वर बेलूरकर वरखेड तिवसा, बैठकीदरम्यान संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न प्रभावीपणे शासनापर्यंत पोहोचवण्याचा तसेच पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.नव्याने जाहीर झालेल्या कार्यकारिणीवर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून आगामी काळात संघटनेचे कार्य अधिक जोमाने पुढे नेले जाईल, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. यावेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे राजीक बेग समशेर बेग, धीरज भौसारे, मनोज साफेकर, शेख शाकीर अहमद सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

## घरासमोर बांधलेली गाय चोरी

**बेलोरा/ वार्ताहर**

चांदूरबाजार शहरातील पिंपळपुरा येथे घरासमोर बांधलेली गाय अज्ञात चोरट्याने चोरून नेली.पिंपळपुरा येथील राजेश दिगंबर शेंडे यांनी त्यांच्या घरासमोर नेहमीप्रमाणे ३ गायी बांधुन ठेवल्या होत्या. अज्ञात चोरट्याने अंधाराचा फायदा घेऊन त्यातील एक गाय चोरून नेली. तिची किंमत १० हजार रूपये होती. शेंडे यांच्या तक्रारीवरून चांदूरबाजार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

## सर्व धर्मीय व आंतरजातीय सामूहिक विवाह सोहळा

**अमरावती** - कष्टकरी,काम करी, मजूर,शेतमजूर, अनुसूचित जातीमधील सर्व जाती महार,मातंग चांभार, खाटीक मेहतर व इतर जाती बौद्ध हिंदू शेख इसाई व ओपन मध्ये जाती तसेच इतर मागासलेले जाती एन. टी.वि.जे. सर्व धर्मीय मधील गोरगरीब मुला मुलीचे पैशाच्या अभावी लग्न होऊ शकत नाही आपण आदर्श विवाह करावा व आपला पैसा वाचवावा आई-वडील मुला मुलीचे लग्न न करू शकल्याने आत्महत्याच्या विचार करतात किंवा कर्जबाजारी होऊन जीवनभर व्याजाचे पैसे भेटतात ही परिस्थिती येऊ नये यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने गरीब अनुसूचित जातीतील मुला मुली यांच्या विवाह ९ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. त्यासाठी विवाहाची नोंदणी करण्याकरता वधू-वराची टीसी,जातीच्या दाखला, डोमोसिल सर्टिफिकेट,रहिवाशी दाखला, प्रथम विवाह दाखला,दोन पासपोर्ट फोटो अशा पद्धतीचे कागदपत्रे घेऊन डॉक्टर रुपेश खडसे मोटर ड्रायव्हिंग स्कूल प्रभादेवी मंगल कार्यालय एमआयडीसी रोड जुना बायपास अमरावती या ठिकाणी नोंदणीसाठी जमा करावे नोंदणीची अंतिम तारीख ३१ मे आहे.आदर्श विवाह करण्यासाठी सामूहिक विवाह मध्ये लाभार्थ्यांना शासनातर्फे २५००० व आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५००००/- हजार रुपये असे मिळतात व आंतरजाती असल्यास एकूण ७५ हजार रुपयांच्या वधूवरांना लाभ होतो त्यामुळे त्यांना सामूहिक विवाह मध्ये विवाह करणाऱ्या आंतरजातीय व स्व: जातीय जोडप्यांनी नोंदणी करावी व आर्थिक बचत करावी असे जाहीर आवाहन केले असून व अधिक माहिती करीता खडसे ७३५०७१२८५२ वजाधव ८८३० २८३०४४ संपर्क साधून माहिती घ्यावी

# अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाच्या ढिसाळ कारभार

## ठिकठिकाणी साचले कचऱ्याचे ढीग; पावसाळ्यापूर्वी नियोजन थंडबस्त्यात

**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे जुळ्या शहरात स्वच्छतेचे बारा वाजले असून शहरात घाणीचे सम्राज्याचे नवीन शहर म्हणून समोर आले आहे.

जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा असलेली अचलपूर नगर परिषदत गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासक काळ सुरू होता .मात्र आता नगरसेवकांची कार्यकारिणी आहे .मात्र या काळातही जुळवा शहर स्वच्छ,सुंदर होण्याऐवजी कचऱ्याचे शहर म्हणून समोर आले आहे.

जुळ्या शहरात अनेक प्रभागात साफसफाई नियमित होत नाही .यामुळे जागोजागी कचऱ्याचे ढीग लागलेले आहे .या भागातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे .



यासंदर्भात अनेक तक्रारी करूनही नगर परिषद आरोग्य विभागाचे अधिकारी - कर्मचारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

पावसाळ्यापूर्वी जुळ्या शहरातील विविध नदी ,नाल्याची साफसफाई न झाल्याने नागरीकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.अचलपूर शहरातील जिवनपुरा येथील बिच्छण नदी ,रेल्वे स्टेशन परिसरात मृत गुरे - जनावराचा खच , माळवेशपुरा परिसरातील नाल्याची दुरावस्था असे विविध ठिकाणी साफसफाईचा अभाव दिसत आहे

## आयटीआयमध्ये सोमवारी शिकाऊ उमेदवार भरती मेळावा

**अमरावती-** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती येथे सोमवार २५ मे रोजी सकाळी १० वाजता भव्य शिकाऊ उमेदवार भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा संस्थेच्या एनएसएस हॉलमध्ये पार पडणार आहे.अमरावती जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण, तसेच सध्या अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना यात सहभागी होता येणार आहे. यात फिटर, टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, डिझेल मेकॅनिक, मोटर मेकॅनिक व्हेइकल, वायरमन, इलेक्ट्रीशियन, आरएसी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षणार्थी सहभागी होऊ शकतील.भरती प्रक्रियेसाठी नागपूर आणि पुणे येथील कंपन्या उपस्थित राहणार आहे. उमेदवारांनी मेळाव्याला येताना आपला अद्ययावत बायोडाटा आणि सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

# शिक्षणाचा बाजार आणि स्वप्नांची हत्या

आज देशात शिक्षण नावाची पवित्र व्यवस्था उरली आहे का, हा प्रश्न सामान्य माणसाला पडू लागला आहे. कारण ज्या व्यवस्थेवर लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य उभे असते, तीच व्यवस्था आता पैशाच्या दलदलीत रुतून बसलेली दिसते. NEET सारख्या देशातील सर्वोच्च वैद्यकीय प्रवेश परीक्षेभोवती निर्माण झालेला पेपरफुटीचा संशय, एजंटांचे जाळे, कोट्यवधी रुपयांचे व्यवहार आणि सत्तेच्या छायेखाली चालणारा हा खेळ पाहिला की मन सुन्न होते.

ज्या देशात मटक्याचा आकडा सुद्धा लीक होत नाही, त्या देशात लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणारा पेपर परीक्षा होण्यापूर्वी बाजारात फिरतो आणि तरीही काही लोक निर्लज्जपणे म्हणतात 'व्यवस्था पारदर्शक आहे.'ही पारदर्शकता नाही; हा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर उघडपणे टाकलेला काळाबाजार आहे.

एका गरीब घरातील मुलगा पहाटे चार वाजता उठून अभ्यास करतो.आई शेतात राबते.वडील कर्ज काढतात.बहिण स्वतःच्या शिक्षणाचा त्याग करते.घरात एक डॉक्टर झाला तर संपूर्ण कुटुंब गरीबीच्या अंधारातून बाहेर येईल, या आशेवर ते जगत असतात.

पण दुसऱ्या बाजूला वातानुकूलित खोल्यांमध्ये बसलेली पैशाची मस्ती चढलेली काही बापांची 'षंढ अपत्ये' असतात. अभ्यासाशी ज्यांचा काही संबंध नसतो, पण बापाच्या पैशावर, राजकीय ओळखीवर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या सेटिंगवर ते मेडिकल सीट विकत घेतात. मग हेच लोक उद्या पांढरा कोट घालून समाजासमोर 'डॉक्टर' म्हणून उभे राहतात.

आज डॉक्टरकी हा सेवाभाव राहिलेला नाही; तो एक मोठा उद्योग बनला आहे.रुग्ण हा माणूस कमी आणि 'कमाईचा प्रोजेक्ट' जास्त झाला आहे.कोणत्या टेस्टमधून किती कमिशन?कोणत्या ऑपरेशनमधून किती टक्का?कोणत्या औषध कंपनीकडून किती फायदा?सामान्य माणसाच्या शरीरातील प्रत्येक अवयवातून पैसा कसा कमवता येईल, हाच काहींचा धर्म झाला आहे.आणि या सगळ्याची सुरुवात होते ती शिक्षणातील भ्रष्टाचारातून.जेव्हा पैशाने डॉक्टर होता येते, तेव्हा सेवाभाव मरतो आणि व्यवसाय जन्माला येतो.

देशभरात पेपरफुटीची मालिका सुरूच आहे. बिहार, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश कोणते राज्य शिल्लक राहिले? पोलीस भरती, शिक्षक भरती, MPSC, रेल्वे परीक्षा, अगदी लहान पदांच्या भरतीपासून मोठ्या राष्ट्रीय परीक्षांपर्यंत सर्वत्र भ्रष्टाचाराचे राक्षसी जाळे पसरलेले दिसते. प्रत्येक वेळी काही एजंट पकडले जातात, दोन दिवस मीडिया आरडाओरडा करते, नेते एकमेकांवर आरोप करतात आणि नंतर पुन्हा सर्व काही शांत होते.पण त्या शांततेखाली लाखो विद्यार्थ्यांच्या तुटलेल्या स्वप्नांचा आवाज दडलेला असतो.



आजचा गरीब विद्यार्थी फक्त परीक्षेला सामोरा जात नाही;तो भ्रष्ट व्यवस्था, पैशांचा माज, राजकीय संरक्षण आणि शिक्षणमाफियांच्या साम्राज्याशी लढतो आहे.कोचिंग क्लासेसने शिक्षणाला व्यवसायाचे स्वरूप दिले आहे. लाखो रुपयांच्या फी घेऊन 'रँक' विकण्याचा धंदा सुरू आहे. गरीब विद्यार्थी पुस्तक विकत घेण्याचा विचार करतो, आणि श्रीमंत विद्यार्थी 'सीट पक्की' करण्याचा.ही स्पर्धा ज्ञानाची राहिलेली नाही; ही पैशांची लढाई बनली आहे.

आज परिस्थिती अशी झाली आहे की मेहनती विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील आत्मविश्वास मरू लागला आहे. त्याला वाटू लागले आहे की अभ्यास करून काही फायदा नाही; कारण निकाल आधीच पैशाने लिहिले जातात.हा देशासाठी सर्वात मोठा धोका आहे.कारण ज्या दिवशी गरीब विद्यार्थ्याच्या हातातून पुस्तक निसटेल, त्या दिवशी देशाच्या प्रगतीचा शेवट सुरू होईल.

विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारे हे लोक केवळ गुन्हेगार नाहीत; ते देशद्रोही आहेत.कारण ते एका पिढीची हत्या करत आहेत.एका गरीब आईच्या आशांचा खून करत आहेत.एका वडिलांच्या कष्टांची चिता पेटवत आहेत.आणि सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे या व्यवस्थेत अनेक राजकीय चेहरे, अधिकारी आणि पैशाचे दलाल सामील असल्याची जनतेत भावना निर्माण झाली आहे. सामान्य माणूस न्यायाची अपेक्षा कोणाकडून करणार?ज्यांच्या हातात व्यवस्था आहे,त्यांच्याच सावलीत हा बाजार फोफावत असेल, तर विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवायचा तरी कुणावर?

आज गरज आहे ती फक्त चौकशीची नाही, तर व्यवस्थेच्या शुद्धीकरणाची. पेपरफुटी करणाऱ्यांना, विद्यार्थ्यांचे भविष्य विकणाऱ्यांना आणि शिक्षणाला बाजार बनवणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. कारण अशा लोकांना माफी देणे म्हणजे पुढच्या पिढीच्या मृत्यूवर शिक्कामोर्तब करणे होय.

देश वाचवायचा असेल तर शिक्षण वाचवावे लागेल.आणि शिक्षण वाचवायचे असेल, तर पैशाच्या दलालांपासून परीक्षा व्यवस्था मुक्त करावी लागेल.'गरीबाच्या लेकराने पुस्तक उघडून भविष्य घडवायचे स्वप्न पाहिले पण व्यवस्थेने त्याचे स्वप्न बाजारात लिलावाला ठेवले.'

**-ॲड. धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# जागतिक मधमाशी दिन

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले.१७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला.या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते.मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे.मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत.तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो.



पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही.

मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे.पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार**

# अधिक मास एक पर्वणी

अधिक महिना ज्याला 'अतिरिक्त चंद्र महिना','अधिकमास', 'पुरुषोत्तम मास' किंवा 'धोंड्याचा महिना' असेही म्हणले जाते. हा हिंदू पंचांगातील एक आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण काळ आहे,जो साधारणपणे दर ३२-३३ महिन्यांनी चंद्र आणि सूर्य चक्रांना सरेखित करण्यासाठी येतो. दर तीन वर्षांनी येणारा एक अतिरिक्त महिना आहे. सौर वर्ष (३६५ दिवस) आणि चंद्र वर्ष (३५४ दिवस) यांच्यातील ११ दिवसांचा फरक भरून काढण्यासाठी दर ३२-३३ महिन्यांनी हा जादा महिना जोडला जातो. पूर्वी या महिन्याला 'दगड' किंवा 'धोंडा' प्रमाणे (निरुपयोगी) मानले जायचे कारण या अतिरिक्त महिन्यात विवाह, मुंज इत्यादी शुभकार्ये वर्जित असतात. नंतर भगवान विष्णूंनी या महिन्याचा स्वीकार केला आणि त्याला 'पुरुषोत्तम' असे नाव दिले. या काळात व्रतवैकल्ये, दान-धर्म आणि ईश्वर भक्तीसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. यात 'नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करणे अतिशय



फलदायी मानले जाते. या काळात विवाह समारंभ, गृहप्रवेश यांसारखी शुभकार्ये निषिद्ध मानली आहेत.

आपल्याकडे मुलगी आणि जावयाला लक्ष्मी नारायणाचा जोडा मानले जातो. अधिक मासात जावयाला दीपदान देण्याचेही महत्त्व आहे. हे पुण्यप्रद मानले जाते. अधिक महिना हा ३३ दिवसांचा असतो. त्यामुळे या महिन्यात ३३ या आकड्याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे या महिन्यात जावयाला वाण देतांना ३३ अनारसे किंवा इतर जाळीचे पदार्थ देण्याची प्रथा आहे. या सोबतच अनेकजण आपआपल्या कुवतीनुसार चांदीचा दिवा आणि सोन्याची भेटवस्तू देतात. अर्थातच सोन्या चांदीच्या वस्तू या वैकल्पिक आहेत. प्रत्येकजण आपल्या आर्थिक क्षमतेनुसार प्रथा पाळतो.

भगवान विष्णू यांचा आशीर्वाद मिळवण्यासाठी दीपदानाला महत्त्व आहे. धार्मिक मान्यतेनुसार जावयाला निरांजन दिल्यामुळे तुम्हाला लक्ष्मी आणि भगवान विष्णूचे आशीर्वाद मिळतात. लक्ष्मीमातेला चांदी अतिशय प्रिय आहे. त्यामुळे चांदीचे निरंजन द्यावे. जेव्हा तुम्ही चांदीचे निरांजन जावयाला देतात तेव्हा तुमच्यावरील यम, शनी, राहू आणि केतू ग्रहांचे वाईट परिणाम कमी होतात. म्हणून या महिन्यात अनेकजण जावयाला अधिक मासात घरी बोलवतात. ३३ अनारसे, ३३ बत्तासेसोबत एक चांदीचं निरांजन देतात. ३३ दिव्याने जावयाला औक्षण करतात. या महिन्यात भगवान विष्णूंची पूजा, नामस्मरण, जप, उपवास, भागवत कथा श्रवण, दीपदान, गोसेवा पुरुषोत्तम याग/विष्णू याग / लक्ष्मी नारायण याग/ सत्यनारायण महापूजा किंवा दानधर्म करावे.

ज्याप्रमाणे श्रावण महिन्यात भगवान शंकराची आराधना केली जाते त्याप्रमाणे अधिक मासात विष्णू व दत्त सेवेची पर्वणी मानून, सेवा अर्पण करून पुण्यसंचय केले जाते. अधिक मासात घरातील विष्णू मूर्ती, फोटो किंवा श्रीकृष्ण-दत्तांच्या प्रतिमेला रोज हार अर्पण करावा.महिनाभर दररोज गोपालकृष्णास लोणी-साखरेचा नैवेद्य दाखवावा. दिवसातून किमान एकदातरी विष्णू सहस्त्रनाम म्हणावे किंवा श्रवण करावे. रोज गोपालकृष्णाला तुलसीपत्र अर्पण करावे. रोज संध्याकाळी तुपाचा दिवा लावावा. तिळाच्या तेलाचा अखंड नंदादीप समयी स्वरूपात लावावा. दत्त मंदिर किंवा कृष्ण मंदिरात दीपासाठी तेल, तूप किंवा त्या स्वरूप पैसे दान द्यावेत. अधिक मासात गुरुजींना अन्न, फळे, वस्त्र व दक्षिणा अर्पण करून आशीर्वाद घ्यावेत. अन्नदानासाठी पैसे किंवा वस्तूरूपात देणगी अर्पण करावी. विद्यार्थी, गरीब किंवा निराधार कुटुंबांना सर्वतोपरी मदत करावी. या पवित्र महिन्यात आपल्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक परिस्थितीनुसार शक्य ती सेवा अवश्य करा. सध्या लहानांपासून थोरांपर्यंत मानसिक स्वास्थ्याची गरज आहे. अधिक मासानिमित्त श्री भगवान विष्णूंचे नामस्मरण करून मानसिक स्वास्थ्य व पुण्याचा संचय करू या!

**सीमा जवळकर**

# उष्णतेच्या लाटांचे वास्तव

**भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) जाहीर केलेल्या उन्हाळ्याच्या अंदाजानुसार, यंदा एप्रिल ते जून या कालावधीत देशात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. याच काळात महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचे दिवसही सरासरीपेक्षा जास्त राहू शकतात.**



यंदा एप्रिलच्या अखेरच्या आठवड्यात महाराष्ट्रासह मध्य आणि उत्तर भारतातील बहुतांश राज्यांमध्ये कमाल तापमानाचा पारा ४० ते ४६ अंशांच्या दरम्यान पोचला. अशातच एका खासगी वेबसाइटने जगातील सर्वाधिक तापमानाच्या १०० शहरांची यादी जाहीर केली. या १०० शहरांपैकी ९५ शहरे भारतातील असल्याचे आणि सर्वोच्च स्थानी महाराष्ट्रातील अकोला (४६.९ अंश सेल्सिअस) असल्याचे दिसून आल्यावर माध्यमांनी आणि सोशल मीडियाने या आकडेवारीला मोठी प्रसिद्धी दिली. झाडे तोडल्याचा, विकासाचा हा परिणाम असल्यापासून ते ग्लोबल वॉर्मिंग, एल निनोपर्यंत कारणे देत यावर चर्चा झाली. व्हॉट्सॲपवरील फॉरवर्डने तर कहर केला. 'मे महिन्याच्या मध्यापर्यंत देशातील कमाल तापमान ५५ अंशांपर्यंत जाईल. मोबाईलची बॅटरी फुटेल,'अशा आशयाच्या मेसेजमुळे लोकांच्या चिंतेत भर पडली.

महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये काही ठिकाणी तीव्र उष्णतेच्या लाटेची स्थिती असून, उष्माघाताच्या घटनांमध्येही वाढ होत आहे ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सोशल मीडियावर तापमानावरून होणारी चर्चा आणि डिजिटल माध्यमांवरील व्हिडीओमधून केले जाणारे दावे यांमध्ये शास्त्रीय माहितीचा अभावही दिसून येत आहे.

सूर्य २१ मार्चला विषुववृत्त ओलांडून उत्तर गोलार्धाच्या आकाशात उत्तरेकडे सरकू लागतो आणि उत्तर गोलार्धातील उन्हाळा सुरू होतो. २१ जून रोजी तो त्याच्या सर्वोच्च उत्तर स्थानी म्हणजे कर्कवृत्तावर पोचतो. त्यानंतर पुन्हा त्याचे दक्षिणायन सुरू होते. २२ सप्टेंबरला त्याने विषुववृत्त ओलांडले की, उत्तर गोलार्धाचा उन्हाळा संपतो. या कालावधीत भारतात मार्च ते मे या महिन्यांमध्ये उन्हाळा किंवा मान्सूनपूर्व हंगाम आणि जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये मान्सूनचा हंगाम असतो. जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये उन्हाळा असूनही मोसमी वाऱ्यांचा प्रवाह आणि ढगांमुळे देशात कमाल तापमानात मोठी वाढ दिसून येत नाही. १० एप्रिलला सूर्य कन्याकुमारीच्या अगदी डोक्यावर असतो. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या दक्षिण भारतावर उन्हाळ्याचा प्रभाव तेव्हापासून सुरू होतो. मान्सून सर्वसाधारणपणे एक जूनला केरळमध्ये दाखल होऊन आठ जुलैला तो संपूर्ण देश व्यापतो. त्यामुळे देशाच्या विविध प्रदेशांत सर्वसाधारणपणे ५० ते ८० दिवस उन्हाळ्याचे असतात.

जसा दरवर्षीचा मान्सून वेगळा असतो, तसाच उन्हाळाही वेगळा असतो. या ५० ते ८० दिवसांमध्ये काही वर्षी उष्णतेच्या लाटा अधिक येतात, तर काही वर्षी सरासरीपेक्षा जास्त मान्सूनपूर्व सरींमुळे कमाल तापमान कमी नोंदले जाते. एप्रिलमध्ये या आधीही अनेकदा कमाल तापमान चाळीस अंशांच्यावर नोंदले गेले असून, महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटांची स्थितीही तयार झाली आहे. अकोल्याचे ४६.९ अंश तापमान सध्या चर्चेत आहे. मात्र, याआधी २९ एप्रिल २०१३ ला चंद्रपूरमध्ये ४७.६ अंश सेल्सिअस, नागपूरमध्ये ३० एप्रिल २००९ ला ४७.१ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले होते. २०१६ ते २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये पाच वेळा कमाल तापमान ४५ अंश किंवा त्यापेक्षा जास्त नोंदले गेले. याचा अर्थ एप्रिलमध्ये उष्णतेची लाट यावर्षी पहिल्यांदाच आलेली नाही. भारताचे भौगोलिक स्थान पाहता, सर्वोच्च तापमानाच्या जागतिक यादीत एप्रिल, मेमध्ये भारतातील अनेक शहरे वरच्या स्थानावर असणे असामान्य नाही. ही स्थिती आता दरवर्षी अशीच असेल असे म्हणणेही योग्य ठरणार नाही.

तापमान, आर्द्रता, वारे, दाब आणि पाऊस या घटकांवर एखाद्या ठिकाणचे ठराविक स्थितीत हवामान अवलंबून असते. वारे समुद्रावरून येत आहेत की जमिनीवरून, हवेत बाष्प जास्त आहे की कमी, वातावरणाचा दाब जास्त आहे की कमी यांवर एखाद्या ठिकाणच्या तापमानातील चढ-उतार अवलंबून असतात. वातावरणाचा दाब कमी असेल, तर त्या भागावर ढगांची निर्मिती होण्याची शक्यता वाढते. दाब जास्त असेल, तर ढग तयार न होता हवा कोरडी राहून उन्हाळ्यात उष्णता साचून राहते. वारे जमिनीवरून आले तर ते कोरडे असतात. मात्र, समुद्रावरून आले तर ते बाष्पयुक्त असू शकतात. उन्हाळ्यात सर्वसाधारणपणे समुद्रापासून दूर असलेल्या भागांमध्ये कोरड्या हवेमुळे कमाल तापमान ४० अंशांपेक्षा जास्त असते. किनारपट्टीजवळील भागात मात्र, समुद्रावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे तापमान सहसा ४० अंशांच्या वर जात नाही.

महाराष्ट्रासह देशात सध्या सुरू असलेल्या उष्णतेच्या लाटांमागे असेच वेगवेगळे घटक कारणीभूत असल्याचे हवामानतज्ज्ञांचे म्हणणे आहे. एप्रिल, मे हे जसे उन्हाळ्याचे महिने आहेत, तसेच ते मान्सूनपूर्व पावसाचेही महिने आहेत. महाराष्ट्रासह दक्षिण भारतात या काळात समुद्रावरून बाष्प येण्यास सुरुवात होते. वाढलेले कमाल तापमान आणि आर्द्रता यांच्या संयोगामुळे स्थानिक पातळीवर उंच ढगांची निर्मिती होऊन मेघगर्जनेसह पाऊस होतो. याच काळात उत्तर भारतात पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे पाऊस होत असतो. हा पाऊस वाढणाऱ्या तापमानाला काहीसे नियंत्रित करत असतो. यंदा या पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्याने दीर्घकाळ हवा कोरडी राहून उष्णतेच्या लाटांचे दिवस वाढत गेले. याच्या जोडीला महाराष्ट्रावर वातावरणाच्या मधल्या थरात जास्त दाबाचे क्षेत्र (ॲंटी सायक्लोनिक स्थिती) सक्रिय राहिल्याने जमिनीजवळ उष्णता साचून राहण्यास मदत झाली. पंजाब, हरियाणा, राजस्थानपासून दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातपर्यंतच्या मोठ्या प्रदेशात कोरड्या हवेमुळे अनेक ठिकाणी आठवडाभरापेक्षा जास्त काळ कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त नोंदले गेले. महाराष्ट्रात विदर्भात याची तीव्रता अधिक आहे.

वाढणाऱ्या तापमानाचा परिणाम ग्रामीण भाग किंवा वनक्षेत्रापेक्षा शहरांमध्ये जास्त जाणवतो. शहरांमधील बहुतांश भाग हा इमारती आणि रस्त्यांमुळे काँक्रीटने व्यापलेला असतो. अनेक इमारतींना काचेच्या भिंती असतात. दिवसा काँक्रीट तापल्यावर त्याच्या लगतची हवादेखील दीर्घकाळ उष्ण राहते. गरम झालेल्या हवेचे इमारतींच्या गर्दीमुळे योग्यप्रकारे वहन होत नाही. यातूनच शहरावर एखाद्या उष्ण बेटासारखी (हिट आयलंड) स्थिती तयार होते. त्यामुळे उष्णतेच्या लाटेच्या स्थितीत एकाच जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील कमाल तापमानात मोठी तफावत दिसून येते.

कमाल तापमानासोबत हवेतील बाष्पाचेही प्रमाण काहीसे वाढले, तर उष्मा निर्देशांक त (हिट इंडेक्स) वाढ होत असते. वाढलेला उष्मा निर्देशांक मानवी आरोग्यासाठी जास्त धोकादायक ठरू शकतो. हवेचे तापमान आपल्या शरीराच्या तापमानापेक्षा जास्त झाल्यास नैसर्गिकपणे घाम येऊन त्याद्वारे आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्याची प्रक्रिया होत असते. मात्र, हवेत उष्णतेसोबत बाष्पही ठराविक प्रमाणापेक्षा जास्त असल्यास घाम येण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो आणि शरीराचे तापमान वाढून त्याचा थेट परिणाम मेंदूसह विविध अवयवांवर होतो. एप्रिल २०२३ मध्ये खारघर येथे झालेल्या कार्यक्रमात १५ जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला होता. त्यामागील कारणही वाढलेला उष्मा निर्देशांकच होते.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) जाहीर केलेल्या उन्हाळ्याच्या अंदाजानुसार, यंदा एप्रिल ते जून या कालावधीत देशात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. याच काळात महाराष्ट्रासह देशाच्या बहुतांश भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचे दिवसही सरासरीपेक्षा जास्त राहू शकतात. सध्याची स्थिती पाहता, हा अंदाज योग्यच असल्याचे दिसून येत आहे. आयएमडीच्या निकषांनुसार मैदानी प्रदेशात कमाल तापमानाचा पारा ४० अंश; तर पर्वतीय क्षेत्रात ३० अंशांवर पोचल्यावर उष्णतेची लाट निश्चित करण्यासाठीचे निकष लावले जातात. जर एखाद्या ठिकाणचे तापमान तेथील सर्वसाधारण तापमानाच्या तुलनेत ४.५ ते ६.४ अंश सेल्सिअसने जास्त नोंदले गेले, तर त्या स्थितीला उष्णतेची लाट आणि ६.४ अंशांपेक्षा जास्त नोंदले गेले, तर त्या स्थितीला तीव्र उष्णतेची लाट म्हटले जाते. सध्या देशातील अनेक शहरांमध्ये सर्वसाधारण तापमानाच्या तुलनेत तीन ते सहा अंशांची वाढ नोंदली गेली असून, कमाल तापमान ४० ते ४६ अंशांच्या दरम्यान नोंदले जात आहे. या स्थितीचा थेट परिणाम विविध राज्यांमध्ये दिसूनही येत आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत दोन महिला आणि एका नऊ महिन्यांच्या बालिकेचा उष्माघातसदृश त्रासामुळे मृत्यू झाल्याची नोंद झाली असून, विविध जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या त्रासामुळे ४० पेक्षा अधिक रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

देशात गेल्या पाच दशकांमध्ये उष्माघाताने सुमारे १७००० जणांचा मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते. शारीरिक कष्टाची कामे करणारे, शेतकरी, लहान मुले, वृद्ध यांना उष्माघाताचा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. सध्याच्या स्थितीत केंद्र सरकारतर्फे सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्माघातावर उपचार करण्यासाठी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. मात्र, उष्माघाताचा त्रास होऊ नये यासाठी नागरिकांनी स्वतः काळजी घेणे आवश्यक आहे. उष्णतेची लाट सुरू असताना सकाळी ११ ते दुपारी चार या वेळेत बाहेर जाणे, शरीराचे तापमान वाढणार नाही याची दक्षता घेणे, पुरेसे पाणी पीत राहणे, कामाच्या वेळा बदलणे यातूनही उष्माघाताचा धोका टाळता येऊ शकतो.

**- मयुरेश प्रभुणे**

# रेल्वेच्या कारवाईपूर्वी पुनर्वसन करा; नागरिकांना बेघर करू नका - आ. साजिद खान पठाण

## तारफैल परिसरातील कुटुंबीयांचा प्रश्न ऐरणीवर

### भूमी अभिलेख कार्यालयात बैठक घेऊन मोजणीतील तांत्रिक बाबींचा घेतला आढावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील तारफैल परिसरात गेल्या तीन पिढ्यांपासून वास्तव्यास असलेल्या कुटुंबांवर बेघर होण्याची टांगती तलवार निर्माण झाली आहे. रेल्वे विभागाकडून संबंधित जागा ताब्यात घेण्याच्या हालचालींना वेग आल्याच्या पार्श्वभूमीवर पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात बैठक घेत प्रशासनाकडे प्रभावित कुटुंबियांच्या पुनर्वसनाची जोरदार मागणी केली.



तारफैल परिसरातील काही भाग रेल्वे विभागाच्या अखत्यारीत येत असून, त्या ठिकाणी अनेक कुटुंबे दशकांपासून राहत आहेत. रेल्वे प्रशासनाकडून जागा ताब्यात घेण्याच्या हालचाली सुरू झाल्यानंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर भूमी अभिलेख विभागामार्फत जागेची मोजणीही करण्यात आली आहे.

बैठकीदरम्यान आ. पठाण यांनी मोजणी शिट, सीमांकन व अन्य तांत्रिक बाबींचा सविस्तर आढावा घेतला. 'जागा ताब्यात घेण्यापूर्वी शासनाने प्रभावित कुटुंबियांचे पुनर्वसन करणे अत्यावश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना अचानक बेघर करू नये,' अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. जर तातडीने तोडगा निघत नसेल, तर कुटुंबियांना पर्यायी व्यवस्था करण्यासाठी काही कालावधी देण्यात यावा, अशीही मागणी त्यांनी केली.

यापूर्वीही या प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली होती. तसेच पालकमंत्री आकाश फुंडकर आणि जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याशी चर्चा करून पुनर्वसनाचा मुद्दा मांडण्यात आला होता. यावेळी 'कोणावरही अन्याय होणार नाही,' अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिल्याची माहिती आ. पठाण यांनी दिली.

दरम्यान, जुने शहरातील गडंकी परिसरातील काही जागाही रेल्वे प्रशासन ताब्यात घेत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी आ. पठाण यांना दिली. या प्रकरणातही भूमी अभिलेख विभागाने तातडीने मोजमाप करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.या बैठकीला माजी नगरसेवक मोहम्मद इरफान, नगरसेविका सुवर्णरेखा विजय जाधव, मोईन खान यांच्यासह परिसरातील नागरिक व प्रभावित कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऑपरेशन 'प्रहार'ची जुने शहरातच पडझड?

- दंगलग्रस्त हॉटस्पॉटवर जुगार अड्ड्यांचे साम्राज्य
- 'रहीम-भन्साली-रहेमान'ना नेमका कुणाचा वरदहस्त?

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोला : शहरातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलिस विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या 'ऑपरेशन प्रहार'ची प्रत्यक्षात जुने शहर परिसरातच 'हार' होत असल्याचे चित्र समोर येत आहे. दंगलीच्या संवेदनशील आणि वादग्रस्त ठिकाणीच खुलेआम वरली, टेबल जुगार आणि क्लबच्या माध्यमातून अवैध धंदे फोफावत असल्याची गंभीर चर्चा रंगली असून, स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर नागरिकांकडून तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**

जुने शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बाळापूर नाका परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अवैध धंद्यांनी अक्षरशः डोके वर काढले आहे. विशेष म्हणजे, याच परिसराला पूर्वीच्या दंगलींमुळे 'हॉटस्पॉट' म्हणून ओळखले जाते. अशा संवेदनशील भागातच भन्साली नामक व्यक्तीने चार भागीदारांच्या मदतीने टेबल वरली आणि जुगाराचा मोठा अड्डा उभारल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर येत आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या धंद्याकडे पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने परिसरात संतापाचे वातावरण आहे.

याच भागात काही अंतरावर रहीम नामक इसमानेही अवैध व्यवसायांचे जाळे विस्तारल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी पोलिसांनी संबंधित ठिकाणावर कारवाई करत शटर कुलूपबंद केल्याचे सांगितले जात होते. मात्र काही महिन्यांच्या शांततेनंतर पुन्हा तोच अड्डा पूर्ववत सुरू झाल्याने पोलिसांच्या कारवाईच्या गांभीर्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. 'कारवाई फक्त दिखावा होती का?' असा सवाल स्थानिक नागरिक आता उघडपणे विचारू लागले आहेत.

दरम्यान, चांदखाँ प्लॉट परिसरात रहेमान नामक व्यक्तीने एका मोठ्या घरात जुगार क्लब सुरू केल्याची माहिती पुढे आली आहे. या क्लबमध्ये रात्री उशिरापर्यंत संशयास्पद हालचाली सुरू असल्याची चर्चा असून, परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संवेदनशील भागात वाढणाऱ्या या अवैध धंद्यांमुळे पुन्हा कायदा-



सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेष बाब म्हणजे, या तिन्ही अवैध धंद्यांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना असताना स्थानिक पोलिसांना याबाबत 'काहीच माहिती नाही', ही भूमिका नागरिकांच्या पचनी पडत नाही. जुने शहर पोलिस ठाण्याचे डीबी पथक नेमके करते तरी काय, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. 'ऑपरेशन प्रहार'च्या नावाखाली छोट्या-मोठ्या कारवायांचे प्रसिद्धीपत्रक झळकवले जात असताना, प्रत्यक्षात मोठे अड्डे मात्र राजरोस सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे.

या अवैध धंद्यांमागे आर्थिक आणि राजकीय पाठबळ तर नाही ना, अशीही चर्चा रंगू लागली आहे. संवेदनशील परिसरात जुगार अड्डे वाढत असताना पोलिसांची संशयास्पद शांतता भविष्यात मोठ्या घटनांना आमंत्रण ठरू शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. त्यामुळे पोलिस अधीक्षकांनी स्वतः या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# अचूक मतदारयाद्यांसाठी सर्वांनी सहकार्य करावे - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

अचूक, अद्ययावत व पारदर्शक मतदार यादी तयार करणे ही लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत महत्वपूर्ण बाब आहे. त्यामुळे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने या कार्यासाठी व व्यापक मतदार जागृतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

भारत निवडणूक आयोगाने 'विशेष सखोल पुनरिक्षण' (SIR) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. त्याबाबत माहिती देण्यासाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांच्या अध्यक्षतेत झाली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर, इतर अधिकारी व सर्व पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपस्थित प्रतिनिधींना बैठकीत कार्यक्रमाची सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

# मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करा - जिल्हाधिकारी वर्षा मीना



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात नालेसफाई, नादुरुस्त पूल, रस्ते, प्रकल्पांची दुरूस्ती आदी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावी. धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नोटीसा द्याव्यात. त्याचप्रमाणे, तहसील स्तरावरील, तसेच आरोग्य, नगरपालिका, महापालिका, साबांवि, पाटबंधारे आदी विभागांचे नियंत्रण कक्ष १ जूनपासून सुरू करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे व विविध यंत्रणाप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक इमारतींबाबत संबंधितांना सूचना द्यावी. दूषित पाण्यासंदर्भात तपासण्या वाढवा. जिल्ह्यात ५३ महसूल मंडळ स्तरावर रेनगेज व ?टोमॅटिक वेदर स्टेशन यंत्रणा कार्यान्वित आहे. या यंत्रणेची तपासणी व आवश्यक तिथे दुरूस्ती करून घ्यावी.

जिल्ह्यात पूर्णा, मोर्णा, काटेपूर्णा, पठार, वान, गौतमा, मन, मस, विश्वमित्रा, उमा, पेढी, निर्गुणा, खाईनदी, विद्रुपा नद्या वाहतात. तसेच, ८३ पूरबाधित गावे आहेत. वारंवार आपत्कालीन घटना झालेली १० ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी वेळीच सूचना देण्यासाठी फलक, संदेशवहन यंत्रणा, नियंत्रण कक्ष आदी व्यवस्था व्हावी. आवश्यक तिथे निवा-यांची सोय, तसेच सर्व प्रकल्पांची दुरूस्ती करावी, बिनतारी यंत्रणा स्थापित करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

त्या पुढे म्हणाल्या की, पावसाळा लक्षात घेता धोकादायक होर्डिंग्ज, जीर्ण झाडे काढावीत. जिल्हा व तहसील स्तरावरील शोध व बचाव पथकाचे प्रशिक्षण पूर्ण करावे. त्यांना आवश्यक लाईफ जॅकेट, रिंग, रोप, बोट, इमर्जन्सी लाईट आदी साहित्य उपलब्ध करून घ्यावे. शहरातील नालेसफाई, नदीनाल्याच्या प्रवाहातील अडथळे दूर करावेत. पावसाळ्यात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते. त्यामुळे स्वच्छता कामे पूर्ण करावीत, तसेच आरोग्य केंद्रे, पथके ठेवावीत. महावितरणकडून वीजवाहिन्यांजवळील धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी, खांब कोसळल्यास वेळीच उपाययोजनेसाठी यंत्रणा आदी कामे पूर्ण करून वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# माहेश्वरी भावनात श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने अधिक मासानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.स्थानीय माहेश्वरी भवन येथे सोमवार दिनांक २५ मे ते रविवार दिनांक ३१ मे पर्यंत नित्य सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित या भागवत कथेत आंतरराष्ट्रीय प्रवक्ते वृंदावन निवासी पू राजेश कृष्णाजी महाराज हे आपल्या ओजस्वी वाणीतून संगीतमय भागवत सादर करणार आहेत.



कथेच्या प्रारंभ दिनी सोमवार दिनांक २५ मे रोजी सकाळी ७ वाजता स्थानीय राणी सती धाम येथून माहेश्वरी भवन पर्यंत महिलांची भव्य मंगल कलश यात्रा निघणार आहे.यानंतर सकाळी ९ वाजता माहेश्वरी भवन येथे संगीतमय भागवत कथा प्रारंभ होणार आहे. मंगळवार दिनांक २६ मे रोजी कथेत कुंती चरित्र व सुखदेव परीक्षित मिलन यावर कथा होणार आहे.

## जाहिर सूचना

सर्व लोकांना या सुचनेव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी, सौ. अनिता सुरेश शेंडे, वय ५४, व्यवसाय- घरकाम, रा. तेल्हारा, जि अकोला, यांचे वैयक्तिक मालकीचा, ताब्यातील व बिनबोजाचा, मौजा तेल्हारा बु? येथील शेत सर्व्हे नंबर १८/क मधील प्लॉट क्रमांक ६ ब; एन्. ए.पी.३४/ तेल्हारा बु? /८/२००३-०४ अन्वये दि. १३-०७-२००४ चे विद्यमान एस्. डि. ओ. साहेब अकोट, जि. अकोला, चे आदेशानुसार अकृषक केलेला असुन त्याचे क्षेत्रफळ ११२ चौ. मिटर आहे.

मोजमाप- पूर्व-पश्चिम-७ मिटर (दोन्ही बाजु) व दक्षिण-उत्तर १६ मिटर (दोन्ही बाजु) चतुर्सिमा पुर्वेस-प्लॉर ७ अ . पश्चिमेस - प्लॉट ६ अ

उत्तरेस - जोध यांचे हे आऊट ; दक्षिणेस- ले आऊट रोड, वापर-दक्षिणेस.

येणेप्रमाणे सदर अकृषक प्लॉट विकत घेण्याचा सौदा पक्का केला असून लवकरच खरेदिखत करून घेण्याचे ठरले आहे. तरि वरिल वर्णनाच्या अकृषक प्लॉटवर कोणाचा कोणताही हितसंबंध, हक्क, गहाण, बोजा, वारसाहक्क, भाऊबंदकी हक्क वा इतर कोणताही शासकिय अथवा निमशासकिय बोजा असल्यास हि सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत सबळ पुराव्यासह खालील पत्यावर संपर्क साधावा. त्यानंतर कोणाचा कोणताही उजर नाहि असे समजुन मासे पक्षकार सदर प्लॉट चे खरेदिखत लिहून व नोंदवून घेतील. त्यावर कोणचाही उजर चालणार नाहि.

करिता हि जाहिर सुचना.

स्थळ-तेल्हारा
दिनांक-१९-५-२६

**पक्षकारातर्फे**
**ॲड. अमोल विजय हाडोळे**
शेगांव रोड, तेल्हारा, जि. अकोला
मो. ९८२२७४४९३१

## Change In Name

I have change
my name From
**FATEMA BI**
**-To-**
**FATEMA BI**
**MOHAMMAD ZUBAIR**
Address Bharat kirana
Chota Mominpura,
Balapur, Akola,
Maharashtra -444302
Passport No :- J3366873

## नावात बदल

मी प्रतिभा हर्षवर्धन ठाकरे हे माझे नाव असून माझे जुने नाव प्रतिमा महादेव भोयर असे होते.मात्र या पुढील माझे सर्व व्यवहार माझ्या नवीन नावानेच करण्यात यावा ह्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**नवीन नाव** - प्रतिभा हर्षवर्धन ठाकरे (Pratibha Harshvardhan Thakre)
**जुने नाव** - प्रतिमा महादेव भोयर (Pratima Mahadeo Bhoyar)

## Change In Name

I have change
my name From
**MOHAMMAD ZUBAIR**
**GHULAM JAFAR**
-To-
**MOHAMMED ZUBAIR**
**GHULAM JAFAR**
Address Bharat kirana
Chota Mominpura,
Balapur, Akola,
Maharashtra -444302
Passport No :-
N9617254

## Change In Name

I have change
my name From
**MARIYUM BARIRA**
**MOHAMMAD ZUBAIR**
**-To-**
**MARYAM BARIRA**
**MOHAMMAD ZUBAIR**
Address Bharat kirana
Chota Mominpura,
Balapur, Akola,
Maharashtra -
444302Passport No :-
J6023107

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६८४/२०२६ — प्रोसेस नं.५८५६/२०२६
चौ.ता. २९/०६/२०२६ — दिनांक : २९/०४/२०२६

**अर्जदार :** १. वैजंती अशोक जंजाळ २. प्रवरसेन अशोक जंजाळ ३. भारती उमेश शिरसाट रा. बदलापूर, ता. जि. अकोला. ४. दिप्ती धिरज आंग्रे रा. नगरपरिषद, लोटणापूर, ता. बाळापूर, जि. अकोला. ५. अश्विनी सुमित इंगळे रा. बौद्धपुरा, निमकर्दा, ता. बाळापूर, जि. अकोला. ६. पल्लवी अशोक जंजाळ क. १, २ व ६ रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक जगदेव जंजाळ
**पत्ता :-** रा. व्दारा वैजंती अशोक जंजाळ रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक जगदेव जंजाळ यांचे दि. ०७/०१/२०२६ रोजी राहते घरी मोरगाव भाकरे, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५३१/२०२६ — प्रोसेस नं.६३५१/२०२६
चौ.ता. १५/०६/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. प्रमिला साहेबराव जंजाळ २. भारत साहेबराव जंजाळ ३. संदीप साहेबराव जंजाळ ४. ईश्वर साहेबराव जंजाळ सर्व रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला. ह. मु. नागझरी रोड, मिलिंद नगर, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : साहेबराव सुखदेव जंजाळ
**पत्ता :-** रा. व्दारा कैलास सुखदेव जंजाळ, रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत साहेबराव सुखदेव जंजाळ यांचे दि. २५/०८/२०२३ रोजी शेगाव ता. शेगाव जि. बुलढाणा येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे प्रियंका प्रकाश देवरे यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. २१२८ दिनांक २८/०९/२०२१ या क्रमाकाचे मूळ रजी. खरेदी खत क्र. २१२८ दिनांक २८/०९/२०२१ खामगाव येथून कामानिमित्त जात असताना तेथील परिसरात हरवले आहे त्याबाबत प्रियंका प्रकाश देवरे यांनी दि. १९/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन खामगाव येथे online तक्रार दाखल केली आहे, त्याचे तक्रार क्र. १९३७९००४०७२६०००१६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०३ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ०३ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- १९/०५/२०२६

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९३८२४२

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३०/२०२६ — प्रोसेस नं.६२३३/२०२६
चौ.ता. २२/०६/२०२६ — दिनांक : ०४/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती नंदा अशोकराव देशमुख २. विवेक अशोकराव पवार (देशमुख) ३. विशाल अशोकराव पवार (देशमुख) ४. चेतन अशोकराव पवार (देशमुख) १ ते ४ रा. कट्यार, ता. जि. अकोला. ५. गौरी रितेश इंगळे ग्नाआधीचे नाव - गौरी अशोकराव देशमुख रा. व्दारा रितेश इंगळे, २ व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोकराव अंबादास देशमुख
**पत्ता :-** रा. कट्यार, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोकराव अंबादास देशमुख यांचे दि. २२/११/२०२५ रोजी कट्यार, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६८५/२०२६ — प्रोसेस नं.५६७३/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : २७/०४/२०२६

**अर्जदार :** १. भारती अरविंद कुरानी २. भावना अरविंद कुरानी (लग्नापूर्वीचे नाव) सौ. भावना राजेश सांगाणी (लग्नानंतरचे नाव) रा. ८८९, बालाजी रोड, गौरकर मोहल्ला, इतवारी, नागपूर, बगडगंज, नागपूर. ३. दिपा अरविंद कुरानी (लग्नापूर्वीचे नाव) सौ. दिपा केतन सांगाणी (लग्नानंतरचे नाव) रा. ५१ / ४, रविंद्र सरानी, बॅली म्युनसिपाल्टी, हावडा, वेस्ट बंगाल. ४. रूपल अरविंद कुरानी (लग्नापूर्वीचे नाव) रूपलबेन जसवंतराय गांधी (लग्नानंतरचे नाव) रा. विजय नगर, महाकाली मंदिर फेज, कॉलेज रोड, महुआ, भावनगर, महुआ, गुजरात. ३६४२९० ५. कल्पेश अरविंद कुरानी क. १ व ५ रा. व्हि. एच. बी. कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ६. मेघा अरविंद कुरानी (लग्नापूर्वीचे नाव) सौ. मेघा ललित पटेल (लग्नानंतरचे नाव) रा. भानू अपार्टमेंट नं. २, फ्लॅट क्र. १५, दुबे एस. टी. डी. गिता नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अरविंद मनीलाल कुराणी
**पत्ता :-** रा. व्हि.एच.बी. कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरविंद मनीलाल कुराणी यांचे दि. २०/०७/२०२२ रोजी राहते घरी, रतनलाल प्लॉट, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निदींष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७४७/२०२६ — प्रोसेस नं.६५०४/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. उज्वला गजानन नृपनारायण लग्नाआधीचे नाव- उज्वला लक्ष्मण सोनोने रा. शास्त्री नगर, योगेश किराणा जवळ, सिंधी कॅम्प, खदान, अकोला, ता. जि. अकोला. २. सरला राजु गवई लग्नाआधीचे नाव-सरला लक्ष्मण सोनोने रा. रमाबाई आंबेडकर नगर, हरिहर पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. लक्ष्मण पूर्णाजी सोनोने २. गिताबाई लक्ष्मण सोनोने
**पत्ता :-** रा. शास्त्री नगर, योगेश किराणा जवळ, सिंधी कॅम्प, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण पूर्णाजी सोनोने यांचे दि. १४/०२/२०२४ रोजी व मयत गिताबाई लक्ष्मण सोनोने यांचे दि. २८/०१/२०२४ रोजी शास्त्री नगर, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सिथेंट्रीक ट्रॅकसह विविध खेळांना प्राधान्य देऊन मैदानाचा आराखडा सादर करा-पालकमंत्री

**वर्धा/जनमाध्यम**

पोलिस कवायत मैदानाचे नुतणीकरण करतांना नागपूर व चंद्रपूरच्या धर्तीवर अद्यावत असे सिंथेटीक ट्रॅक तयार करण्यासोबतच विविध खेळाच्या मैदानाचा समावेश असावा. वेळप्रसंगी सार्वजनिक कार्यक्रम घेता यावे साठी प्रेक्षक गॅलरीसह विशेष आसन व्यवस्थेचा अंतर्भाव करुन आराखडा तयार करावा, अशा सुचना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केल्या.

पोलिस कवायत मैदानाच्या नुतणीकरण कामाचा आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. त्यावेळी त्यांनी या सुचना केल्या. यावेळी पोलिस अधिक्षक सौरभकुमार अग्रवाल, अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, पोलिस उपअधिक्षक (गृह) पुंडलीक भटकर, स्थानिक गुन्हे शाखेचे

## पोलीस कवायत मैदान नूतणीकरण कामाचा आढावा



विनोद चौधरी, सायवर सेलचे सहाय्यक पोलिस निरिक्षक आशिष चिलांगे आदी उपस्थित होते.पोलिस भरतीप्रसंगी उमेदवारांची एकाच ठिकाणी भरती प्रक्रिया राबविता येईल यादृष्टीने ४००, मीटर १०० मीटर धावपथ, बॉस्केट बॉल मैदान, व्हॉलिबॉल मैदान, जीम यासारख्या मैदानाचा आराखड्यात समावेश करण्यात यावा. मैदानावर स्पर्धा घेता येईल किंवा सार्वजनिक कार्यक्रम घेण्याकरीता मोठ्या मंचाची उभारणी करण्यात यावी. सोबतच पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, शौचालयाच्या स्वतंत्र व्यवस्थेचा आराखड्यात समावेश करण्यात यावा. संपूर्ण विद्युत व्यवस्था सोलर कार्यान्वित करण्यासाठी प्रेक्षक गॅलरीवर सोलर पॅनलची उभारणी होईल, अशा नियोजनाचा आराखडा तयार करण्यात यावा, असे पालकमंत्री भोयर यांनी सांगितले.यावेळी आर्किटेक्चरने तयार केलेल्या आराखड्याची पावर पॉईंट प्रेजेंटेशनद्वारे पाहणी करुन यामध्ये काही बाबी सुचविण्यात आल्या. आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी १० कोटी रुपये अपेक्षित असल्याचे यावेळी सांगण्यात आले.यावेळी डॉ.पंकज भोयर यांनी प्रगतीपथावर असलेल्या जलतरण तलावाची पाहणी करुन लवकरात लवकर कामे पुर्ण करावे, अशा सुचना देऊन पार्किगची व्यवस्था तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

जलतरण तलाव परिसरात मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध असून गॅलरीमध्ये वाढ करावी. यासाठी आणखी निधीची आवश्यकता असल्यास मंजूर करण्यात येईल. खुल्या जागेवर स्पोर्ट कॉम्प्लेक्स बांधण्याचे निर्देश यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

**नगर परिषदेच्या जलतरण तलावाची पाहणी**

नगर परिषदेच्यावतीने महिला व बालकांसाठी ५ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या व सद्या प्रगतीपथावर असलेल?या जलतरण तलावाची पाहणी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केली. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, मुख्याधिकारी विजय देशमुख, नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे अभियंता उपस्थित होते.

# औषध विक्रेत्यांनी पुकारलेल्या संप काळात उपाययोजना

**वर्धा/जनमाध्यम**

ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट या संघटनेने ऑनलाईन इंटरनेट फार्मसीच्या विरोधात २० मे रोजी किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांनी औषधी व्यवसाय बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहे. संप काळात नागरिकांना औषध खरेदीबाबत अडचण असल्यास नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

औषध विक्रेत्यांनी बंद पुकारलेल्या काळात रुग्णांची गैरसोय होऊ नये तसेच अत्यावश्यक औषधाचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत किरकोळ व घाऊक औषध विक्रेते यांच्याशी वैयक्तिक स्तरावर संपर्क साधून नियाजित बंदमध्ये सहभागी होऊ नये, याबाबत सातत्याने आवाहन करण्यात येत आहे. संपाच्या कालावधीत रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी काही औषध दुकाने सुरु राहतील. याची दक्षता घेण्याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या असून त्यांनी सहमती दर्शविली आहे. आणीबाणीच्या प्रसंगी औषधांची आवश्यकता भासल्यास रुग्णांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी औषध निरिक्षक नालंदा उरकुडे ९०९६४१४१०४ व सहाय्यक आयुक्त निरज लोहकरे यांच्या ७२७६५४४९७२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**तालुकानिहाय संपर्क अधिकारी**

आर्वी- गोवर्धन कट्यारी ९४२३११८४७५, आष्टी – आशुतोष देशमुख ९४२३४२०७००, देवळी – अजय देशमुख ९३७२७६८६२७, हिंगणघाट – गोपाल इखार ९९२३४५२००९, समुद्रपूर – महेश गौर ९८२३४१५३९८, कारंजा – प्रेम गाखरे ८८०५३३७०३३, सेलू – संजय जयस्वाल ९९६०१३७७२६ व वर्धा – मनोज बोरा यांच्या ९९२३१९२३६० या मोबाईल क्रमांकावर औषध खरेदीबाबत अडचण असल्यास संपर्क साधावा, असे अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध सहाय्यक आयुक्त निरज लोहकरे यांनी कळविले आहे.

# तंबाखू विरोधी दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जनजागृती करण्यासाठी दरवर्षी ३१ मे रोजी तंबाखू विरोधी दिन साजरा करण्यात येतो. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या तंबाखू विरोधी कार्यक्रमास नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानामध्ये सामाजिक जनजागृती उपक्रम, तंबाखूमुक्त शाळा, धूरमुक्त गाव, कोटपा कायदा २००३ ची प्रभावी अंमलबजावणी आणि तंबाखूमुक्त गाव, मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे कोटपा कायदा २००३ अंतर्गत जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये तंबाखूमुक्त शासकीय कार्यालयांची आकस्मिक तपासणी, तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत विविध माध्यमांद्वारे जनजागृती तसेच विविध तंबाखू मुक्ती केंद्रांमध्ये तंबाखूचे सेवन करणाऱ्या लोकांचे समुपदेशन करण्यात येणार आहे.

तंबाखू विरोधी दिनानिमित्त जागतिक आरोग्य संघटनेने 'निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाचा सामना करण्याच्या आकर्षणाचा उलगडा' हे घोषवाक्य निवडले आहे.भारताचा तंबाखु उत्पादन आणि सेवन करण्यात दुसरा क्रमांक लागतो आणि मुख कर्करोगाच्या बाबतीत जगात पहिला क्रमांकावर आहे. तंबाखुच्या जागतिक साथीमुळे द रवर्षी ६ मिलीयन लोकांना मृत्यु येतो. त्यातले ६ लाख लोक हे तंबाखु न वापरणारे असुन दुसऱ्यांनी सोडलेल्या धुर श्वासाद्वारे घेतल्याने मृत्य पावतात, म्हणजे स्वतःचा काहीही दोष नसताना हे लोक अकारण बळी पडतात. महाराष्ट्रात राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणी ३ मध्ये सर्व प्रकारच्या तंबाखुचे प्रमाण तरुण व वयस्क लोंकामध्ये २५ टक्केच्या आसपास दिसते. तर गॅटस संस्थेद्वारा केलेल्या तंबाखुचे सर्वेक्षणामध्ये ते ३४ टक्केच्या वर गेले. सन



२०१२ – २०१३ मध्ये जिल्हास्तरीय घरोघरी व संस्थेच्या केलेल्या सर्वेक्षणात महाराष्ट्राचे प्रमाण हे ५० टक्के पेक्षा जास्त दिसते. हा चढता आलेख आणि विदर्भातीत यवतमाळ, गडचिरोली, अमरावती व चंद्रपुर तर पश्चिम महाराष्ट्रात नंदुरबार या जिल्हयात ६५ टक्के पेक्षा जास्त प्रमाण म्हणजे दर तिन व्यक्तीमागे २ किंवा जास्त लोक तंबाखु वापरतात असे दिसते.

सन २०१६ ते २०२६ पर्यंत एकूण १ लाख १३ हजार ३९७ रुग्णांची तपासणी करुन समुपदेशन करण्यात आले असून १ हजार ७७४ रुग्णांना व्यसनमुक्त करण्यात आले आहे. तसेच तंबाखू नियंत्रण कायद्यांतर्गत पोलिस विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या मदतीने सुगंधीत तंबाखू व गुटखा विरोधी केलेल्या कारवाईत एप्रिल २०२३ ते मार्च २०२६ पर्यंत १५ हजार ५५९ किलो माल जप्त करुन केली. या मालाची किंमत २ कोटी ४४ लाख ९० हजार ६४० रुपये इतकी होती.अंमलबजावणी पथकामार्फत सन २०१६ ते मार्च २०२६ पर्यंत ३ हजार ३२५ लोकांवर कार्यवाही करुन ३ लाख ६९ हजार ७९९ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तंबाखूमुक्त शाळांतर्गत जिल्ह्यातील १ हजार ५११ शाळा शाळांपैकी १ हजार २९१ शाळा तंबाखूमुक्त करण्यात आल्या आहेत. तसेच २२३ संस्था तंबाखूमुक्त घोषित करण्यात आल्या असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी सांगितले.

# शनी-राहूच्या भीतीतून जनतेची लूट

## भोंदू ज्योतिषांच्या काळया बाजाराविरोधात पुरोगामी संघटना रणांगणात

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रहदोष, शनीची साडेसाती आणि रत्नांच्या अंगठ्यांच्या नावाखाली सुरू असलेली जनतेची आर्थिक लूट आता खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देत वर्ध्यातील पुरोगामी व परिवर्तनवादी संघटना भोंदू ज्योतिषांविरोधात आक्रमक झाल्या आहेत. जादूटोणा विरोधी कायदा आणि केंद्रीय ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत संबंधित ज्योतिषी व ज्वेलर्स दुकानदारांवर तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

महाराष्ट्रात अशोक खरात या भोंदू ज्योतिषाने अनेक व्यापारी, अधिकारी, मंत्री, आमदार व खासदारांना गंडा घातल्याची प्रकरणे ताजी असतानाच वर्धा जिल्ह्यातही काही



स्वयंघोषित 'ज्योतिष्याचार्य' सोशल मीडियावर, जाहिरातींमधून आणि पत्रकांच्या माध्यमातून लोकांच्या अडचणींचा बाजार मांडत असल्याचा आरोप करण्यात आला. तुमच्यावर शनी, राहू, केतूची वक्रदृष्टी आहे, असे सांगून पाचू, नीलम, मुंगा यांसारखी महागडी रत्ने विशिष्ट दुकानांतून खरेदी करण्यासाठी दबाव टाकला जातो. त्यातून लाखो रुपयांची फसवणूक होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.ज्योतिष हा विज्ञान नसून ठोकताळ्यांचा व्यवसाय आहे, असे जगातील १९८ नोबेल विजेत्या शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले होते, याची आठवणही निवेदनातून करून देण्यात आली. तरीही अंधश्रद्धेचा बाजार तेजीत असून लोकांच्या भीतीवर कमिशनखोरीचे साम्राज्य उभे राहत असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, ज्योतिषाच्या जाहिरातींना विरोध करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या द्वारकाताई ईमडवार यांना कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची नोटीस पाठविण्यात आल्याने संताप अधिकच वाढला आहे. चिकित्सा करणाऱ्यांचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न आहे, असा आरोप संघटनांनी केला.

यावेळी अंनिसचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, भरत कोकावार, द्वारका ईमडवार, दिलीप उटाणे, ॲड. दुर्गाप्रसाद मेहरे, अतुल शर्मा, महेंद्र मुनेश्वर यांच्यासह विविध पुरोगामी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई

**अल्लीपूर**- गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर अल्लीपूर पोलिसांनी कारवाई करत ट्रॅक्टरसह ७ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अल्लीपूर ते धोत्रा मार्गावरील एकुर्ली फाट्याजवळ ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून एमएच ३२ एएस ५६३८ क्रमांकाच्या ट्रॅक्टरची तपासणी केली. यावेळी ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास माती आढळून आली. कोणतीही परवानगी नसल्याने पोलिसांनी ट्रॅक्टर व माती जप्त केली. या कारवाईत ७ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. प्रकरणी नरेंद्र घुसे (३२) रा. अल्लीपूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# प्रहारचे 'शौर्य शिबीर' येत्या १ जूनपासून

**वर्धा/जनमाध्यम**

स्थानिक प्रहार समाज जागृती संस्थेच्या वतीने येत्या १ जुन ते ५ जुन दरम्यान सेवाग्राम आश्रम परिसरात प्रहारचे शौर्य तथा व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. सदर शिबिरात ९ वर्षावरील मुले मुली सहभागी होऊ शकतात. या शिबिरात २१ प्रकारचे अडथळा पार प्रशिक्षण, रॉक



क्लाइंबिंग, रेपेलिंग, जंगल भ्रमंती, जंगल खोज, बौद्धिक खेळ, व्यक्तिमत्त्व विकास, सैन्य दलात सहभागी होण्याकरिता मार्गदर्शन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन राहील.इच्छुकांनी प्रहार संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर यांच्याशी ९४२२१४२५०७ या व्हाट्सअप क्रमांकावर किंवा संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप दाते ९४२२१४४८१७ यांच्याशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा. सदर शिबिरात पहिल्या ५० मुला मुलींना सहभागी करण्यात येणार आहे.

# आजारपणाला कंटाळून इसमाची आत्महत्या

**खारांगणा**- सातताच्या आजारपणाला कंटाळून एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना परसोडी येथे घडली. मोहन गायकवाड (४०) असे मृताचे नाव असून ते मागील काही दिवसांपासून आजारी होते. आजारामुळे ते मानसिक तणावात असल्याचे सांगितले जात आहे. घरातील सदस्य बाहेर असताना त्यांनी राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. काही वेळाने ही बाब निदर्शनास येताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी स्वाती गायकवाड यांच्या तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**युवकाने केले कीटकनाशक प्राशन**

**वर्धा** - दारूच्या नशेत कीटकनाशक प्राशन करून एका युवकाने आत्महत्या केल्याची घटना सेवाग्राम परिसरात उघडकीस आली. अमोल कांबळे (३४) रा. आदर्शनगर, सेवाग्राम असे मृत युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल कांबळे हे दारूच्या नशेत होते. त्यानंतर त्यांनी घरात ठेवलेले कीटकनाशक प्राशन केले. प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

**लोखंडी पट्टीने मारहाण**

पुलगाव - जुन्या वादाच्या कारणातून एका इसमाला लोखंडी पट्टीने मारहाण करून जखमी केल्याची घटना नाचणगाव येथे घडली. दीपक खडसे (५६) हे नातवासोबत घराजवळील चौकात मिरवणूक पाहत उभे होते. त्यावेळी गावातील रोशन थोरात हा तेथे आला. जुन्या वादातून दोघांमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर रोशन थोरात याने लोखंडी पट्टीने दीपक खडसे यांच्यावर हल्ला केला. या मारहाणीत ते जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी धाव घेतल्याने पुढील अनर्थ टळला. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी दीपक खडसे यांच्या तक्रारीवरून पुलगाव आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

## दारूच्या धुरातून ज्ञानाचा दिवा पेटला

# जामणीच्या 'दिव्या'ने समाजाचा इतिहास बदलला

**जामणी/दिलीप पिंपळे**

जंगलकाठच्या पारधी बेड्यावर दारिद्र्य, उपासमार, पोलिसांचा ससेमिरा आणि अवैध मोहाच्या दारूच्या धुरात आयुष्य जगणाऱ्या एका फासे पारधी कुटुंबातील लेकीने शिक्षणाच्या जोरावर समाजासाठी नवा इतिहास घडविला आहे. जामणी येथील कु. दिव्या रवी काळे हिने सीबीएसई इंग्रजी माध्यम दहावीच्या परीक्षेत तब्बल ९१.२० टक्के गुण मिळवत संपूर्ण परिसराचे लक्ष वेधले आहे. तिच्या या यशामुळे फासे पारधी समाजात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



'कमळ चिखलात फुलते,' ही म्हण दिव्याने अक्षरशः खरी करून दाखवली. जन्मापासून गरिबी पाचवीलाच पुजलेली, घरात शिक्षणाचा कोणताही वारसा नाही, उदरनिर्वाहासाठी कुटुंबाची सततची धडपड, अशा कठीण परिस्थितीत दिव्याने शिक्षणाची कास सोडली नाही. जामणी साखर कारखाना परिसरालगत जंगलाशेजारी असलेल्या पारधी बेड्यावर तिचे बालपण गेले. पूर्वी शिकार करून उदरनिर्वाह करणाऱ्या या समाजावर शासनाने बंदी घातल्यानंतर अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली. काहींनी मोहाची दारू गाळण्याचा व्यवसाय स्वीकारला; पोलिसांच्या धाडी, दारूड्यांचा गोंधळ आणि अस्थिर जीवन हेच वास्तव बनले. अशा वातावरणात वाढलेल्या दिव्याने मात्र परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या बळावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. जामणी पारधी बेडा ते येळाकेळी हा तब्बल दहा किलोमीटरचा प्रवास ती रोज पायी करत होती. अनेकदा पोटात अन्न नसतानाही हातात पुस्तक घेऊन तिने अभ्यास सुरू ठेवला. फासे पारधी समाजातही डॉक्टर, अधिकारी, शिक्षक घडू शकतात, हा विश्वास तिच्या यशाने निर्माण केला आहे. शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या समाजात दिव्या ही आशेचा दीप ठरली आहे. आज सर्व स्तरातून तिचे कौतुक होत असून, सामाजिक संघटना, शिक्षक आणि नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संघर्षाच्या राखेतून उभी राहिलेली.

# अवघ्या २५०० रुपयात घर होईल प्रकाशमय

## 'स्मार्ट' सोलर योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन

**नागपूर जनमाध्यम**- दारिद्र्यरेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरगुती वीज ग्राहकांना वीज बिलाच्या त्रासातून कायमची मुक्ती देण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार' म्हणजेच 'स्मार्ट' योजनेची घोषणा करण्यात आली असून, या योजनेअंतर्गत नागपूर परिमंडळातील तब्बल ३ लाख ७९ हजार ग्राहक पात्र ठरणार आहेत. विशेष म्हणजे, या योजनेत केंद्र सरकारच्या अनुदानासोबतच राज्य शासनाकडून भरघोस अतिरिक्त अनुदान मिळणार असल्याने आता सर्वसामान्यांना छतावर सौर ऊर्जा (रूफ टॉप सोलर) यंत्रणा बसविणे अत्यंत सोपे आणि खिशाला परवडणारे झाले आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविल्या जाणाऱ्या या सुवर्णसंधीचा नागपूर व वर्धा जिल्ह्यातील पात्र नागरिकांनी त्वरित लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.

या कल्याणकारी योजनेच्या व्याप्तीचा विचार केल्यास, नागपूर परिमंडळातील एकूण ३ लाख ७९ हजार ७९६ पात्र ग्राहकांपैकी नागपूर जिल्ह्यातील २ लाख ७३ हजार ५०८ आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ६ हजार ३३८ ग्राहकांचा यात समावेश आहे. यापैकी नागपूर जिल्ह्यातील ११ हजार १२९ आणि वर्धा जिल्ह्यातील ४ हजार ९९८ अशा एकूण १६ हजार १२८ ग्राहकांना प्राधान्याने या योजनेत सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट महावितरणने ठेवले आहे. यामध्ये दारिद्र्यरेषेखालील १,३३६, अनुसूचित १,३३७, अनुसूचित जमातीचे १,३३९ आणि इतर वर्गवारीतील ११,४६३ ग्राहकांचा समावेश असून, समाजातील प्रत्येक घटकाला यात सामावून घेण्याचा शासनाचा मानस आहे.'स्मार्ट' योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये मिळणारे भरघोस अनुदान! १ किलोवॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पासाठी अंदाजे ५० हजार रुपये खर्च येतो. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने' अंतर्गत यासाठी ३० हजार रुपयांचे अनुदान आधीच दिले जात आहे. आता यात राज्य शासनाने आपल्या 'स्मार्ट' योजनेची भर घालत दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांसाठी ३५ टक्के (१७,५०० रुपये) अतिरिक्त अनुदान जाहीर केले आहे.

त्यामुळे या घटकातील ग्राहकांना ५० हजारांचा हा प्रकल्प उभारण्यासाठी स्वतःच्या खिशातून अवघे २,५०० रुपये खर्च करावे लागतील. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ३० टक्के तर सर्वसाधारण गटाला २० टक्के अतिरिक्त अनुदान मिळणार असल्याने, त्यांचा प्रत्यक्ष आर्थिक वाटा अवघा ५ ते १० हजार रुपयांच्या दरम्यान असणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी काही सोप्या अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. अर्जदार हा केवळ घरगुती वीज ग्राहक असावा आणि त्याच्याकडे वैध वीज जोडणी असणे आवश्यक आहे. तसेच, सौर पॅनेल्स बसविण्यासाठी छतावर पुरेशी मोकळी जागा असणे गरजेचे आहे.

ग्राहकाने यापूर्वी कोणत्याही सौर अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा, तसेच गेल्या १२ महिन्यांतील त्याचा सरासरी मासिक वीज वापर १०० युनिटपेक्षा कमी असावा. या योजनेसाठी महावितरण ही मुख्य अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम पाहत असून, यामध्ये पूर्णपणे भारतीय बनावटीचे आणि आयईसी (IEC) प्रमाणित सोलर मॉड्यूल्स वापरले जातील. विशेष म्हणजे, पुरवठादाराकडून ग्राहकांना तब्बल ५ वर्षांची मोफत देखभाल व दुरुस्तीची हमी (वॉरंटी) दिली जाणार



आहे.छतावरील सौर ऊर्जा प्रणालीमुळे ग्राहकांना अनेक फायदे मिळतील. यामुळे घरगुती वीज बिल तर शून्यावर येईलच, पण त्यासोबतच गरजेपेक्षा जास्त निर्माण झालेली वीज महावितरणला परत विकून ग्राहकांना अतिरिक्त उत्पन्नाची मोठी संधी मिळेल. ही पूर्णपणे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जा असल्याने निसर्गाचे रक्षण होईल आणि स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होऊन हरित विकासाला मोठी चालना मिळेल. या अत्यंत फायदेशीर योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ग्राहकांनी विनाविलंब राष्ट्रीय सौर पोर्टलवर (National Portal) आपली नोंदणी करावी आणि आपले घर स्वयंपूर्ण बनवावे, असे महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १७२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आर्चरी वर्ल्ड कपमध्ये 'सुवर्ण' भेद करणाऱ्या कुमकुम मोहोडचा जिल्हाधिकाऱ्यांकडून सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** नुकत्याच शांघाय, चीन येथे पार पडलेल्या 'वर्ल्ड आर्चरी चॅम्पीयनशिप' स्टेज २ स्पर्धेत अमरावतीची आंतरराष्ट्रीय तिरंदाज कुमकुम मोहोड हिने भारतीय महिला संघाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते कुमकुमचा शाल आणि पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रशासनाकडून खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जागतिक स्पर्धेत भारत आणि यजमान चीन यांच्यातील अंतिम सामना ४-४ असा बरोबरीने सुटला होता. त्यानंतरच्या 'शूट-ऑफ'मध्ये कुमकुमने अचूक लक्ष्यभेद करीत चीनला पराभूत



केले. या कामगिरीने भारतीय महिला संघाने ५ वर्षांनंतर पहिले सांघिक सुवर्णपदक पटकाविले. उपांत्य फेरीतही भारतीय संघाने १० वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणाऱ्या दक्षिण कोरियाच्या संघाला पराभूत केले. या सुवर्णविजेत्या भारतीय संघात कुमकुम मोहोडसह अंकिता भगत आणि ४ वेळची ऑलिम्पियन दीपिका कुमारी यांचा समावेश होता.

कुमकुम ही गेल्या ९ वर्षांपासून अमरावती जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, 'खेलो इंडिया' आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या शूटिंग रेंजवर आंतरराष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. अत्यंत कमी वयाची असलेली कुमकुम सध्या फॉर्मात असून, तिची आगामी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात तुर्की येथे होणाऱ्या वर्ल्ड कप स्टेज ०३, स्पेन (माद्रिद) येथील वर्ल्ड कप स्टेज ४ आणि सप्टेंबरमध्ये जपान येथे होणाऱ्या आशियाई गेम्ससाठी भारतीय संघात निवड झाली आहे. कुमकुमसोबतच अमरावतीचा यशदीप भोगे याची देखील आशियाई गेम्ससाठी निवड झाली आहे. कुमकुमच्या यशाचे कौतुक करताना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कुमकुमची लहान वयातील ही कामगिरी पाहता, ती २०२८ मध्ये लॉस एंजेलिस (अमेरिका) येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत निश्चितच भारताचे प्रतिनिधित्व करेल आणि देशाचे नाव लौकिक वाढवेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, अनिल इंगळे, क्रीडा मार्गदर्शक. प्रफुल्ल डांगे उपस्थित होते.

# महात्मा फुले यांच्या भिडेवाडा चरित्ररथाचे आज शहरात आगमन

## -डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात दर्शन व अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक छगनराव भुजबळ यांच्या निर्देशानुसार समाज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे द्विशक्तीय जयंती वर्षा निमित्य महाराष्ट्रातील विविध जिल्हा, तालुक्यात महात्मा फुले यांच्या विचार व तत्वाची सामाजिक जागृती ,शिक्षण प्रसार आणि समतेचा संदेश देणारा भिडेवाडा चरित्र प्रदर्शित होत आहे.

या रथाचे बुधवार २० मे रोजी सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आगमन होत आहे. नागरिकांच्या दर्शन व अभिवादन करिता




सदर चरित्र रथ दिवसभर खुला राहणार असून दुसऱ्या दिवशी अकोला कडे रवाना होणार असल्याची माहिती आज सोमवार १८ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये माजी उपमहापौर डॉ. गणेश खारकर यांनी दिली.

त्यांनी सांगितले की पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाडा येथून आरंभ झालेला ५० फुट लांब हा प्रेरणादायी चरित्र रथ राज्यातील विविध जिल्ह्यातून प्रवास करत आहे. यामुळे फुले शाहू आंबेडकर अनुयायांमध्ये उत्सुकता निर्माण झालेली आहे. सदर चरित्र रथ जिल्ह्यात वरुड, मोर्शी, लेहगाव मार्गे २० मे रोजी अमरावती दाखल होणार आहे. समता परिषद तर्फे स्वागताची जयंत तयारी करण्यात आली आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रचार प्रसार व जनजागृती या मुख्य उद्देश्य चरित्र रथाचा आहे. याप्रसंगी लोकसहभागातून जनजागृती, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने, प्रभात फेरी, पुष्प अभिवादन आणि कार्यक्रम घेतले जाईल. पत्रकार परिषदेमध्ये ॲड. बाबुराव बेलसरे, प्रा श्रीकृष्ण बनसोड, राजा हाडोळे ,अरविंद अकोलकर ,ॲड. प्रभाकर वानखेडे, नितीन हिवे, गणेश मानकर, अशोक बोबडे, संजय आठवले, तृप्ती वाठ, सुरेंद्र चौधरी, दीपक बांबलकर , अनिल भगत, सुनील यावलकर, आदि उपस्थित होते.

# ग्रामीण पोलिसांचा मध्यरात्री गुन्हेगारांवर मोठा प्रहार

## विशेष कोंबिंग ऑपरेशनमध्ये ९४९ वाहनांची तपासणी

### एमडी पावडर, तलवारी जप्त- १२ आरोपी जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री व्यापक कोंबिंग ऑपरेशन राबवत गुन्हेगारांवर मोठा प्रहार केला. अवैध धंदे, अंमली पदार्थ तस्करी, शस्त्रबळ आणि फरार आरोपींविरोधात एकाच वेळी धडक कारवाई करत पोलिसांनी संपूर्ण जिल्ह्यात चोख बंदोबस्त उभारला होता.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार १६ मे रोजी रात्री ११ ते १७ मे पहाटे ५ वाजेपर्यंत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ५२ पोलीस अधिकारी आणि २६२ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दींमध्ये नाकाबंदी पॉईंट उभारून वाहनांची कसून तपासणी करण्यात आली.

मोहीमेदरम्यान बसस्थानके, रेल्वे स्थानके, लॉज, हॉटेल आणि धाब्यांवर पोलिसांनी अचानक झडती घेत संशयितांची चौकशी केली. या कारवाईत तब्बल ९४९ वाहनांची तपासणी करण्यात आली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २११ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करून ६९ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

**वरुड व शिरखेडमध्ये तलवारी जप्त-**

विशेष मोहिमेदरम्यान वरुड आणि शिरखेड पोलीस स्टेशन हद्दीत दोन आरोपींकडून तलवारी जप्त करण्यात आल्या. वरुड येथील सोहेल शहा उर्फ बाबा उमर शहा तसेच शिरखेड येथील बाबू उर्फ प्रवीण रामदास वाटकर यांच्याविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**चांदूर बाजारमध्ये एमडी विरोधात कारवाई-**

अंमली पदार्थाविरोधातील कारवाईत चांदूर बाजार परिसरात पोलिसांनी एमडी (मेफेड्रोन) पावडर जप्त करत तिघांना अटक केली. अनवेज शहा शरीफ शहा (१८), फिदा हुसेन उर्फ राजा झाकीर हुसेन (२२) आणि साद अहमद मुस्ताक अहमद (१८) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींकडून ७.१९० ग्रॅम एमडी पावडर, बजाज पल्सर मोटारसायकल आणि दोन मोबाईल असा एकूण १ लाख ८ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**अवैध दारूविरोधात ३१ गुन्हे-**

अवैध दारू विक्री आणि वाहतुकीविरोधातही पोलिसांनी कठोर कारवाई करत महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ३१ गुन्हे नोंदवले. तसेच रात्री संशयास्पद हालचाली करणाऱ्या इसमांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये ११ कारवाया करण्यात आल्या.

**फरार आरोपींसह १२ जण जेरबंद-**

या व्यापक मोहिमेदरम्यान १७ गैरजामिनपात्र वॉरंट आणि ४ स्टँडिंग वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली. तसेच १ फरार आरोपी आणि विविध गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेल्या १२ आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी अशा प्रकारच्या कोंबिंग ऑपरेशन मोहिमा नियमितपणे सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. ही संपूर्ण कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार तसेच पोलीस अधिकारी व अंमलदारांनी संयुक्तरीत्या पार पाडली.

# मोची गल्ली परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका मध्य झोन क्र.२ राजापेठ अंतर्गत महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १९ मे २०२६ रोजी मोची गल्ली परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी विशेष मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेदरम्यान एकूण १८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीवेळी अनेक ठिकाणी कापडी व कागदी पिशव्यांचा तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या प्लास्टिकचा वापर आढळून आला. मात्र एका आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने 'साहिल ट्रेडर्स' या आस्थापनावर ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

# राज्यपाल विष्णु देव वर्मा यांची काष्ट शिल्प प्रदर्शनीला भेट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** पद्मश्री डॉ शंकरबाबा पापळकर यांच्या वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद, मूकबधिर ,बेवारस बालगृहातील दिव्यांग मुलांनी साकारलेल्या काष्ट शिल्पाचे प्रदर्शन मुंबई येथील प्रभादेवी पु .ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे दि.१५ .५. २६ पासून सुरू झाले आहे.

या प्रदर्शनीला महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल विष्णूदेव वर्मा यांनी आज भेट देऊन काष्ट शिल्पाची पाहणी केली. तेव्हा बालगृहातील दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या काष्ट शिल्पाची स्तुती करून उपस्थित दिव्यांग मुलांचे व शंकरबाबा पापळकर यांचे स्वागत करून कौतुक केले. सदर उपक्रम शंकर बाबाच्या मार्गदर्शनात होतो म्हणून सदर उपक्रमाचे विशेष कौतुक केले.



कार्यक्रमाला संस्थेचे सचिव शंकरबाबा पापळकर ,पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई च्या संचालिका मीनलताई जोगळेकर तसेच वर्षाताई कराळे कला संयोजक, संजय नाथे संपादक इतर अधिकारी मान्यवर उपस्थित होते.

# आमदार गजानन लवटे यांची शहानुर जल शुद्धीकरण प्रकल्पालाची पाहणी

### -शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठ्यावर भर

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये ,तसेच पावसाळ्यातही स्वच्छ आणि सुरक्षित पाणीपुरवठा अखंडितपणे सुरू राहावा, या उद्देशाने आज दिनांक १८ मे २०२६ रोजी सकाळी १० : ३० वाजता दर्यापूर-अंजनगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे यांनी शहानुर पाणीपुरवठा प्रकल्पाची पाहणी करून अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

यावेळी आमदार लवटे यांनी नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, दूषित किंवा जंतुनाशक नसलेले पाणीपुरवठा होऊ नये.यासाठी शहानुर प्रकल्प जलशुद्धीकरण प्रक्रियेची विशेष तपासणी केली. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये आणि पावसाळा सुरू झाल्यानंतरही नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणी मिळावे, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी



अधिकाऱ्यांना दिल्या.

जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी शहानुर धरणातील सध्याच्या ४२ टक्के जलसाठ्याची माहिती देत दर्यापूर, अंजनगाव तालुक्यातील १५६ गावांसह दोन शहरांना नियमित पाणीपुरवठा सुरू असल्याचे सांगितले. तसेच दररोज सुमारे ५० लाख लिटर पाणी शुद्धीकरण करून पुरवठा केला जात असल्याची माहितीही देण्यात आली. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण उपविभागीय अभियंता विजय शेंडे यांनी पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची माहिती देताना सांगितले की, पाण्यावर प्रथम रासायनिक प्रक्रिया केली जाते. त्यानंतर फिल्टर प्लांटमध्ये गाळ वेगळा करून क्लोरीन गॅसच्या सहाय्याने पाण्याचे निर्जंतुकीकरण केले जाते.आणि त्यानंतरच नागरिकांना सुरक्षित पाणीपुरवठा केला जातो.

यावेळी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग दर्यापूर चे उपविभागीय अभियंता विजय शेंडे, अंजनगाव सुर्जीचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभागीय अभियंता अनिकेत केलो, शहानुर मध्यम प्रकल्प,लघु पाटबंधारे उपविभागीय अभियंता शहानुर श्रीकांत उमप,उबाठाचे जिल्हा उपप्रमुख महेंद्र दिपटे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विकास येवले, यश लवटे आदी उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

**MY OLD NAME**
Gauri Deepak Dahane
R/o Kurha Road,
Dahane Wadi, Chandur
Rly. Dist.Amravati-
444904
have a changed my
name to GAURI DIPAK
DAHANE for all future
purposes.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.९७२/२०२६
**श्रीमती अर्चना अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. श्रीमती अर्चना अरुण धिनमिने, वय ७५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.जी-१, माँ भगवती अपार्टमेंट, श्री कॉलनी, गाणुवाडीजवळ, जुना बायपास रोड, अम.
२. अनुराधा, अरुण धिनमिने (लग्नापुर्वीचे नांव), सौ.अनुराधा हनुमतराव हवालदार (लग्नानंतरचे नांव),वय ५१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.द्वारा श्री हेमंत हवालदार, क्वॉर्टर नं.२५, टाईप-४, बंगला नं.१०, मनोरा मंगज गिता भवन चौक जवळ इंदौर-४५०००१ (म.प्र.)
३. श्री.आनंद अरुण धिनमिने, वय ४९ वर्षे, कामधंदा - नोकरी
रा.जी-१, माँ भगवती अपार्टमेंट, श्री कॉलनी, गाणुवाडीजवळ, जुना बायपास रोड, अम.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण जनार्धन धिनमिने** यांचे दिनांक **०२.११.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार अर्चना अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्चना अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९६१/२०२६
**ज्ञानेश्वर अधिक सात -वि- निरंक**
पुढील ता.२२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Dnyaneshwar Pandharinath Shirbhate, Age 73 Yrs. Occu.: Retired
R/o Near Hanuman Temple, Ayodhya Colony, Shegaon Rd., Amravati.
2. Arun Pandharinath Shirbhate, Age 81 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Ward No.2, Mokhad, Tq.Nandgaon Kh., Dist. Amravati.
3. Subhash Pandharinath Shirbhate, Age 70 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Ward No.3, Mokhad, Tq. Nandgaon Kh., Dist. Amravati.
4. Rajendra Pandharinath Shirbhate, Age 65 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Bhakti Vihar, Akoli Road, Sane Guruji Road, Sainagar, Amravati.
5. Vijay Pandharinath Shirbhate, Age 61 Yrs. Occu.: Self Business
R/o Near Mashankar Hospital, Gopal Talkies, Rajapeth, Amravati.
6. Pradip Pandharinath Shirbhate, Age 60 Yrs. Occu.: Engineer
R/o Near Gopal Nagar, Malu Nagar, Sai Nagar, Amravati.
7. Ravindra Pandharinath Shirbhate, Aged 57 Yrs. Occu.: Self Business
R/o Near Gopal Talkies, Rajapeth, Amravati.
8. Pratibha Vilasrao Gulhane, Aged 58 Yrs. Occu.: Housewife
R/o Kurankhed, Tq. Dist. Akola.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Pandharinath Vithusa Shirbhate हे दिनांक 04.01.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच **मयत** Kusum Pandharinath Shirbhate हे दिनांक 31.10.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Dnyaneshwar Pandharinath Shirbhate + 7 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Dnyaneshwar Pandharinath Shirbhate + 7 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**CHANGE IN NAME**

**MY OLD NAME**
Hemali Deepak Dahane
R/o Kurha Road, Dahane
Wadi, Chandur Rly.
Dist.Amravati-444904
have a changed my
name to Hemali DIPAK
DAHANE for all future
purposes.

**CHANGE IN NAME**

**MY OLD NAME**
Deepak Ambadas
Dahane
R/o Kurha Road, Dahane
Wadi, Chandur Rly.
Dist.Amravati-444904
have a changed my
name to DIPAK
Ambadas DAHANE for all
future purposes.

**अल्पसंख्यांक संस्था**

**पाहिजेत**

**मौलाना अ.कलाम आझाद शिक्षण संस्था, टाकळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती**
**रजि.नं.एफ-७३६८/अम. द्वारा संचालित**
**एम.एन.उर्दु हायस्कूल व एच.जी.उर्दु कला व विज्ञान क.म.वि.टाकळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती**

| पदनाम | पद-संख्या | शैक्षणिक पात्रता | माध्य/उच्च माध्यमिक स्तरावर | संवर्ग | पद अनुदानित किंवा विना अनुदानित | रिक्त पद तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सहा. शिक्षक (अर्ध वेळ) | ०१ | एम.ए. (उर्दु) (अर्धवेळ पद) | उच्च माध्यमिक-च्या (११ व १२ वी) कला/ विज्ञान शाखाकरीता | खुला | अंशतः अनुदानित ४० टक्के | राजीनामा मुळे रिक्त पदावर | सदरहू संस्था अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त आहे |

वरीलप्रमाणे पद भरावयाचे आहे. तरी ईच्छुक उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रासह स्वखर्चाने दि.३०.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मौलाना अ.कलाम आझाद शिक्षण संस्था, टाकळी पुर्णा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे हजर रहावे.

**स्वाक्षरी/-**
**अध्यक्ष,**
**मौलाना अ.कलाम आजाद शिक्षण संस्था,**
**टाकळी, ता.दर्यापूर, रजि.नं.एफ-७३६८**

**स्वाक्षरी/-**
**सचिव,**
**मौलाना अ.कलाम आजाद शिक्षण संस्था,**
**टाकळी, ता.दर्यापूर, रजि.नं.एफ-७३६८**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४८/२०२६
**श्री.रामेश्वर अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rameshwar Marotrao Thakare, Age 59 Yrs. Occu.: Labour
2. Gajanan Marotrao Thakare, Age 53 Yrs. Occu.: Labour
3. Raju Marotrao Thakare, Age 58 Yrs. Occu.: Labour
4. Dnyaneshwar Marotrao Thakare, Age 67 Yrs. Occu.: Labour
1 to 4 R/o Bodana, Tq. Dist. Amravati.
5. Nalini Shrikrushna Shelke, Age 58 Yrs. Occu.: Household
R/o Tembhurni, Tq. Chandur Rly., Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शोता मारोतराव ठाकरे** ही दिनांक 02.06.2019 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रामेश्वर अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रामेश्वर अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८५६/२०२६
**श्री.आशुतोष अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Dr.Ashutosh Arvindrao Bhuyar, Age 55 Yrs. Occu.: Medical Practitioner
R/o Appu Colony, Shegaon Naka, Amravati.
2. Dr.Pankaja Ravi Raghav, Age 56 Yrs. Occu.: Medical Practitioner
R/o 503/4 AIIMS Residential Complex, Basni, 2 Phase, Jodhpur,Rajasthan
3. Sau.Shilpa Ajay Lahane, Age 50 Yrs. Occu.: Medical Practitioner
R/o C-203, Dronagiri Apartment, Manvel Pada Road, Opp.Nilgiri Tower, Vasai Thane Dist. Thane-401305

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **कमल अरविंदराव भुयार** ही दिनांक 03.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशुतोष अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशुतोष अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

बुधवार,२० मे २०२६
E-paper - www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अंजनगाव तालुक्यात अवैध दारू विक्री सुरुच

## अवैध दारू पकडण्याचे पोलीसान समोर आव्हान, व्यवसायीकांनी चोर मार्गाचा लावला शोध


**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालूक्यातील अवैध धंद्यांचा घट्ट बसलेला फास मोडीत काढण्यासाठी एस पी अनीकेत कदम यांनी ६ मे ला ग्रामिण व शहरातील तब्बल शंभराच्या वर अवैध व्यावसायिकांना अंजनगाव पोलीस्टेशन मध्ये बोलावून तात्काळ अवैध धंदे थांबवण्याचे आदेश दिले होते.परंतू दहा दिवस ओलांडलेही नसतांना तालूक्यातील ग्रामिण भागातील अवैध दारू विक्री करणाऱ्यांनी दारु विक्रीचे नवनवे मार्ग शोधत अवैध व्यवसायाला पुन्हा सुरवात झाल्याने अवैध व्यावसायीकांनी एसपीच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याची चर्चा आहे.

तालूक्यात अवैध व्यवसायामध्ये जुगार,दारु,अवैध वाहतूक या व्यवसायाची घट्ट पकड गेल्या काही वर्षात झाली होती.एस.पी. अनिकेत कदम यांनी तालूक्यातील सर्व अवैध व्यावसायीकांची परेड घेऊन ती मोडीत काढल्याचा आनंद जनतेला झाला होता.परंतू हा आनंद काही वेळच टिकुन राहला आणि अवैध व्यावसायीकांनी पुन्हा जोरात व्यवसाय सुरु केला त्यासाठी त्यांनी अवैध व्यवसायाचे मार्ग बदलले आहे.आता पोलीस प्रशासनासमोर पुन्हा या व्यवसायावर नित्रण आणण्याची मागणी होत आहे.

**अवैध व्यवसायासाठी चोर मार्गाचा उपयोग**

अंजनगाव तालुका हा अकोला जिल्ह्यांतील अकोट तालुक्याला लागुन असल्यामुळे या भागातील ग्रामीण गावातील रस्त्याने मोठ्या प्रमाणात अवैध



दारुची तस्करी होत आहे. ज्यात सातेगाव, जवर्डी, हिरापुर,निमखेड, तूरखेड कारला, चौसाळा,लखाड, सह शहराच्या हाकेवर असलेले खोडगाव गावात अवैध दारू विक्री अजुनही सुरूच आहे. या चोर मार्गाने अवैध दारू तस्करांना पकडण्याचे पोलीसान समोर मोठे आव्हान आहे.

**विक्रीची जागा बदलली**

पोलीस अधिक्षक यांच्या धडाकेबाज कारवाईमुळे ग्रामीण भागातील अवैध दारू व्यवसायीकांचे धाबे दणाणले आहेत. सुत्रांच्या माहितीनुसार अवैध दारू व्यवसायीकांनी यापूर्वी खुलेपणाने दारूची गावात दुकाने मांडली होती आता कारवाई होत असल्याने अवैध दारू विक्रीची जागा बदलली असून नाला खोऱ्यात तसेच शेतात अवैध दारू विक्री करीत आहे.

**ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई**

अंजनगाव तालुक्यातील सर्वात जास्त परिसर हा दोन पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो एक अंजनगाव पोलीस स्टेशन तर दुसरा रहिमापुर चिंचोली पोलीस स्टेशन आहे दोन्ही पोलीस स्टेशनची हद्द अकोला जिल्ह्यला लागून आहे. या दोन्ही पोलीस स्टेशनच्या पथकाची कारवाई होत नसली तरी या हद्दीत ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई मात्र सुरू असल्याचे नूकत्याच सातेगाव येथे ४० हजार रुपयाची दारु पकडल्यावरुन दिसून येते.

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी युवक जखमी

**तिवसा-** शेतात खरीपपूर्व मशागतीचे काम करीत असताना अचानक एका रानडुकराने शेतकरी युवकावर हल्ला चढवून त्यास जखमी केले. १९ मे रोजी दुपारी ही घटना तिवसा तालुक्यातील ममदापूर येथे घडली. दिवाकर प्रल्हादराव टेकाडे (वय ३९ वर्ष)असे रानडुकराने जखमी केलेल्या शेतकरी युवकाचे नाव आहे.ते आज आपल्या शेतामध्ये खरीपपूर्व तयारी करता शेतात साफसफाईचे काम करत होते.तेव्हा मागाहून आलेल्या एका रानडुकराने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढविला,त्यांना धडक देऊन जमिनीवर पाडून व काही अंतरावर फरकाडत नेले असल्यामुळे त्यांच्या छातीला व



पायाला गंभीर दुःखापत झाली.यात ते जखमी झाले आहे. त्यांना उपचारार्थ उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय तिवसा येथे दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहे.सदर घटने मुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरन निर्माण झाले असून सदर शेतकऱ्यास तातडीने वैद्यकीय सहाय्यता मदत मिळावी व वन्यप्राण्यांचा बंदोबस्ताची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## विद्यापीठात बी.कॉम इन रिटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र.**

बदलत्या व्यावसायिक आणि ग्राहककेंद्रित बाजारपेठेच्या युगात रिटेल क्षेत्राला मोठी मागणी असून, विद्यार्थ्यांना आधुनिक रिटेल उद्योगासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात बी.कॉम. इन रिटेल मॅनेजमेंट या विशेष पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हा अभ्यासक्रम अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम अंतर्गत तयार करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना थेट उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या विशेष पुढाकारातून हा अभ्यासक्रम विद्यापीठात प्रथमच सुरू करण्यात आला आहे. सध्याच्या काळात शॉपिंग मॉल्स, सुपरमार्केट, ई-कॉमर्स, फॅशन रिटेल, कस्टमर रिलेशनशिप आणि डिजिटल मार्केटिंग या क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्या अनुषंगाने हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

**अभ्यासक्रमाची वैशिष्टय**


- रिटेल उद्योगाभिमुख अभ्यासक्रम असल्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक रिटेल व्यवस्थापन, ग्राहक सेवा, स्टोअर ऑपरेशन्स, मर्चेडायझिंग आणि विक्री व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाईल. त्याचबरोबर नामांकित रिटेल उद्योग, मॉल्स आणि व्यावसायिक संस्थांमध्ये प्रशिक्षण व प्रात्यक्षिक अनुभवाची संधी मिळेल. विद्यार्थ्यांमध्ये कम्युनिकेशन स्किल्स, टीम मॅनेजमेंट, कस्टमर हँडलिंग, डिजिटल रिटेलिंग आणि लीडरशिप स्किल्स विकसित करण्यात येतील. त्यासाठी सुसज्ज अशी संगणक प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण सुविधा, इंटरनेट आणि समृध्द ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना रिटेल व्यवस्थापन, ग्राहक सेवा, स्टोअर ऑपरेशन्स, मर्चेडायझिंग मॅनेजमेंट, ग्राहकांची वर्तणूक, रिटेल मार्केटिंग, कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट, ई कॉमर्स ॲन्ड डिजिटल रिटेलिंग, सप्लाय चेन ॲन्ड इन्व्हेंटरी मॅनेजमेंट इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाईल

**करिअरच्या विविध संधी**

-अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना रिटेल स्टोअर मॅनेजर, व्हिज्युअल मर्चेडिझायर, कस्टमर रिलेशनशिप एक्झिक्युटिव्ह, सेल्स ॲन्ड मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, ई कॉमर्स एक्झिक्युटिव्ह, सप्लाय चेन को ऑर्डिनेटर, रिटेल ऑपरेशन्स मॅनेजर अशा मोठया पदांवर करिअर करण्याची संधी मिळणार आहे.

**पात्रता-** कोणत्याही शाखेची इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहतील. अधिक माहितीसाठी डॉ. संध्या भगत मो. ९८९०४७१६५५ यावर संपर्क साधता येईल.

# संक्षिप्त



## दहावीच्या परीक्षेत श्रीराम हायस्कूलचे यश

**टाकरखेडा संभू-** श्रीराम हायस्कूल टाकरखेडा संभू येथील दहावी मंडळ परीक्षाच्या निकालात चांगले यश संपादन केले आहे. दहावीचा निकाल ८५.४१ टक्के लागला. परीक्षेत एकूण ४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ४१ विद्यार्थी पास झाले.विद्यालयातून ०५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केलेले आहे. प्रथम श्रेणीत १४ विद्यार्थी ,द्वितीय श्रेणीत १४ विद्यार्थी, व पास ०८ विद्यार्थी झाले. आहे. कृष्णांग निलेश माहोरे ९२.४० टक्के, सुमित गणेश गुल्हाने ८८.६०टक्के, साहिल संजय भालचक्र ८० टक्के, कनिष्का निलेश माहोरे ७९.६०टक्के, रुद्रेश निलेश जामठे ७७.२० टक्के यांनी मिळवला. या यशा बद्दल श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. निलांबरी देशमुख,उपाध्यक्ष विशाल देशमुख, सचिव स्वाती देशमुख, सभासद इंदु देशमुख, प्रदीप देशमुख, मुख्याध्यापक उमेश सोलव, शैलेश डहाके, सविता बेलसरे, सुनील प्रांजळे, संतोष देशमुख,नरेंद्र सांगोले, सुरज देशमुख, संगीता लोहेकर, रीता धनैया, अतुल घुरडे, प्रशांत मालवे,तसेच सर्व शिक्षक व शिक्षक कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## बी.एस्सी. डेटा सायन्स ॲन्ड ॲनालिटिक्सची प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात बी.एस्सी. (डेटा सायन्स ॲन्ड ॲनालिटिक्स) या विशेष पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हा अभ्यासक्रम 'अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत डिझाइन करण्यात आला असून, याद्वारे विद्यार्थ्यांना थेट उद्योग जगतातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्ट - तीन वर्षाच्या (६ सेमिस्टर) अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना एका संपूर्ण सेमिस्टरसाठी नामांकित कंपन्यांमध्ये 'अप्रेंटिसशिप' (प्रशिक्षण) करण्याची संधी मिळणार आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या नियमानुसार सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती, भव्य ग्रंथालय, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमात आयटी क्षेत्राची सध्याची मागणी लक्षात घेता पायथन फॉर डेटा सायन्स, ॲडव्हान्स एक्सलसह डेटा विश्लेषण, बिग डेटा ॲनालिटिक्स आणि बिझनेस इंटेलिजन्स, पॉवर बीआय टूल, फूल स्टॅक डेव्हलपमेंट अशा विषयांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.करिअरच्या सुवर्णसंधी - हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना डेटा सायंटिस्ट, बिझनेस अनालिस्ट, फायनान्शियल अनालिस्ट, रिस्क अनालिस्ट, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, डेटा व्हिज्युअलायझेशन स्पेशलिस्ट यांसारख्या उच्च पगाराच्या पदांवर करिअर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया इयत्ता १२ वी (विज्ञान शाखा) उत्तीर्ण, ज्यामध्ये गणित विषय अनिवार्य आहे.इच्छुक विद्यार्थ्यांनी जाहिरातीत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून थेट अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी प्रा. राजेश भोयर मो. क्र. ९४२२८५८५८४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पी.आर.पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अमरावती तर्फे बारावी सीबीएसई व स्टेट बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान समारंभ उत्साहात संपन्न झाला या समारंभास संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील तसेच संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी गुणवंतविद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले असल्याचे सांगितले. तसेच भविष्यातही विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून प्रगती करावी, असे मार्गदर्शन केले. डॉ. पी. एम. खोडके यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागील शिक्षक व पालकांच्या योगदानाचेही कौतुक केले. कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरण विद्यार्थ्यांच्या यशामुळे आनंदमय झाले होते.

## श्री.विठ्ठल रुख्मीणी मंदीरामध्ये अधिक मासाच्या पर्वावर

# श्रीमद भागवत सप्ताह व ग्रंथराज, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**कुऱ्हा-** अधिकमासांच्या पर्वावर तथा पुरुषोतम मासाच्या पर्वावर निथे वशिष्ठ महामुनीची तपोभूमी तपामुळे वशिष्ठ नदी चे आगमन होऊन वर्धा नदी नाव प्राप्त झाले. या तटावर पांच सती व चौरंगीनाथ यांनी मातृभूमी आई रूख्मीणीचे श्रीकृष्णाशी पाणी ग्रहण याच भूमित होऊन अंबिका मातेचे अधिक्षण असवरी पावनभूमी या भूमीत वशिष्ठ महामुनीचे सुपुत्र श्री संत सदाराम महाराज यांनी तपाच्या साथनाने पंढरपूर वारी सुरु करून विठ्ठल रूख्मीणी पदार्पन या भूमीत करून विठ्ठल रुख्मीणी मंदीराची स्थापना केली. श्री.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्री. संत गाडगे महाराज, श्री संत अच्युत महाराज असणारे आणि विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन श्री विठ्ठल रुख्मीणी मंदीरात वर्धा, नागपूर, चंद्रपूर, बडनेरा, परभणी, हिंगोली, सोलापूर या मंडळीच्या सहकार्याने होत असलेले श्रीमद् भागवत सप्ताह व ग्रंथराज पारायण सोहळा १७ मे ते १४ मे पर्यंत आयोजित करण्यांत आले आहे.

या भागवत सप्ताहाची सुरुवात १७ मे स. ६ वा कलश स्थापना शंकर महाराज टापरे व संस्थानचे अध्यक्ष ना.बा.अमाळकर, चंद्रकांत पाटील, बेले महारान ह.भ.प. पंकज महाराज महल्ले यांचे हस्ते करण्यात आले.तसेच दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ७.३० ते ८.३० वा पारायण, सकाळी ९ ते ११ विठ्ठल नाम जप, दुपारी ३ ते



५ श्रीमद् भागवत, सायंकाळी ५.३० ते ६.३० वा. हरिपाठ, रात्री ७ ते ९ वा. नामसंकिर्तन होईल. यामध्ये भागवत प्रक्ते श्री.ह.भ.प. भागवताचार्य मुकुंद महाराज धोटे (सद्गुरु जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची) यांचो अमृतवाणीतून होणार असून भागवत साथ संगत हार्मोनियम वादक गायक ह.भ.प. लखन महाराज चाफले, ऑर्गन वादक/गायक ह.भ.प. राहुल महाराज कापगते, तबला वादक ह.भ.प.राम महाराज त्नजुरकर, मृदुंग वादक ह.भ.प प्रथमेश कोळसे, गणेश महाराज गुरळकर, अतुल महाराज राऊत, यांचा समावेश आहे. तसेच ज्ञानेश्वरी पारायणाचे व्यासपिठाचार्य ह.भ.प. पंकज महाराज महल्ले, ह.भ.प. नरहरी महाराज बोळवटकर ह.भ.प.चंदू महाराज डहाके, ह.भ.प योगेश महाराज बुरीसे, यांचा सहभाग असून हरिपाठ विणेकरी ह.भ.प. पांडूरंग महारान जगघरे, ह.भ.प. दिंगाबर महाराज ठाकरे, मुकेश महाराज आत्राम विठोबाजी बांगडे, राम महाराज चाफले, मारोती महाराज तुराळे यांचा समावेश राहणार असून रात्रीचे दैनदिन किर्तनकार ह.भ.प. चंद्रकांत महाराज डहाके, नरहरी महाराज बोळवटकर, रूपदेव महाराज घोटे, अजय महाराज डेहणे, प्रकाश महाराज चंदनखेडे, प्रमोद महाराज पानबुडे, रूपेश महाराज महाजन हे सर्व आळंदी (देवाची) असून रात्री ९ ते ११ पर्यंत किर्तन करतील.

२३ मे भव्य दिंडी सोहळा सायंकाळी ५ वा.कौंडण्यपूर नगरीतून काढण्यात येईल. तसेच २४ मे काल्याचे किर्तन दुपारी १२ ते २ वा पर्यंत ह.भ.प. भागवताचार्य मुकुंद महाराज धोटे 'आळंदी दिवाची यांचे होऊन भव्य महाप्रसाद करण्यात येईल. या भागवत सप्ताहामध्ये भाग्यवान अन्नदाते सकाळी नास्ता सकाळी जेवण आणि सायंकाळी जेवण देणार आहेत तेव्हा वरील सुरू असलेला श्रीमद भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण रात्रीचे किर्तन, काल्याचे किर्तन, भव्य दिंडी सोहळा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा.

असे संयोजक ह.भ.प. गजानन महाराज शा.उरकुडे (परडा) आयोजक व्यवस्थापक विनित परिसरातील समस्त गावकरी व तरूण मंडळी (परडा, पाडर, लोणार,किन्हाळा,वरोरा) यांनी केले आहे.

## सुवर्ण महोत्सवाची उत्साहात सांगता



**टाकरखेडा संभू-** तळवेल येथे श्री संत गाडगेबाबा गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित सुवर्ण महोत्सव व ग्रामजयंती कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. चार दिवसीय या समारोहात माजी सैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी तसेच समाजातील दानशूर व पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा गौरव करण्यात आला. पद्मश्री पुरस्कार प्राप्त जनार्दनजी बोथे गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.सायंकाळी सर्वधर्मीय प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर रात्री आयोजित वऱ्हाडी हास्य कवी संमेलनाने उपस्थितांची मने जिंकली. विविध कवींनी विनोदी आणि सामाजिक आशयाच्या कवितांमधून प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले. या सुवर्ण महोत्सवात कृषी मार्गदर्शन, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी व्यवसाय मार्गदर्शन, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्याने तसेच राष्ट्रीय कीर्तनांच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्यात आले. श्री संत गाडगेबाबा गुरुदेव सेवा मंडळ व समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने पार पडलेल्या या महोत्सवामुळे तळवेल गावात सामाजिक ऐक्य, संस्कार आणि भक्तीभावाचे वातावरण निर्माण झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# विषय पदवीधर शिक्षकांना सरसकट वेतनश्रेणी लागू करा

## प्राथमिक शिक्षक समितीचे शासनाला पत्र

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण, रोजगार व युवक सेवा विभाग, शासन निर्णय दि.१४ नोव्हेंबर १९७९ अन्वये उच्च प्राथमिक इयत्तांसाठी पदवीधर शिक्षकाचे प्रत्येकी एक पद निर्माण होऊन स्वतंत्र वेतनश्रेणी मान्य करण्यात आली.शिक्षण हक्क कायद-२००९ अन्वये उच्च प्राथमिक वर्गासाठी विषय निहाय तीन पदवीधर पदे अस्तित्वात आली.मात्र प्रत्येक विषयासाठी ३३% प्रमाणातच वेतनश्रेणी असा भेदभाव करणारा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने सातत्याने हा भेदभाव करणारा निर्णय रद्द करण्याची मागणी रेटली आहे.अश्या मागणीचे निवेदन प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे,शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर,रणजितसिंग देओल प्रधान सचिव शालेय,शालेय शिक्षण आयुक्त सचिद्र प्रताप सिंग,शिक्षण संचालक शरद गोसावी,उप सचिव आबासाहेब कवळे यांना पाठवले आहे अशी माहीती प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगीतले.

महाराष्ट्र विधान मंडळ २०१९ च्या चौथ्या अधिवेशनात विधान परिषदेत नियम-९३ अन्वये सूचनेवरील चर्चेदरम्यान तत्कालीन मा. शालेय शिक्षण मंत्री दिलेल्या आश्वासनानुसार राज्यातील उच्च प्राथमिक (इ. ६वी ते ८ वी) वर्गावर नियुक्त पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या अभ्यास समितीने विषय पदवीधर म्हणून नियुक्ती झालेल्या आणि नियुक्त होणाऱ्या सर्वच पदवीधर शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून पदवीधर वेतनश्रेणी अनुज्ञेय होण्यासाठी शिफारस केली. परंतु सकारात्मक निर्णय शासनाने घेतला नाही.राज्यात काही जिल्ह्यात सर्व विषय पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी दिली जात होती. समान शैक्षणिक अर्हता व गठीत अभ्यास समितीची शिफारस लक्षात घेऊन राज्यातील १००% विषय

पदवीधर शिक्षकांना समान न्याय तत्त्वानुसार एस-१४ वेतनश्रेणी लागू करणे गरजेचे असताना शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने शिक्षकांना न्यायालयात न्याय मागण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठने दि. ०८ मे २०२६ रोजी निर्णय दिला आहे. त्यानुसार सर्व विषय पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणी नाकारणारा दि. १३ ऑक्टोबर २०१६ चा शासन निर्णय हा भेदभावपूर्ण आणि भारतीय संविधानाच्या कलम-१४ चे उल्लंघन करणारा आहे असे नमूद केले आहे. याचिकाकर्त्या अर्हताधारक विषय पदवीधर शिक्षकांना विषय पदवीधर म्हणून नियुक्तीपासून आणि ज्यांनी आवश्यक अर्हता ज्या दिनांकाला धारण केली त्या दिनांकापासून पदवीधर वेतन श्रेणी देण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या निर्णयास अनुसरून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून निवेदन करण्यात आले आहे.यामध्य (१) याचिकाकर्त्यांना अनुज्ञेय पदवीधर वेतनश्रेणी (ए-१४) लागू करण्याबाबत तातडीने शासनादेश व्हावेत आणि वेतन निश्चिती करून देय दिनांकापासूनची थकबाकी अदा करावी. (२) अन्य विषय पदवीधर शिक्षकांनी वर उल्लेखित मा. न्यायालयीन निर्णयाच्या आधारे याचिका दाखल केली तर त्यांना सुद्धा पदवीधर वेतनश्रेणी लागू होणार हे निश्चित आहे. त्यामुळे आता अन्य पदवीधर विषय शिक्षकांनी मा. न्यायालयात दाद मागण्याची वाट न पाहता इयत्ता ६ वी ते ८ वी ला अध्यापन करणाऱ्या गणित-विज्ञान, भाषा, सामाजिक शास्त्र विषयाच्या राज्यातील सर्व विषय पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतन श्रेणी (ए-१४) पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावी. उच्च न्यायालयात वर निर्दिष्ट याचिका दाखल केलेल्या विषय शिक्षकांनाच जर पदवीधर वेतन श्रेणी लागू केली तर शासन निर्णयानुसार अनुज्ञेय विषय निहाय ३३% मर्यादेपेक्षा अधिक वेतनश्रेणी घेणाऱ्या शिक्षकांची संख्या जाणार आहे.न्यायालयाने दिलेल्या निर्णयात विशेष उल्लेखित १४ व्या संवैधानिक कलामास अनुसरून 'समान कामासाठी समान वेतन' नाकारणारा शासन निर्णय रद्द करणेच प्रासंगिक आणि न्यायसंगत आहे. करीता सर्व विषय पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणी मान्य करण्याचा निसंदिग्ध शासन निर्णय अविलंब निर्गत करावा अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून विनंती केली आहे.

# 'गाजीपूर फाईल्स' : अभयारण्याच्या सावलीत 'खनिज साम्राज्य'

## फाईलमध्ये काय, आणि फाईलच्या बाहेर कोण?

### कोट्यवधींचा दंड, न्यायालयीन निर्देश, वन विभागाचे आक्षेप तरीही उद्योग सुरूच

## यंत्रणेतील अदृश्य हातांवर संशय गडद

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर खदान प्रकरण आता केवळ अवैध उत्खननाचा मुद्दा राहिलेला नाही; तर ते प्रशासन, राजकारण आणि उद्योग यांच्यातील कथित 'अदृश्य साखळी'चे प्रतीक बनू लागले आहे. कारण ज्या प्रकरणात वन विभाग हरकत घेतो, महसूल विभाग कोट्यवधींचा दंड ठोठावतो, न्यायालयीन पातळीवर प्रश्न उपस्थित होतात आणि प्रदूषणाबाबत स्थानिक नागरिक आक्रोश करतात, त्या प्रकरणातील उद्योग मात्र निर्विघ्न सुरू राहतो, ही बाबच आता सर्वात मोठा संशय निर्माण करणारी ठरत आहे.

अकोट तालुक्यातील गाजीपूर येथे आदिवासी जमिनींवर सुरू असलेल्या खदान, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांटच्या संदर्भात गेल्या काही वर्षांत अनेक गंभीर नोंदी समोर आल्या. मात्र प्रत्येक वेळी कारवाईची दिशा निर्माण होताच फाईलचा वेग मंदावल्याचे चित्र दिसून आले. परिणामी 'प्रकरण दडपण्यासाठी आतूनच संरक्षण मिळतेय का?' अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीला ETS मोजणीत जवळपास ६४ कोटी रुपयांच्या अवैध उत्खननाची चर्चा होती. नंतर हाच आकडा ४८ कोटींवर स्थिरावला. तब्बल १६ कोटी रुपयांचा फरक नेमका कसा निर्माण झाला, याचे अधिकृत उत्तर आजतागायत समोर आलेले नाही. या तफावतीमुळे महसूल विभागातील निर्णयप्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. 'मोजणी बदलली की मते बदलली?' असा उपरोधिक सवाल आता प्रशासनाच्या वर्तुळातही ऐकायला मिळत आहे.

दरम्यान, आदिवासी जमिनींच्या व्यवहारासंदर्भातही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असताना ती प्रक्रिया पूर्ण झाली होती का? संबंधित जमीन भाडेपट्ट्याने देताना कायदेशीर अटींचे पालन झाले का? याबाबत स्पष्ट नोंदी सार्वजनिक करण्यात आलेल्या नाहीत. विधानसभेत प्रश्न उपस्थित होऊनही व्यवहार रद्द करण्याची किंवा जमीन ताब्यात घेण्याची ठोस प्रक्रिया सुरू न झाल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर संशय वाढू लागला आहे.

### SIT चौकशीची मागणी जोरात

गाजीपूर प्रकरणातील दंडातील तफावत, आदिवासी जमीन व्यवहार, अभयारण्यालगत उद्योग, प्रदूषण नियमभंग आणि कारवाईतील विलंब या सर्व बाबी लक्षात घेता स्वतंत्र SIT चौकशीची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. 'केवळ उद्योगच नाही, तर फाईल हलवणाऱ्या प्रत्येक हाताची चौकशी झाली पाहिजे,' अशी मागणी विविध स्तरांतून पुढे येत आहे.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात धक्कादायक भाग म्हणजे वन विभागाचे आक्षेप. नरनाळा अभयारण्यालगत उद्योग सुरू असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. काही नोंदींमध्ये तर उद्योग आणि अभयारण्य यांच्यातील अंतर 'शून्य मीटर' असल्याचेही समोर आले. वन विभागाने उत्खनन परवानगी देऊ नये, असे पत्र महसूल प्रशासनाला दिल्याची चर्चा आहे. मात्र त्या हरकतीनंतरही उद्योग सुरू राहिल्याने 'वन विभागाचे पत्र फाईलमध्येच गाडले गेले का?' असा प्रश्न निर्माण झाला आहे.

गाजीपूर परिसरातील नागरिकांनी प्रदूषणासंदर्भात अनेक तक्रारी केल्या आहेत. स्टोन क्रशरमधून उडणारी धूळ, हॉट मिक्स प्लांटमधून बाहेर पडणारा धूर आणि रात्रभर सुरू असलेली यंत्रसामग्री यामुळे नागरिक त्रस्त झाल्याचे सांगितले जात आहे. काही ग्रामस्थांनी शेती उत्पादन घटल्याचा दावाही केला आहे. मात्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यक्ष तपासण्या केल्या का? नोटिसा दिल्या का? कारवाई झाली का? याची ठोस माहिती समोर आलेली नाही.

विशेष म्हणजे, गट क्रमांक ३७ वर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक नाहरकत प्रमाणपत्राविना क्रशर सुरू असल्याची माहिती समोर आल्यानंतर प्रशासनातील काही अधिकारी संबंधित उद्योगाला कागदपत्रे पूर्ण करण्यासाठी मदत करत असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. त्यामुळे 'प्रशासन कायद्याची अंमलबजावणी करतेय की उद्योगपतींचे व्यवस्थापन?' असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.

उद्योगसमूहाविरोधात कारवाईची सर्वात मोठी घटना म्हणजे तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी २४ ऑक्टोबर २०२१ रोजी केलेली मध्यरात्रीची धडक कारवाई. त्या कारवाईत उद्योग सील करण्यात आला होता. मात्र नंतर तो पुन्हा सुरू झाला.

सर्वात मोठा प्रश्न म्हणजे कोणाच्या आदेशाने? कोणत्या अटींवर? आणि दंडाची रक्कम प्रलंबित असतानाही पुन्हा संचालनाला परवानगी कशी मिळाली? या प्रश्नांची अधिकृत उत्तरे नसल्यानेच आता 'गाजीपूर फाईल्स'मध्ये केवळ कागदपत्रे नाहीत, तर प्रभावशाली हस्तक्षेपांची संपूर्ण साखळी दडली आहे का?' असा संशय निर्माण झाला आहे.

### कारवाईचा आवाज मोठा पण परिणाम शून्य?

गाजीपूर प्रकरणात प्रत्येक विभागाने कागदोपत्री भूमिका घेतल्याचे दिसते; मात्र प्रत्यक्षात उद्योग सुरूच राहिला. महसूल विभागाने दंड ठोठावला, वन विभागाने हरकत घेतली, प्रदूषण मंडळाकडे तक्रारी गेल्या, न्यायालयीन निर्देशही आले; पण अंतिम परिणाम मात्र शून्य दिसत आहे. त्यामुळे 'कारवाई फक्त दाखवण्यासाठी होती का?' अशी चर्चा रंगू लागली आहे.

### राजकीय मौनाचा अर्थ काय?

पर्यावरण, आदिवासी हक्क आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर सातत्याने आवाज उठवणारे अनेक राजकीय नेते आणि संघटना गाजीपूर प्रकरणात मात्र असामान्य शांत दिसत आहेत. त्यामुळे 'मौन हेच समर्थन मानायचे का?' असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत. विशेष म्हणजे, स्थानिक पातळीवर या प्रकरणाची चर्चा तीव्र असतानाही मोठ्या राजकीय पातळीवर अपेक्षित प्रतिक्रिया उमटलेली नाही.

# राणीगाव शेतशिवारात बिबट्याचा मृत्यू



**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाट वन्यजीव विभागाच्या धुळघाट रेल्वे वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या राणीगाव शेतशिवारात एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सरपंच लक्ष्मण भिलावेकर यांच्या लाल चंदन व हापूस आंब्याच्या शेतात हा प्रकार घडला असून, तारकुंपणाला वारंवार धडक लागल्याने बिबट्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार १८ मे रोजी पहाटे सुमारे ६ वाजण्याच्या (पान २ वर)

# बांधून ठेवलेल्या ४ गोवंशाला जीवदान

## नागपूरी गेट पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवलेल्या चार गोवंश आणि एका लहान गोंड्याला नागपुरी गेट पोलिसांनी जीवदान दिले आहे. याप्रकरणी अब्दुल बशीर शेख गब्बू (वय ५५,अंसार नगर) याच्याविरुद्ध प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे. नागपूर गेट पोलिसांच्या (पान २ वर)

# निधी विना इ वाचनालयाचे उद्घाटन

## नगराध्यक्षावर दिशाभूल केल्याचा आरोप



### उपाध्यक्ष बच्चू वानरे व भाजप गटनेते पप्पू भालेराव यांची पत्रकार परिषद

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या नगरविकास विभाग, जिल्हा नियोजन समिती किंवा इतर कोणत्याही खात्याकडून निधी मंजूर नसताना चांदूर रेल्वे नगर परिषद क्षेत्रातील हुतात्मा स्मारक येथील इ वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आल्याचा गंभीर आरोप भाजप गटनेते निलेश भालेराव, नगर परिषद उपाध्यक्ष बच्चू वानरे व भाजप नगरसेवकांनी पत्रकार परिषदेत केला.

१७ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत इ वाचनालयाबाबत केवळ चर्चा झाली होती. मात्र या प्रकल्पासाठी किती खर्च अपेक्षित आहे,निधी कुठून मिळणार,याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आली नव्हती. (पान २ वर)

# फेरफारासाठी २५ हजारांची लाच..!

## कळंबच्या भूमिअभिलेख कार्यालयातील महिला अधिकारी एसीबीच्या जाळयात



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचारावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पुन्हा एकदा मोठी कारवाई केली. कळंब येथील भूमिअभिलेख कार्यालयातील परिरक्षण भुमापक महिला अधिकाऱ्याला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. या कारवाईमुळे भूमिअभिलेख विभागात मोठी खळबळ उडाली आहे.एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी लोकसेविका शितल विजयकुमार पांडे (वय ३७) या (पान २ वर)

# आज औषध विक्रेता संघटनेचा बंद, नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या वतीने बुधवार, दि.२० मे रोजी देशव्यापी एक दिवसीय औषधविक्री बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने हेल्पलाईन क्रमांक जाहिर केले आहे.

बंदच्या काळात जिल्ह्यातील नागरिकांनी अत्यावश्यक औषधांचा पुरवठा अखंडीत व सुरळीत उपलब्ध राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केली



आहे. सहआयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्र औषध दुकाने, तसेच २४ तास सुरु असणाऱ्या औषध दुकानात समन्वय साधण्यात येत आहे. यात अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होणार नाही यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच औषधांचा अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात (पान २ वर)

# शेषराव खाडे यांच्या ' कृत्रिम प्रज्ञा ' या कादंबरीचे आज प्रकाशन



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रसिद्ध लेखक व कादंबरीकार शेषराव शं. खाडे यांच्या 'कृत्रिम प्रज्ञा ' या कादंबरीचे प्रकाशन बुधवार दि.२० मे रोजी सकाळी १० वाजता मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह, शिवाजी नगर येथे होत आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या कार्यक्रमात विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या हस्ते 'कृत्रिम प्रज्ञा ' चे प्रकाशन होईल.या सोहळ्याला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास ओमनवार, संत गाडगेबाबा अमरावती (पान २ वर)

# सराफा व्यापाऱ्यांसाठी विशेष मदत पॅकेज घोषित करा

## असोसिएशनची पंतप्रधानांकडे मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** हैदराबाद मध्ये आयोजित एका कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना एक वर्षापर्यंत सोने न खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांच्या या आवाहनामुळे लहान आणि मध्यम सराफा व्यापाऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. त्यांचा व्यापार ७० टक्के कमी होणार आहे. अनेक अडचणी यामुळे (पान २ वर)

# जुना बायपास मार्गावरील त्या मृतदेहाची ओळख पटली

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील दस्तूर नगर जुना बायपास मार्गावर सोमवारी सायंकाळी एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली होती. मृतदेहाची ओळख रामप्रकाश रामनाथ



चौधरी (वय ७०, जलाराम नगर ) अशी झाली आहे. माहितीनुसार दस्तूनगर जुना बायपास रोडवर सोमवारी सायंकाळी एका वृद्धाचा मृतदेह आढळला होता. तेथून जाणाऱ्या नागरिकांनी याची माहिती राजापेठ पोलिसांना दिली होती. पोलिसांनी घटनास्थळावर (पान २ वर)

# ट्रकचे टायर चोरी करणारा जेरबंद



**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने अवघ्या ४८ तासांत ट्रकचे टायर चोरी प्रकरण उघड करत आरोपीला ताब्यात घेतले आहे. संतोष पुंडलिकराव मानापुरे (वय ४६, उत्कर्ष नगर ,कठोरा रोड) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून १ लाख ६० हजार रुपयांचे टायर व डिक्स जप्त (पान २ वर)

# अमरावती विभागाची ऐतिहासिक कामगिरीः

## महाआवास अभियानात राज्यात द्वितीय क्रमांक



### -विविध स्तरावरील आठ पुरस्कार पटकाविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत ग्रामीण भागातील बेघर कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'महाआवास अभियान २०२३-२४' मध्ये अमरावती विभागाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करत अमरावती विभागाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सातारा येथे आयोजित कार्यक्रमात केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते या पुरस्काराचे तत्कालीन विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, अपर आयुक्त (विकास) शालिनी कडू व उपायुक्त राजीव फडके यांना वितरण (पान २ वर)

# ट्रॅफिक व्यवस्था सुधारून नागरिकांना सुरक्षित वाहतूक उपलब्ध करून द्या

## डॉ.सुनील देशमुख यांचे नेतृत्वात पोलिस आयुक्तांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराची लोकसंख्या गेल्या काही वर्षा मध्ये अत्यंत झपाट्याने वाढलेली आहे. त्यामुळे रस्त्यावर व्यावसायिक मोठी वाहने, चारचाकी वाहने व दुचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणांत वाढलेली आहे. एका काळात अमरावती शहरातील रस्ते वाहतूक ही सुरळीत होती परंतु सद्य स्थितीत या वाढत्या वाहनांना नियंत्रित करण्यासाठी व शहरांतर्गत बाजारपेठेतील वाहतूक नियंत्रित करताना शहर (वाहतूक) ट्रॅफिक पोलिस विभाग अद्यापही पारंपरिक पद्धती वापरत असून या मध्ये सुद्धा कोणतेही सुसूत्रता नसल्याचे प्रकर्षाने निदर्शनास आलेले आहे. या बाबत सातत्याने विविध वर्तमान पत्रांमध्ये सातत्याने बातम्या सुद्धा प्रकाशित होत असतात. परंतु शहरातील वाहतुकीची प्रचंड अनागोंदी माजलेली असताना वाहतूक विभाग (पान २ वर)